‘पांढर’ : एक आकलन

प्रा. समीर वैरागी

ज्ञानार्णव प्रकाशन



'पांढर' : एक आकलन
'Pandhar' : Ek Akalan

लेखक :
प्रा. समीर वैरागी
साहाय्यक प्राध्यापक,
इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी, मुंबई

प्रकाशक :
ज्ञानार्णव प्रकाशन, पुणे
ज्ञानेश्वर भोसले
संपर्क : ७७४४००९०१६

ISBN - 978-93-84202-11-8

प्रथमावृत्ती : डिसेंबर २०२०

मुखपृष्ठ : मुक्ता शिंदे

मुद्रक : ज्ञानराज भेलोंडे, उद्यमनगर, कोल्हापूर
संपर्क : ९९६०३०९५५०

मूल्य : १०० /-

अर्पणपत्रिका

अन्नदात्या काळ्या भुईतून मोती पिकवणाऱ्या कृषिवलांस

आणि

मुलांच्या भवितव्यासाठी आयुष्यभर राबणाऱ्या

तीर्थरूप कै. अण्णांना सादर समर्पित...

अनुक्रमणिका

मनोगत

मला प्रारंभापासूनच मराठी साहित्याची ओढ होती. बालवयातील मासिकांच्या वाचनाने माझी साहित्याची गोडी आणखीनच वाढली. फर्ग्युसन महाविद्यालयातून मराठी साहित्यात एम. ए. केल्यांनतर २०१०मध्ये मी पुणे विद्यापीठात एम. फिल.साठी प्रवेश घेतला. माझे मूळ गाव मावळखोऱ्यातील 'तळेगाव दाभाडे'. गावची ऐतिहासिक आणि निसर्गरम्य पार्श्वभूमी, त्यात गोनीदांसारख्या विख्यात आणि बहुप्रसव लेखकाच्या वास्तव्याने पुनित झालेले तळेगांव. गावातील वातावरण बव्हंशाने ग्रामीण असल्याने एम. फिल.साठी ग्रामीण कादंबरी निवडण्याचे मी निश्चित केले होते.

रवींद्र शोभणे हे १९९०नंतरचे ग्रामीण साहित्यविश्वातीलच नव्हे, तर एकूण मराठी साहित्यविश्वातील आश्वासक नाव. त्यांच्या 'कोंडी', 'रक्तध्रुव', 'पडघम'सारख्या ग्रामीण कादंबऱ्या, 'शहामृग', 'दाहीदिशा'सारखे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'उत्तरायण'सारखी महाभारतीय युद्धावर भौतिक अंगाने भाष्य करणारी कादंबरी लिहिणारा लेखक, समीक्षक संशोधन व्यवहारात काहीसा अंधारात राहिल्यासारखा वाटला. बहुप्रसव लेखक असलेले शोभणे यांची 'पांढर'ही कादंबरी २००९ साली प्रकाशित झाली. दुष्काळकेंद्री आशयावर शेतकरी आत्महत्येसारख्या विदर्भातील गंभीर प्रश्नामागील सामाजिक, राजकीय परिमाणे रेखाटणारी ही कादंबरी वैदर्भीय जीवनाला खऱ्या अर्थाने दृग्गोचर करते. 'पांढर' इतर ग्रामीण कादंबऱ्यांपेक्षा वेगळी आहे. म्हणून मी 'एम. फिल. ती पदवी संशोधनासाठी 'पांढर' निवडली. त्याचेच पुस्तकरूप करावे, असे ज्ञानार्णव प्रकाशनाचे प्रा. ज्ञानेश्वर भोसले यांनी सुचवले. त्यांच्या प्रकाशनाकडून हे संशोधन पुस्तकरूपाने आपणासमोर आणताना मला अत्यंत आनंद होत आहे.

प्रा. समीर वैरागी

कादंबरी आणि प्रादेशिक कादंबरी : संकल्पनाचर्चा

प्रेमचंद यांच्या मते, ''मानवी जीवनाचे चित्रण करणे आणि जीवनाचा अर्थ उलगडणे हेच कादंबरीचे मूलभूत तत्त्व आहे.''[१]

.''कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी'' असे श्री. म. कुलकर्णी म्हणतात.''[२] बापट-गोडबोले यांच्या मते, ''सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबीत जीवित घटना यांचे गोष्टीरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितावरील गुंतागुंतीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा वाङ्मय प्रकार म्हणजे कादंबरी''[३] दि. के. बेडेकर म्हणतात, ''कादंबरी ही गद्यात सांगितलेली दीर्घ व गुंतागुंतीची कथा असते.''[४]

थोडक्यात, कादंबरी हा वाङ्मय प्रकार व्यामिश्र स्वरूपाचा, कल्पनीय वास्तव निर्माण करणारा, वास्तवाचा आभास निर्माण करणारा, जीवनाचा व्यापक पट मांडणारा, ललित गद्याच्या सर्व वैशिष्ट्यांना सामावून घेणारा वाङ्मय प्रकार म्हणता येईल.

कादंबरीचे घटक : स्वरूप

कादंबरी रचनाबंधाच्या दृष्टीने विषय, कथानक, व्यक्तिरेखाटन, संवाद, पार्श्वभूमी, भाषा इत्यादी कादंबरीचे घटक मानता येतील. कादंबरी आशय आणि अभिव्यक्ती यांच्या संयोगातून साकार होत असते. कादंबरीचा आशय म्हणजे 'कादंबरीत काय सांगितले?', तर कादंबरीची अभिव्यक्ती म्हणजे 'कादंबरीत सांगितलेला आशय व्यक्त करण्याची रीत', आशयांची सूत्रबद्ध मांडणी किंवा रचनातंत्र होय. कादंबरीत मांडलेला जीवनविषयक दृष्टिकोन, कथानक यातून कादंबरीचा 'आशय' दृग्गोचर होतो, तर कादंबरीचा आकृतिबंध, रचनातंत्र

यातून ‘अभिव्यक्तिरूप’ साकार होते.

विषय / कथाबीज :

कादंबरीलेखनास ज्या कारणामुळे लेखक उद्युक्त होतो ते कारण, ती गोष्ट म्हणजे ‘कादंबरीचा विषय’ होय. विषयाच्या किंवा कथाबीजाच्या अनुरोधाने कथानक, कथानकातील घटनाप्रसंग आणि वातावरणनिर्मिती साकार होत असते.

कथानक :

कथानक हा कादंबरीचा गाभा असतो. कादंबरीची कार्यकारणपर घटनामालिका व्यक्तिरेखांद्वारे साकार होते, त्यातून ‘कथानक’ साकार होत असते. सूत्रबद्धपणे, कार्यकारणपर पद्धतीने सांगितलेली कथा म्हणजे ‘कथानक’ होय. लेखक कल्पनीय वास्तवातून ‘कथानक’ साकार करतो. वास्तव घटना आणि कल्पित घटना यांतून लेखक कादंबरीत घटनामालिका रेखाटतो, यातून कादंबरीतील कथानक दृकप्रत्ययक्षम बनते.

आशय दृष्टिकोन :

कादंबरीत लेखकाने मांडलेला जीवन दृष्टिकोन किंवा जीवन चित्रण यामागे लेखक वाचकांना काहीतरी सुचवत असतो. तो सुचितार्थ म्हणजे कादंबरीचा ‘आशय हेतू’ होय.

कादंबरीचे अभिव्यक्ती तंत्राचे उपघटक :

घटनाप्रसंग/घटनामालिका :

कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेप्रमाणे असते. कादंबरीत अनेक केंद्रे असतात, स्वतंत्रपणे विकास पावणारी कथाबीजे असतात. कादंबरी घटना-मालिकेतून साकार होते. व्यक्तिरेखांमधील संवाद, संवादातून उभे राहणारे नाट्य, व्यक्तिरेखांभोवती निर्माण झालेली पार्श्वभूमी यांतून ‘घटनाप्रसंग’ निर्माण होतात. कादंबरीला ‘घटनामालिके’तून पूर्णत्व येत असते.

व्यक्तिरेखाटने :

कादंबरीतील कथानक 'घटनामालिके'तून साकार होते. कथानकाला अर्थ प्राप्त होतो आणि मूल्य लाभते ते 'व्यक्तिरेखाटना'मुळे. कादंबरीतील पात्रे प्रथम लेखकाच्या कल्पनेत आकाराला येतात. मग कथानकाची जुळणी होते आणि घटनाप्रसंगातून 'कथानक' साकार होते. व्यक्तिरेखाटने दोन पद्धतीने केली जातात. फ्लॅट (Flat) म्हणजे स्थितिशील व सरळ मनोवृत्तीची, अपरिवर्तनशील पात्रे आणि राऊंड (Round) म्हणजे गतिशील व जटील मनोवृत्तीची परिवर्तनशिल पात्रे. लॅट व्यक्तिरेखाटने एकांगी व शेवटपर्यंत स्थिर राहणारी असतात. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांना 'ओतिव रेखा' म्हणतात. फ्लॅट व्यक्तिरेखा घडीव आणि ठोकळेबाज व्यक्तिरेखा असतात, तर राऊंड व्यक्तिरेखा अनेकांगी, अस्थिर आणि शेवटपर्यंत विकसित होणाऱ्या व्यक्तिरेखा असतात. त्यांना आपण 'गतिशील/विकसनशील व्यक्तिरेखा' म्हणू शकतो. कादंबरीकार वास्तव व्यक्ती (Real being) आणि कल्पित व्यक्तिरेखा (Paper being) यांच्या संयोगातून कादंबरीत व्यक्तिरेखाटने करतो. राऊंड व्यक्तिरेखांच्या मनोविश्लेषणाला खूप वाव असतो. संज्ञाप्रवाही कादंबऱ्या, मनोविश्लेषणात्मक कादंबऱ्या, ग्रामीण प्रादेशिक कादंबऱ्या, प्रतीकात्मक कादंबऱ्या, अस्तित्ववादी कादंबऱ्या इत्यादी कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा राऊंड किंवा गतिशील/विकसनशील व्यक्तिरेखा असतात. अद्‌भूत रसात्मक, रंजनवादी कादंबरीतील व्यक्तिरेखा फ्लॅट (स्थितीशील) व्यक्तिरेखा असतात.

भाषा :

भावना व विचार व्यक्त करणारे संज्ञापनाचे आणि संप्रेषणाचे साधन म्हणजे 'भाषा' होय. प्रत्येक लेखकानुसार भाषेचे स्वरूप बदलत असते. कादंबरीतील पात्रे, प्रसंग, निवेदन आणि प्रसंग यांनुसार भाषा बदलत असते. ग्रामीण-प्रादेशिक कादंबरीत 'भाषा' हा घटक खूप महत्त्वाचा मानला जातो.

निवेदनाची भाषा :

कादंबरीतील निवेदन प्रथम पुरुषी निवेदन आणि तृतीय पुरुषी निवेदन या दोन प्रकारांतून साकार होते. प्रथम पुरुषी निवेदनात 'मी' शब्द वापरला

जातो. 'मी'द्वारे कथा-कादंबरीतील एक पात्र सूचित होत असते. यात निवेदक कादंबरीतील स्वत: एक पात्र असतो, तर 'तृतीय पुरुषी निवेदना'चे दोन उपप्रकार पडतात. (१) सर्वसाक्षी दृष्टिकोन, (२) मर्यादित दृष्टिकोन. तृतीय पुरुषी निवेदक हा कादंबरीतील घडणाऱ्या घटना साक्षेपीपणे पाहणारा त्रयस्थ निवेदक असतो. तो वस्तुनिष्ठपणे निवेदन करतो.

संवादाची भाषा :

कादंबरीत पार्श्वभूमी किंवा वातावरणनिर्मितीशी एकरूपता दाखवण्यासाठी कादंबरीतील संवादभाषा 'प्रदेशनिष्ठ बोलीभाषा' म्हणून वापरली जाते. निवेदन मात्र प्रमाण भाषेत केले जाते. संवादात चपखल बसेल असे शब्द, म्हणी, वाक्प्रचार वापरल्यामुळे आशयाला मूल्य लाभते. सुयोग्य भाषेचा संवादातील वापर आशयाला जास्त जिवंत करू शकतो. प्रदेश बोलीभाषेची संवादातील योजना ही केवळ आता संवादापुरती राहिलेली नाही, तर तिने निवेदनावरही ताबा मिळवलेला दिसतो.

कादंबरीतील वातावरणनिर्मिती (पार्श्वभूमी) :

कादंबरीतील कथानक व व्यक्तिदर्शनाला जिवंत साकार करण्यासाठी किंवा उठावदार करण्यासाठी वातावरणनिर्मिती (पार्श्वभूमी) उपयुक्त ठरते. कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिरेखाटन यांतील रहस्य उलगडण्यास उपयुक्त ठरते. कादंबरीतील पात्रे कोठे तरी वावरत असतात. त्यांच्याभोवती एक विविध वस्तूने भरलेले जग असते. त्यालाच आपण 'वातावरणनिर्मिती' (Atmosphere Setting) म्हणतो. कादंबरीतील स्थलकालाची चौकट भौगोलिक, सांस्कृतिक परिसर, जिथे व्यक्तिरेखा वावरतात, तो सारा 'वातावरणनिर्मिती'चा भाग असतो. वातावरणातून कादंबरीच्या भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक परिवेषाची कल्पना देणे हा वातावरणनिर्मितीचा प्रमुख आणि प्राथमिक उद्देश असतो. वातावरणनिर्मिती हा प्रादेशिक कादंबऱ्यांतील एक भाग असतो. वातावरण आणि व्यक्तिरेखा यांच्यातील संबंध प्रादेशिक कादंबरीत सुसंवादी किंवा विसंवादी चित्रित केलेले असतात.

प्रादेशिक : संकल्पनाचर्चा :

सामान्यपणे मराठी समीक्षा व्यवहारात ग्रामविषयक चित्रणे असणाऱ्या साहित्याबाबत पूर्वीपासून 'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' या दोन संज्ञा प्रचलित झालेल्या आहेत.

प्रदेशविशिष्ट प्रादेशिकता :

'प्रदेश' हा शब्द विशिष्ट भू-भाग म्हणून ओळखला जातो. प्रदेशातील भौगोलिक स्थिती, निसर्ग, मानवी जीवन यांचा विचार प्रादेशिकतेत आवश्यक मानला जातो. एक प्रकारे त्या-त्या प्रदेशाची सांस्कृतिक भिन्नता त्यांचे वेगळेपण दर्शवित असते, हीच 'प्रादेशिकता' होय. 'प्रादेशिकता' ही नैसर्गिक व सांस्कृतिक वातावरणात महत्त्वाची ठरते. तेथे घडणाऱ्या आर्थिक, सामाजिक ज्वलंत समस्या; त्यांच्यातील आंतरविरोध, तेथे घडणारे आर्थिक, सामाजिक व राजकीय बदल, मनुष्य-मनुष्याचे जुळणारे-तुटणारे संबंध, नीतिमूल्ये, भौगोलिक व नैसर्गिक स्थितीचा जनमानसावरील परिणाम, तेथील मागासलेपण आणि अर्धमागासलेपण यांतून 'प्रादेशिकता' आविष्कृत होते. 'प्रादेशिकता' म्हणजे विशिष्ट प्रदेशाची संस्कृती, भाषा, समस्या, निसर्ग, सामाजिक जीवन यांच्या वर्णनामुळे त्या प्रदेशाला लाभलेले असामान्य वेगळेपण होय.

साहित्यातील प्रादेशिकता :

विशिष्ट प्रदेशातील संस्कृती, भाषा, समस्या, निसर्ग व समाजजीवन इत्यादी मूल्यवैशिष्ट्यांचे मूल्यमापन करून त्यावर साहित्यात जोर देण्याची प्रवृत्ती म्हणजे 'साहित्यातील प्रादेशिकता' होय. साहित्यातून प्रदेशविशिष्ट लोकमानस व संस्कृतीचे दर्शन घडविले जाते. 'साहित्यातील प्रादेशिकता' म्हणजे कथा व नाटके यांच्या पार्श्वभूमीसाठी विशिष्ट प्रदेशाची केलेली योजना होय. या पार्श्वभूमीत प्रदेशाचे प्रातिनिधिक चित्रण आणि प्रदेशाचा, तेथील वातावरणाचा व्यक्तिरेखांवर झालेला परिणाम दाखवला जातो.

'प्रदेशविशिष्ट प्रादेशिकता' ही वास्तवाचे प्रगटीकरण आणि नावीन्य यांतून वाङ्मयात आली. साहित्यातील प्रादेशिकता ही परिवेशप्रधानतेला महत्त्व देते. 'प्रादेशिकता' हे वाङ्मयीन मूल्य नसून ती एक प्रवृत्ती आणि वर्णनात्मक संज्ञा

आहे. मातीचा रंग आणि गंध आणण्यासाठी 'प्रादेशिकता' महत्त्वाची ठरते.

जानपद :

'जानपद' ही संज्ञा प्रादेशिकतेला पर्याय म्हणून अनेकदा वापरली जाते. मराठीत 'ग्रामीण' संज्ञेशी समानार्थी म्हणूनही ती वापरली जात असे. ग्रामसमूह किंवा ग्रामे म्हणजे 'जानपद' होय. शेती, शेतकरी, गावगाडा यांचीच वर्णने साहित्यातून येत, तेव्हा ते साहित्य 'जानपद' साहित्य म्हणून ओळखले जाई. 'जानपद' संकल्पना डॉ. अ. ना. देशपांडे यांनी स्वीकारलेली दिसते.[५] जानपदातून ग्रामीणता निर्माण होते, असे ल. ग. जोगांसारख्या समीक्षकांचे मत आहे. ग्रामीण या शब्दातील जाणवणारे गावंढळत्व टाळण्यासाठी 'जानपद' हा समानार्थी, पण दोषरहित शब्द योजला गेला.

स्थानिक रंग (Local Colour**) :**

'स्थानिक रंग' (Local Colour) असाही शब्द प्रादेशिकतेबद्दल योजला गेलेला दिसतो. 'स्थानिक रंग' चळवळ ही वाङ्मयीन चळवळ अमेरिकेत पुढे आली. स्थानिक रंग प्रवृत्ती प्रादेशिकतेहून भिन्न असते. प्रादेशिकतेमध्ये सखोलतेला प्राधान्य दिसते, तर 'स्थानिक रंग' प्रवृत्तीत विस्ताराला प्राधान्य असते. कथेचे मुख्य तत्त्व म्हणून नव्हे, तर सजावटीच्या दृष्टीने दृश्य, भाषा, आचार, विचार, व्यवहार आणि प्रदेश यांचे विस्ताराने व सटीप वर्णन देणे म्हणजे 'स्थानिक रंग' प्रवृत्ती होय.

प्रादेशिक संस्पर्श (Regional Touch) :

जेव्हा लेखकाचा मूळ उद्देश वेगळा असून आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी तो काही प्रादेशिक वैशिष्ट्यांचे नाममात्र चित्रण करतो, तेव्हा त्या प्रकाराला 'प्रादेशिक संस्पर्श' म्हणतात. 'प्रादेशिकता' आणि 'स्थानिक रंग' ह्यांच्या मधली अवस्था म्हणजे 'प्रादेशिक संस्पर्श' असतो. प्रादेशिक संस्पर्शात प्रादेशिकतेप्रमाणे जीवनाची सखोलता नसते आणि 'स्थानिक रंग' देणाऱ्या प्रवृत्तीप्रमाणे उथळपणा नसतो.

ग्रामीणता :

'ग्रामीणते'मध्ये ग्राम किंवा अनागर वस्ती आणि तेथील गावगाडा, गावगाड्यातील शेतकरी, बलुतेदार-अलुतेदार, कारू-नारू, फिरस्ते आणि कृषिकेंद्रित्व अपेक्षित असते. निसर्ग, शेतीनिष्ठता, तदनुषंगिक श्रद्धा, रीतीरिवाज, परंपरा, शेतीसंबंधी मातेची-आदिमतेची भावना, सामाजिक स्तरभेदाची भावना यांतून निर्माण होणारे ग्रामीण जीवन यातून 'ग्रामीणता' दृग्गोचर होते.

ग्रामीणतेमध्ये ग्रामस्थांचे जगणे, त्यांची जीवनदृष्टी यांना महत्त्व असते. ग्रामीणता हे विशेषण स्थलदर्शक नसून आशयदर्शक मानले जाते. ग्रामस्थांची जीवन जगण्याची रीत म्हणजे 'ग्रामीणत्व' होय. ग्रामीणता साकार होण्यासाठी कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता, त्यांतून निर्माण झालेले लोकमानस हे घटक महत्त्वाचे ठरतात.

साहित्यातील ग्रामीणता :

कृषिनिष्ठ ग्राम, गावगाडा, गावगाड्यातील घटक यांच्या समग्र जीवनचित्रणातून वाङ्मयात 'ग्रामीणता' साकार होते. साहित्यातील ग्रामीणतेला एक मूल्याधिष्ठित आणि समानतेच्या पायावर उभे असणारे जग अपेक्षित असते. ग्रामीण जीवन वास्तव मांडणाऱ्या आणि ग्रामनिष्ठ आशय व्यक्त करणाऱ्या साहित्यातून 'ग्रामीणता' व्यक्त होत असते. साहित्यात 'ग्रामीणता' हे वर्णनात्मक विशेषण असून ते साहित्याचे वैशिष्ट्य मानता येते, परंतु ती साहित्याची गुणवत्ता नसते.

थोडक्यात, कृषिकेंद्रित संस्कृतीच्या परिणामातून निर्माण झालेले दारिद्र्य, अज्ञान, निसर्गप्रेम, मातीचे प्रेम, जातिव्यवस्था, बलुतेदारी पद्धती, पारंपरिक निष्ठा, समजुती यांचे साहित्यात होणारे आविष्करण यांतून 'साहित्यातील ग्रामीणता' साकार होते.

ग्रामीण साहित्य :

ग्रामीण साहित्य हे वेशीच्या आतील आणि वेशीच्या बाहेरील माणसांच्या जाणिवा व्यक्त करणारे साहित्य आहे. ग्रामीण साहित्य हे बहुजनांच्या देशीजननिष्ठ भूमिकेला आविष्कृत करीत असल्यामुळे ते 'जनसाहित्य'ही आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी ग्रामीणांचे अस्सल जीवनदर्शन घडविणारे

देशी वळणाचे साहित्य होय. ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवापासून साकार होणारे ते 'ग्रामीण साहित्य'.

थोडक्यात, कृषिकेंद्री जीवनजाणिवा व्यक्त करणारे, गावरचना, गावगाड्यातील शेतकरी, अलुतेदार-बलुतेदार, फिरस्ते यांचे भावचित्रण करणारे, ग्रामनिष्ठ आशय व्यक्त करणारे, वास्तवाभिमुख जीवन दृष्टिकोन मांडणारे साहित्य म्हणजे 'ग्रामीण साहित्य' होय.

प्रादेशिक कादंबरी :

एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, जीवन-संकेत, रूढी-परंपरा इत्यादींचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात, त्यांना 'प्रादेशिक कादंबऱ्या' म्हणता येईल.[६] प्रादेशिक कादंबरी ही खरी म्हणजे ग्रामीण, अनागरी जीवनावरील कादंबरी असते. ज्या भू-भागाची निवड पार्श्वभूमीसाठी करावयाची, त्या भूभागाच्या नैसर्गिक सृष्टीचे यथावत चित्रण करीत असतानाच तेथील समाजजीवनाचे, चालीरीतींचे, संस्कृतीचे व प्रसंगी तेथील विशिष्ट बोलीभाषेचे प्रतिबिंब कादंबरीत उमटल्याने ती कादंबरी 'प्रादेशिक कादंबरी' या नावाला सार्थ ठरते. प्रा. ना. सी. फडके यांना प्रादेशिक कादंबरीत कथानक एकाच प्रदेशात घडलेले दाखवणे महत्त्वाचे वाटते.[७] भूप्रदेशावर लोकजीवनाचा झालेला अमीट परिणाम म्हणजे तेथील संस्कृती, रीती यांचे चित्रण 'प्रादेशिक कादंबरी'त महत्त्वाचे असते.

थोडक्यात, प्रादेशिक कादंबरीचा स्थायिभाव 'प्रदेश' हा असतो. प्रदेशविशिष्ट वातावरणाचा प्रभाव यातील व्यक्तिरेखांवर पडतो. प्रदेश, निसर्ग हादेखील एक स्वतंत्र घटक म्हणून यातून दृग्गोचर होत असतो. प्रादेशिक वैशिष्ट्यांचा प्रभाव, तेथील लोकजीवन, संस्कृती, रूढी-परंपरा यावर पडलेला यात दर्शविलेला असतो. प्रदेशविशिष्ट बोलीद्वारे प्रदेशातील लोकजीवनाचे व्यापक, व्यामिश्र समूहपातळीवरील जीवनदर्शन घडविणारी कादंबरी म्हणजे 'प्रादेशिक कादंबरी' होय. 'प्रादेशिकता' ही 'ग्रामीणते'पेक्षा व्यापक संज्ञा आहे, असे अनेक समीक्षकांनी मान्य केलेले दिसते. 'ग्रामीणते'शी संबद्ध अशा अन्य संकल्पना उदा. प्रादेशिक संस्पर्श, स्थानिक रंग, जानपद, इत्यादी, 'प्रादेशिक'तेलादेखील लागू पडतात. 'ग्रामीणता' ही प्रादेशिकतेच्या पोटात सामावणारी संज्ञा आहे,

असे मधु कुलकर्णी, मदन कुलकर्णी, र. बा. मंचरकर या समीक्षकांना वाटते, तर डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, द. ता. भोसले, रवींद्र ठाकूर इत्यादी समीक्षकांना 'प्रादेशिकता' आणि 'ग्रामीणता' ह्या संज्ञा काही अंशी साम्यदर्शक असल्या, तरी दोन भिन्न संकल्पना वाटतात. 'प्रादेशिकते'मधील सामूहिकता, प्रदेशाचे सामग्र्याने चित्रण, समष्टीलक्ष्यीत्व इत्यादी मुद्यांच्या आधारे 'ग्रामीणते'पासून 'प्रादेशिकते'ला वेगळे करण्याचा प्रयत्न डॉ. कोत्तापल्ले करताना दिसतात. वास्तविक पाहता 'प्रादेशिकता' ही संकल्पना पुरेशी व्यापक असून 'ग्रामीणते'शी जे जे घटक संबद्ध असतात, ते ते सारे 'प्रादेशिकते'मध्ये अभिप्रेत असतात. 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' ही विशेषणे परस्परविरोधी नसून अभिन्न आहेत. ग्रामीणतेतील 'स्थलनिष्ठा' आणि 'प्रादेशिकते'तील 'परिसरनिष्ठा' या घटकांना प्राधान्य दिल्यानेच त्यांत थोडाफार फरक जाणवतो, असे म्हणता येईल. यामध्ये 'प्रादेशिक' ही संज्ञा अधिक योग्य वाटते. प्रादेशिक साहित्यातील प्रादेशिकता 'व्यक्तिकेंद्रित्व' नाकारते, 'समूहलक्ष्यी' होण्याचा आग्रह धरते. 'प्रादेशिकता' ही प्रवृत्ती प्रदेशाच्या समग्र जीवनचित्रणाला, भू-प्रदेशाच्या स्थितीचा लोकजीवनावरील अमीट परिणाम यांना महत्त्व देते.

सन १९२५नंतर मराठीत ग्रामीण-प्रादेशिक वाङ्मयाला प्रारंभ झाला. प्रादेशिक वाङ्मयाचा प्रांरभबिंदू सन १९३१चा 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा कथासंग्रह मानला जातो. या कालखंडात 'प्रादेशिक' संज्ञा मराठी साहित्यात रूढ झाली. परंतु मराठी वाङ्मयातील ग्रामीणत्व, प्रादेशिकता यांच्या खुणा मध्ययुगीन मराठी वाङ्मयातदेखील शोधता येतात. उदा. महानुभाव गद्यग्रंथ इत्यादी. प्रादेशिक साहित्याला त्या-त्या प्रदेशातील बोलीमुळे 'आविष्कारात्मक' वैशिष्ट्य प्राप्त होते. प्रादेशिक बोली त्या-त्या प्रदेशातील लोकजीवनाचा अविभाज्य भाग असते.

प्रादेशिक साहित्याचे विकसित, व्यापक आणि व्यामिश्र स्वरूप म्हणजे 'प्रादेशिक कादंबरी'. मराठी प्रादेशिक कादंबरी क्रमाक्रमाने विकसित झालेली दिसते. सन १९४०नंतर र. वा. दिघे यांनी 'प्रादेशिक चित्रणा'चा वापर आपल्या कादंबऱ्यांत करून मराठी साहित्याला नवी अनुभवदृष्टी देणारी 'प्रादेशिकते'ची खाण मिळवून दिली. सन १९५०नंतर श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर यांनी प्रादेशिक कांदबरीचे नवनवीन आविष्कार घडवत प्रादेशिक जीवनावर

चित्तवेधक कांदबरीलेखन करून ‘प्रादेशिकते’ला नवीन, स्वतंत्र दृष्टी दिली आणि मराठीत ‘प्रादेशिक कादंबरी’ला लोकप्रिय केले. व्यंकटेश माडगुळकर, उद्धव शेळके, चिं. त्र्यं. खानोलकर, सुभाष भेंडे, मधू मंगेश कर्णिक, प्रतिमा इंगोले, विश्वास पाटील, सदानंद देशमुख इत्यादी लेखकांनी मानवी मनाचे ठाव घेणारे लेखन करून ‘ग्रामीण-प्रादेशिक कादंबरी’ला वास्तवाभिमुख केले. सन १९९० नंतरच्या पिढीतील लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांतील ‘प्रादेशिकते’वर जागतिकीकरणाचा विलक्षण प्रभाव जाणवतो.

सन १९९०नंतर उदयाला आलेल्या लेखकांनी आपल्या ग्रामीण-प्रादेशिक कादंबऱ्यांत मानव-निसर्ग यांच्यातील आंतरद्वंद्व, शहरीकरणामुळे उद्ध्वस्त होणारे ग्रामजीवन मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. रवींद्र शोभणे या पिढीचेच नेतृत्व करतात. ‘सन १९९०नंतरचे महत्त्वाचे साहित्यकार’ असा त्यांचा यथोचित गौरव केला जातो. रवींद्र शोभणे यांचा ‘प्रादेशिक कादंबऱ्या’चा विशेष अभ्यास असून ‘श्री. ना. पेंडसे’ यांच्या कादंबऱ्यांवर त्यांनी पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवी मिळवली आहे. ‘कादंबरीकार श्री. ना. पेंडसे’ (१९९६) हा त्यांचा प्रसिद्ध समीक्षाग्रंथ या दृष्टीने वाखाणण्यासारखा आहे.

मराठी ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबऱ्यांतील प्रादेशिकता :

एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, जीवनसंकेत, रूढी-परंपरा इत्यादींचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात, त्यांना ‘प्रादेशिक कादंबऱ्या’ म्हणता येईल, असे ग्रामीण साहित्य समीक्षक डॉ. आनंद यादव म्हणतात.[८] कृषीकेंद्रित गावगाड्याचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने लिहिली गेलेली, ग्रामीण जीवनचित्रण करणारी कादंबरी म्हणजे ‘ग्रामीण कादंबरी’ होय. ‘ग्रामीणता’ ही प्रादेशिकतेच्या पोटात सामावणारी वाङ्मयीन प्रवृत्ती आहे. हिंदीत ग्रामीण जीवनचित्रण करणाऱ्या साहित्यप्रवाहाला ‘आंचलिक साहित्य’ म्हणतात. म्हणजे हिंदीतदेखील ‘आंचलिक’ (प्रादेशिक) ही व्यापक संकल्पना स्वीकारली गेली आहे. ‘ग्रामीण साहित्य’ ही संज्ञा बहुसंख्य समीक्षक स्वीकारतात. परंतु डॉ. मदन कुलकर्णी ‘प्रादेशिक’ संज्ञा अधिक व्यापक मानतात. ‘‘ग्रामीण साहित्य’ किंवा ‘ग्रामीण कथा-कादंबऱ्या’ असा शब्दप्रयोग न करता सर्व ग्रामविषयक साहित्याचा समावेश ‘प्रादेशिक’ या संज्ञेत करणेच

उचित होईल.''[९] 'प्रादेशिक' ही संज्ञा व्यापक वाटते. कारण 'प्रादेशिक' हा शब्द वापरताना त्या-त्या प्रदेशातील ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन अभिप्रेत असते. डॉ. आनंद यादव म्हणतात, ''प्रादेशिक वाङ्मयात त्या-त्या प्रदेशातील ग्रामीण विभागाचे समूहजीवन अभिप्रेत असते आणि ग्रामीण वाङ्मयात त्या-त्या ग्रामीण विभागातील व्यक्तिनिष्ठ जीवन अभिप्रेत असते.''[१०] परिसर म्हणजे प्रदेश, यामुळे ग्रामविषयक चित्रणे ही 'प्रादेशिक' चित्रणेच असतात. प्रादेशिक आणि ग्रामीण या संज्ञा किंवा वाङ्मयीन प्रवृत्ती समानार्थी मान्यल्या पाहिजेत. 'प्रादेशिक' ही वाङ्मयीन संज्ञा अधिक व्यापक असून ती 'ग्रामीणते'ला सामावून घेणारी आहे.

ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबरी :

ग्रामविषयक आशय असणाऱ्या साहित्याला पूर्वीपासून 'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' या दोन संकल्पनात्मक संज्ञा मराठी समीक्षा व्यवहारात प्रचलित दिसतात. या दोन्ही संज्ञा समीक्षकांच्या मनात अनेक विभ्रम निर्माण करताना दिसतात. 'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' साहित्य एकच असते की, त्यात भेद असतो, भेद असल्यास 'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' साहित्य ठरविण्याच्या कसोट्या कोणत्या, 'प्रादेशिकता' आणि 'ग्रामीणता' या दोन स्वतंत्र वाङ्मयीन संज्ञा आहेत की एकच संकल्पना आहेत, 'ग्रामीणता' आणि 'प्रादेशिकता' या वाङ्मयीन संज्ञा म्हणजे वाङ्मयीन प्रवृत्ती की वाङ्मयीन मूल्य, इत्यादी प्रश्न साहित्य समीक्षकांसमोर उभे राहतात.

सन १९४०-६० या दोन दशकांत ग्राम आशय चित्रण करणारी कादंबरी 'प्रादेशिक कादंबरी' म्हणूनच ओळखली जायची. १९६०नंतर 'ग्रामीण कादंबरी' ही संकल्पना अधिक सर्वमान्य झाली. 'ग्रामीणता' आणि 'प्रादेशिकता' या दोन संकल्पनांना मराठी समीक्षा व्यवहारात पुरेशी स्पष्टता दिसत नाही. वि. स. सुखटणकर यांचा १९३१ला 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' (आजचा व कालचा गोमंतक) हा कथासंग्रह 'आठ स्वतंत्र प्रादेशिक कथा' म्हणूनच प्रकाशित झाला. 'प्रादेशिक' संज्ञादेखील सन १९३०च्या मडगाव साहित्य संमेलनात प्रथमत: वापरण्यात आली. 'ग्रामीण'ही संज्ञा त्यानंतर काही कथा-कादंबऱ्यांबाबत आणि र. वा. दिघे यांनी योजलेली दिसते. सन १९५०नंतरच्या दशकात श्री.

ना. पेंडसे आणि गो. नी. दांडेकर' यांच्या कादंबऱ्या 'प्रादेशिक' म्हणूनच सर्वमान्य झालेल्या दिसतात. सन १९५५च्या व्यंकटेश माडगुळकर यांच्या 'बनगरवाडी'मुळे 'प्रादेशिक' हा शब्द अधिक प्रचलित झाला. कोशवाङ्मयात 'प्रादेशिक साहित्य' म्हणजे 'कोकणविषयक साहित्य' हा सूर व्यक्त केलेला दिसतो, तर वैदर्भीय जीवनाशयावरील 'धग' (१९६०) या कादंबरीचा निर्देश उद्धव शेळके यांनी 'प्रादेशिक' म्हणूनच केलेला आहे. मधू कुलकर्णी ग्रामीण आणि प्रादेशिक या संज्ञा समानधर्मीय मानतात आणि 'प्रादेशिक' ही संज्ञा 'ग्रामीण'पेक्षा अधिक व्यापक मानतात.[११] र. बा. मंचरकर 'प्रादेशिकता' मोठे वर्तुळ मानतात, तर 'ग्रामीणता' हे 'प्रादेशिकते'च्या मोठ्या वर्तुळातील लहान वर्तुळ मानतात.[१२] प्रादेशिक वाङ्मय म्हणजे एका अर्थाने ग्रामीण वाङ्मयच होय. परंतु प्रादेशिक वाङ्मय असा उल्लेख करताना समूहसापेक्ष ग्रामीण चित्रणाची अपेक्षा असते.

थोडक्यात, 'प्रादेशिकता' म्हणजे समूहसापेक्ष, समूहकेंद्री ग्रामीण जीवन, तर 'ग्रामीणता' म्हणजे व्यक्तिसापेक्ष, व्यक्तिकेंद्री ग्रामीण जीवन होय. 'प्रादेशिकता' या वाङ्मयीन प्रवृत्तीलादेखील 'समूहसापेक्ष' ग्रामीण लोकमानस अभिप्रेत असते. व्यक्ती हा समाजाचा सर्वांत लहान घटक असतो. त्याचप्रमाणे व्यक्तिलक्ष्यी 'ग्रामीणता' ही समूहलक्ष्यी 'प्रादेशिकतेची' सूक्ष्म अवस्था होय. प्रादेशिक वाङ्मय म्हणजे ग्रामचित्रणाचे समूह पातळीवरील जीवनआशयाचे दर्शन, तर 'ग्रामीण वाङ्मय' म्हणजे ग्रामव्यवस्थेतील समूहजीवनाला गौण स्थान देऊन आशयबद्ध केलेले व्यक्तिनिष्ठ जीवनदर्शन.

प्रादेशिकता आणि साहित्यातील प्रादेशिकता :

प्रादेशिकता म्हणजे विशिष्ट प्रदेशाची संस्कृती, भाषा, समस्या, निसर्ग वैविध्यामुळे बनलेले सामाजिक जीवन या सर्व बाबींमुळे त्या प्रदेशाला लाभलेले वेगळेपण होय. प्रदेश म्हणजे नैसर्गिक, भौगोलिक वैशिष्ट्यांनी युक्त इतर प्रदेशांहून भिन्न असा भूभाग. प्रदेश आणि प्रादेशिकता यांचा संबंध जनक-अपत्य असा असतो. नैसर्गिक-भौगोलिक वैशिष्ट्यांखेरीज सांस्कृतिक, सामाजिक घटकदेखील 'प्रादेशिकते'वर प्रभाव पाडतात. महानगरीय बहुसांस्कृतिकतेपासून मुक्त असलेली किंवा अलिप्त असलेली प्रदेशविशिष्ट संस्कृती जपणारी प्रवृत्ती

म्हणजे 'प्रादेशिकता' होय. साहित्यातील प्रादेशिकता ही जेव्हा साहित्यकार प्रदेशातील नावीन्यपूर्ण सौंदर्य, निसर्ग, तेथील लोकसंस्कृती, भाषा, प्रश्न इ. गोष्टींचे दर्शन घडवू लागतात, तेव्हा निर्माण होते. साहित्यातील प्रादेशिकता म्हणजे कथा, कादंबरी, नाटक यांच्या पार्श्वभूमीसाठी विशिष्ट प्रदेशाची केलेली योजना होय. या पार्श्वभूमीत प्रदेशात समूहपातळीवरील प्रातिनिधिक चित्रण येते व प्रदेशचित्रणाचा पात्रांवरील प्रभाव विलक्षणरित्या जाणवतो.

विशिष्ट प्रादेशातील जीवनवैशिष्ट्ये यांचे मूल्यमापन करून त्यावर साहित्यात जोर देण्याची प्रवृती म्हणजे 'प्रादेशिकता' होय. थोडक्यात, प्रादेशिकता ही साहित्यातील नैसर्गिक आणि सांस्कृतिक वातावरणाला प्राबल्याने महत्त्व देणारी वाङ्मयीन प्रवृत्ती आहे. प्रादेशिकतेला प्रदेशविशिष्ट ग्रामीण समूहमानस अपेक्षित असते. प्रदेशविशिष्ट ग्रामीण समूहमानसाचे साहित्याशयात होणारे प्रकटन म्हणजे 'साहित्यातील प्रादेशिकता' मानता येईल.

महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचा विचार करताना महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या प्रमुख चार विभाग पडतात. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण (गोमांतकासह). या चारही विभागांचे प्रादेशिक जीवन भिन्न स्वरूपाचे आहे. हे प्रादेशिक जीवनातील वैविध्य त्या-त्या प्रदेशातील भू-वैशिष्ट्यांमुळे निर्माण झालेले आहे. प्रादेशिकतेतील हे वैविध्य तेथील निसर्ग, समाज, संस्कृती, शेती, लोकजीवन, लोकरहाटी, लोकबोली इ. घटकांतून प्रकटताना दिसते. प्रादेशिक जीवनातील वैविध्यपूर्णतेमुळे निर्माण होणाऱ्या प्रादेशिकतेचे दर्शन त्या-त्या प्रदेशातील आशयकेंद्री प्रादेशिक-ग्रामीण कादंबऱ्यांतील प्रादेशिकतेतून दिसते. साहित्यातील प्रादेशिकता संपूर्णतः 'वास्तव प्रादेशिकता' असतेच, असे नाही. साहित्यातील प्रादेशिकतेत काही काल्पनिक मिसळलेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रादेशिक जीवनात होणारे परिवर्तनाचे प्रतिबिंब ग्रामीण-प्रादेशिक कादंबऱ्यांतील प्रादेशिकतेच्या चित्रणात दृग्गोचर होताना दिसते.

प्रादेशिकता काही घटकांच्या आधारे तपासता येते. ते पुढीलप्रमाणे : (१) भू-वैशिष्ट्ये, (२) निसर्ग, (३) समाजजीवन. यातील समाजजीवन (१) राजकीय जीवन, (२) शैक्षणिक जीवन, (३) कुटुंबजीवन, (४) सांस्कृतिक जीवन, (५) आर्थिक जीवन आणि (६) प्रचलित भाषाविशेष या उपघटकांतून तपासता येते, असा डॉ. भास्कर शेळके उल्लेख करतात.[१३]

या घटकांतदेखील त्या-त्या प्रदेशातील संदर्भानुसार बदल होणे सहज शक्य आहे. प्रदेशान्वये 'प्रादेशिकते'त बदल होणे सहज शक्य आहे. एकाच प्रदेशातील 'प्रादेशिकते'तदेखील समानता दिसेलच असे नाही. उदा. कोकण प्रदेश उत्तरेस मुंबईपासून दक्षिणेस कारवारपर्यंत पसरला आहे. या कोकण प्रदेशातील 'प्रादेशिकता' या प्रवृत्तीत काही समानता असली, तरी त्यातील प्रदेश संदर्भानुसार बोलीभाषा, समाजजीवन, सांस्कृतिकता या घटकांतून प्रादेशिकतेतील वैविध्य सहज जाणवू शकते. म्हणजेच कोकण या प्रदेशातील जीवनाशयावर बेतलेल्या कादंबऱ्यांतील 'प्रादेशिकता' प्रदेश संदर्भानुसार बदलताना दिसणे सहज शक्य आहे. कोकणपट्टीत बोलल्या जाणाऱ्या कोकणी बोलीत असलेला फरकदेखील कादंबऱ्यांतून दृग्गोचर होताना दिसेल.

ग्रामीणता आणि साहित्यातील ग्रामीणता :

प्रादेशितेप्रमाणेच 'ग्रामीणता'ही वर्णनात्मक संज्ञा आणि वाङ्मयीन प्रवृत्ती आहे. 'ग्रामीण' ह्या शब्दाने ग्रामविषयक, ग्रामसंबंधी किंवा ग्रामसंदर्भात असा अर्थ ध्वनित होतो. 'ग्रामीणता' म्हणजे कृषिकेंद्रित ग्रामीण जीवनदर्शन. ग्रामीण हे साहित्यातील अभिव्यक्त आशयाचे वर्णनात्मक विशेषण आहे. 'ग्रामीणते'चा संबंध ग्रामाशी, खेड्याशी आहे. ग्राम म्हणजे अनागर खेडे किंवा वस्ती. ग्रामीणता म्हणजे कृषिकेंद्रित ग्रामजीवन, गावगाडा आणि गावगाड्याचे प्रतिनिधित्व करणारे काळी-पांढरीचे घटक म्हणजेच शेतकरी-कृषिवल, बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार, कारू-नारू, फिरस्ते इत्यादी घटकांचे जीवनदर्शन घडविणारी प्रवृत्ती. ग्रामीणता या संज्ञेत ग्रामविभागातील कृषिकेंद्री जीवन, गावगाडा, बलुतेदार, अलुतेदार, कारू-नारू, फिरस्ते इत्यादींचे समग्र चित्रण अपेक्षित असते. त्रिं. ना. आत्रे आपल्या 'गावगाडा' या पुस्तकात म्हणतात, ''खेडणे म्हणजे जमीन कसणे, जमीन करणारा तो 'खेडूत'. प्रथम जमीन कसणारा 'खेडूत' आला, तो शेतकरी वस्ती करून शेती करू लागला, नंतर त्याच्यावर (अन्नावर) अवलंबून असणारा आणि शेतीसाठी उपयुक्त हत्यारे-अवजारे पुरविणारा, कष्ट करणारा बलुतेदार-अलुतेदार वर्ग निर्माण झाला. कारू-नारू, फिरस्ते हे गावगाड्याचे दुय्यम घटक नंतर निर्माण झाले.''[१४] कृषिकेंद्री जीवन जगणारे शेतकरी, बलुतेदार-अलुतेदार, कारू-नारू, फिरस्ते

इ. गावगाडा म्हणजे 'खेडे'. गावगाड्याचे भाग म्हणजे काळी-पांढरी. काळी म्हणजे शेतीयोग्य सुपीक जमीन, तर वसाहत असलेला खेडाचा भाग म्हणजे 'पांढरी' होय.

प्रादेशिकता आणि ग्रामीणता ह्या परस्परपूरक, धूसर सीमारेषा असलेल्या वाङ्मयीन प्रवृत्ती आहेत. प्रादेशिकतेत ग्रामीणता समाविष्ट असतेच. मराठी समीक्षाव्यवहारात 'ग्रामीणता' हे विशेषण समजले जाते. ग्रामीण लोकांची जगण्याची रीत म्हणजे 'ग्रामीणत्व' होय. 'ग्रामीणता' साकार होण्यामागे कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता, त्यातून निर्माण झालेले लोकमानस हे घटक महत्त्वाचे असतात. साहित्यातील ग्रामीणतादेखील वरील घटकांच्या चित्रणातून दृग्गोचर होते. खेड्याची रचना, खेड्याची शेतीकेंद्रित अर्थव्यवस्था, जीवनरीती, समाजव्यवस्था, भू-प्रदेशातील निसर्ग अशा बाबींचा समावेश 'ग्रामीणते'त होतो. या बाबींचे साहित्यातील प्रकटीकरण म्हणजे 'साहित्यातील ग्रामीणता' होय. साहित्यातील ग्रामीणतेमध्ये वास्तव आणि कल्पनिक यांचा ताळमेळ साधला जातो. साहित्यातील ग्रामीणता ही वास्तव ग्रामीणतेचे कल्पनीय वास्तव चित्र असते. साहित्यातील ग्रामीणता हे कल्पनीय वास्तवच असते.

प्रादेशिकता आणि ग्रामीणता : एक तुलना :

प्रादेशिकता हा शब्द वापरताना त्या-त्या प्रदेशातील समूहसापेक्ष ग्रामीण लोकजीवन असाच अर्थ अभिप्रेत असतो. ग्रामीण म्हणून जी जी वैशिष्ट्ये अपेक्षित असतात, ती सर्व खरे तर प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये असतात. ग्रामाच्या समुदायातून प्रदेशनिष्ठ जीवनशैली, वैशिष्ट्ये आणि संस्कृती अभिव्यक्त होत असते. अनेक मराठी समीक्षकांनी 'प्रादेशिकता' आणि 'ग्रामीणता' या प्रवृत्तीत फरक नाही, असे सांगितले आहे. 'प्रादेशिकते'त आणि 'ग्रामीणते'त फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केला आहे. ''प्रादेशिकतेचे ग्रामीणत्वाशी निश्चितच काही बाबतीत साम्य असते, परंतु या दोन्ही संज्ञा एक नव्हेत''[१५] हे सांगताना त्यांनी ''प्रादेशिक साहित्य हे ग्रामजीवन आणि ग्रामसंस्कृतीतील एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला महत्त्व देते. कधी प्रादेशिक साहित्यात ग्रामजीवन आलेच, तर ते स्वतंत्रपणे येत नाही, ते चित्रण त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा भाग म्हणून येते. ग्रामसंस्कृतीपेक्षा त्या

प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो'', असे म्हटले आहे.[१६] म्हणजेच प्रादेशिक साहित्यातील प्रादेशिकतेला समग्र प्रदेशविशिष्ट भाग हा ग्रामसंस्कृतीपेक्षा महत्त्वाचा असतो, असे म्हणता येईल. असे असले, तरी प्रादेशिकतेत त्यांनी म्हटल्याप्रमाणे प्रदेश येतोच. परंतु संबंधित ग्रामजीवन चित्रणाला तितकेच महत्त्व असते. म्हणजेच प्रादेशिकतेत प्रदेशाबरोबरच ग्रामीण संस्कृती, जीवन, ग्रामीणता अलग करता येत नाही.

प्रादेशिकतेत 'समूहमानसाचा' गजर असला, तरी सामूहिक मानस हे 'लोकमानसाचे' विस्तृत आणि व्यापक रूप असल्याने प्रादेशिक साहित्यातील प्रादेशिकतेत लोकमानसाचे दर्शन आवश्यक ठरते. थोडक्यात, समष्टिमूलकता, समूहचित्रण आणि वास्तवता हे प्रादेशिकतेत किंवा प्रदेशचित्रणात जसे महत्त्वाचे ठरतात, तसेच त्यातील ग्रामचित्रणही महत्त्वाचे असते. प्रादेशिकतेत प्रदेशाचे वास्तव आकलन, कृषिकेंद्रिकत्व, ग्रामीण लोकबोली, लोकसंस्कृती इ. घटकांना महत्त्व असते. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रादेशिकतेत 'समूहमनाचा गजर' आणि 'प्रादेशिकतेचे एका टप्प्यावरील समूहदर्शन', तर ग्रामीणतेत 'ग्रामीण लोकमानसाला महत्त्व' असते. हे फरक वगळता 'प्रादेशिकता' आणि 'ग्रामीणता' ह्या वर्णनात्मक संज्ञा समानार्थीच आहेत, असे म्हणता येईल. त्यामुळे 'प्रादेशिक' ही संज्ञा वापरणे अतिशय उपयुक्त ठरेल. कारण 'ग्रामीण लोकमानस' हे 'प्रादेशिक लोकमानस' असते, तसेच ग्रामीण म्हटल्या जाणाऱ्या साहित्यातदेखील 'समूह चित्रण' संभवू शकते. अतिव्याप्ती व अव्याप्ती या दोषांपासून मुक्त होण्यासाठी व्यापक अर्थाची 'प्रादेशिक' ही संज्ञा योग्य वाटते.

दुष्काळकेंद्री आशय असलेल्या निवडक कादंबऱ्यातील प्रादेशिकता :

'बळीबा पाटील' :

'बळीबा पाटील' ही सन १८८८ मधील कृष्णराव भालेकरलिखित कादंबरी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी मानली जाते. ही कादंबरी 'दीनमित्र'मधून क्रमश: 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' या नावाने प्रसिद्ध झाली. सदर कादंबरीत भालेकरांनी दुष्काळकेंद्री पार्श्वभूमीवर सत्यशोधकी विचारांची मांडणी केली आहे. 'बळीबा पाटील'मधील व्यक्तिरेखा, प्रदेश प्रतीकात्मक

स्वरूपाचा आहे. ही कादंबरी चार भागांत विभागलेली असून या कादंबरीमधून गावगाडा दृष्टिगोचर होतो. परंतु प्रदेश गोचर होत नाही. प्रादेशिकतेचा विचार केल्यास कादंबरीच्या पार्श्वभूमीवरून तो प्रदेश पश्चिम महाराष्ट्रातील वाटतो.

'पिराजी पाटील' :

'पिराजी पाटील' (१९०३) ही रा. वि. टिकेकर (धनुर्धारी) यांची कादंबरी तंत्रानुसार लिहिलेली पहिली यशस्वी ग्रामीण कादंबरी मानता येईल. एकूण १३ प्रकरणांत विभागलेली ही कादंबरी १३० पृष्ठांची असून दुष्काळ पार्श्वभूमीवर कुणबी शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती चित्रित करते. पिराजी पाटील यांची हकिकत सांगणाऱ्या, ग्रामीण चित्रणाने वास्तवपूर्ण बनलेल्या या कादंबरीतील प्रादेशिक जीवन वेगळे काढता येत नाही. प्रादेशिक जीवन हे वेगळे आहे, याची जाणीव धनुर्धारींना दिसत नाही. परंतु प्रदेश चित्रणाच्या वरवरच्या स्वरूपावरून त्यातील खेडे पश्चिम महाराष्ट्रातील खेडे वाटते. एकूणच बळीबा पाटील आणि पिराजी पाटील या कादंबऱ्यांतून आलेला दुष्काळ हा प्रदेशविशिष्ट न वाटता प्रतिनिधिक स्वरूपाचा वाटतो.

'कसे दिवस जातील' :

'कसे दिवस जातील' (१९२५) ही कादंबरी ना. वि. कुलकर्णी यांनी लिहिली आहे. सदर कादंबरीत आबा नावाच्या शेतकऱ्याच्या कुटुंबाची कथा असून कांदबरी आशय गांधीवादाने प्रेरित झालेला आहे. ह्या कादंबरीत दुष्काळ हा आशयातील गौण घटक असून केवळ घटना पुढे नेण्यासाठी दुष्काळाची योजना केल्यासारखी वाटते. सुशिक्षित वर्गाचे अन्नदात्याप्रती कोणते कर्तव्य असावे, याचा आदर्शवादी विचार ह्या कादंबरीत मांडला आहे. सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यातील कृष्णा, कोयना संगमावरील प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर कांदबरीतील कथानक घडते. 'प्रादेशिक' ही संज्ञा मराठी वाङ्मयात रूढ होण्यापूर्वीच या कांदबरीतून प्रदेशविशिष्ट चित्रण वास्तव आणि वस्तुनिष्ठ स्वरूपात आले आहे.

‘पाणकळा’ :

‘पाणकळा’ (१९३९) ही ‘र. वा. दिघे’ यांची कादंबरी स्वप्नरंजनात्मक आणि कल्पनाविलात्मक कथानकावर आधारित आहे. त्यातील प्रादेशिक, सामाजिक पार्श्वभूमी अस्सल आहे. दख्खन पठारावरील पूर्वभागातील पर्जन्यछायेच्या प्रदेशातील, पर्जन्यावर अवलंबून असलेल्या कृषिजीवनाचे चित्रण यात करण्यात आले आहे. ही कांदबरी ग्रामसुधारणावादी विचारांमुळे बोधवादी झाली आहे. इंग्रजी राजवटीखालील सजलपूर गावाची पार्श्वभूमी ह्या कादंबरीत आली असून दुष्काळ या घटकाला सदर कांदबरीत विशेष स्थान नाही. हे जीवन १९२१ साली नगर जिल्ह्याच्या राहुरीला अनुभवले, असे स्वत: लेखक म्हणतात. ह्या कादंबरीत प्रादेशिकतेची निश्चित चाहूल लागते.

‘बनगरवाडी’ :

‘बनगरवाडी’ (१९५५) ह्या कादंबरीतून व्यंकटेश माडगुळकरांनी माणदेशातील धनगर मेंढपाळाचे जीवनदर्शन घडविले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील विटे-आटपाडी या अवर्षणग्रस्त डोंगराळ प्रदेशातील खेड्यातील धनगरवाडी डोळ्यांपुढे साक्षात करण्याचे सामर्थ्य बनगरवाडीत आहे. या कादंबरीत दुष्काळ हा मुख्य आशयकेंद्र असून अवर्षणाभोवती घटनाचक्र फिरते. माणदेशातील बनगरवाडीचे सामूहिक दर्शन प्रादेशिकतेच्या पार्श्वभूमीतून घडताना दिसते.

‘शापित’ :

‘शापीत’ (१९८०) ही अरुण साधूंची कांदबरी भीषण दुष्काळात अस्तित्वासाठी दिशाहीन भटकणाऱ्या ग्रामीण समाजाची व्यथा व वेदना प्रकट करते. दुष्काळामुळे सर्व विदारक वास्तव, शोषक अधिकारी, संवेदनाहीन नागरी मानसिकता अशा अनेक पैलूंतून ‘शापित’ प्रकट होते. ‘शापित’चे कथानक मराठवाडा-बीड जिल्ह्यातील श्रीगोंदा, जामखेड या नगर जिल्ह्यातील प्रदेशात, तसेच रिंगणगाव नामक खेड्यात घडते. १९७२ सालच्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या या कथानकातून स्वतंत्र अशा प्रादेशिक भूभागाचे दर्शन घडते. पोटासाठी भटकंती करावी लागणाऱ्या दुष्काळग्रस्त कुटुंबाच्या प्रवासाचे चित्रण आले आहे. यातील मुंबईत घडणारे कथानक सोडले, तर

उर्वरित कथानक ग्रामीण भागातून आकाराला येते.

'चारापाणी' :

'चारापाणी' (१९८९) ही कादंबरी म्हणजे रा. रं. बोराडे यांनी १९८६ सालच्या 'होरपळ' या कथेला दिलेले विकसित कादंबरी स्वरूप होय. मराठवाड्यातील १९८५-८६ च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'चारापाणी'चे कथानक आकार घेते. पाणी आणि दुष्काळ या विषयांवरील दीर्घ चिंतनातून 'चारापाणी' आकाराला आली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बैलाच्या चारा-पाण्याचा प्रश्न ह्यात वास्तव स्वरूपात मांडला आहे. मराठवाड्याचा प्रदेश परिणामकारकपणे प्रकट होत नाही. मराठवाडा बोलीचा वापर केल्याने कथानक मराठवाड्यात घडते, याची जाणीव होते.

'तहान' :

'तहान' (१९९८) या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी पाणीप्रश्नाचे वास्तव कलात्मकपणे मांडले आहे. दुष्काळामुळे उद्भवलेली पाणीसमस्या ह्याच केंद्राभोवती 'तहान'चे कथानक फिरते. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील सारंगपूरमध्ये हे कथानक घडते. वऱ्हाडी बोलीतील संवादामुळे या कादंबरीला अधिकच कलात्मक रूप प्राप्त झाले आहे.

मराठी ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबऱ्यांतील प्रादेशिकता :

सन १८८८ पासून मराठी ग्रामीण कादंबरीचे लेखन सुरू झाले. सन १८८८ च्या 'बळीबा पाटील'पासून सन २००० पर्यंतच्या कालखंडाचे दोन टप्पे पाडल्यास सन १८८८ ते १९७५ पर्यंत १३८ ग्रामीण कादंबऱ्या आणि सन १९७५ ते २००० या कालखंडात १९० ग्रामीण कादंबऱ्या निर्माण झाल्या. या संपूर्ण कादंबऱ्यांतील प्रादेशिकता तपासून पाहणे शक्य नाही. परंतु महत्त्वाचे कादंबरीकार आणि काही महत्त्वाच्या कादंबऱ्या यांच्याद्वारे मराठी ग्रामीण-प्रादेशिक कादंबऱ्यातील 'प्रादेशिक' प्रवृत्तीचा मागोवा येथे घेण्यात आला आहे.

ग्रामीण कादंबरीच्या पायाभरणीचा कालखंड (१८८८ ते १९४०) :

सन १८८८ ते १९४० या कालखंडातील सन १९२५ पर्यंत मराठीत ग्रामीण आशयाच्या केवळ दोनच कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. 'बळीबा पाटील' (१८८८) आणि 'पिराजी पाटील' (१९०३) या प्रारंभीच्या ग्रामीण कादंबऱ्या दुष्काळ आशयावर बेतलेल्या आहेत. या कादंबऱ्यांत 'प्रादेशिकता' या प्रवृत्तीचा अभाव जाणवतो. या कादंबऱ्यांचे लेखक कृष्णराव भालेकर आणि धनुर्धारी (रा. वि. टिकेकर यांना 'प्रादेशिकता' ही स्वतंत्र प्रवृत्ती असते, याची जाणीव नव्हती, असे दिसते. या प्रारंभीच्या कादंबऱ्यांत 'प्रदेशविशिष्ट' चित्रण दिसत नाही.

रा. वि. टिकेकर आणि मराठी मातीचा पहिला दृकप्रत्ययी आविष्कार करणारे र. वा. दिघे यांच्यातील मधला टप्पा म्हणजे ना. वि. कुलकर्णी होय. 'खेडूत सृष्टीचे कादंबरीकार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या ना. वि. कुलकर्णी यांना 'प्रदेशविशिष्ट चित्रणाला प्रारंभ करणारे यशस्वी प्रवर्तक' म्हणता येईल. त्यांच्या 'कसे दिवस जातील' (१९२५), 'शिपाई' (१९२५), 'माणिक' (१९३१), 'पैसा' (१९२६) या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. प्रादेशिक ही संज्ञा रूढ होण्यापूर्वीच कुलकर्णी यांच्या कादंबऱ्यांतून 'प्रदेश विशिष्ट चित्रण' वस्तुनिष्ठ स्वरूपात प्रत्ययाला येते. त्यांच्या कादंबऱ्यांतून कऱ्हाड-सातारा हा प्रदेश दृग्गोचर होतो. त्यांच्या कादंबरीतील संवाददेखील कराडी बोलीतील जिवंतपणा प्रत्ययक्षम करतात.

स्वातंत्र्यपूर्व कालखंड (१९४० ते १९५०) :

१९३९ या वर्षी र. वा. दिघे यांची 'पाणकळा' कादंबरी प्रसिद्ध झाली आणि 'प्रादेशिकते'ची खाण मराठी साहित्याला गवसली. प्रादेशिकतेचे नवे अनुभवविश्व यातून वाचकांना परिचित झाले. 'पाणकळा'नंतर दिघ्यांच्या 'सराई', 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या', 'कार्तिकी' इ. कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या कादंबऱ्या स्वप्नरंजनाकडे झुकलेल्या असल्या, तरी 'प्रदेशविशिष्ट' चित्रणाने महत्त्वाच्या ठरतात. कथानक स्वप्नरंजनात्मक, कल्पनारम्य, परंतु व्यक्तिरेखा आणि कादंबरीची पार्श्वभूमी मात्र 'प्रादेशिकता' दृग्गोचर करणारी, असे दिघे यांच्या कादंबऱ्यांचे स्परूप आहे. फडके यांच्या तंत्रवादाने भारावून गेलेले

दिघे 'प्रादेशिकते'त मात्र सरस ठरतात. 'पाणकळा' ही कादंबरी दख्खनच्या पठारावरील पर्जन्यछायेच्या प्रदेशातील नगर जिल्ह्याचे वास्तव चित्रण करते, तर इतर कादंबऱ्या 'कोकण' प्रदेश दृग्गोचर करतात.

बी. रघुनाथ (भगवान रघुनाथ कुलकर्णी) हे ह्या कालखंडातील महत्त्वाचे कादंबरीकार होत. त्यांच्या 'आडगावचे चौधरी', 'हिरवे गुलाब', 'म्हणे लढाई संपली', 'बाबू दडके' इ. कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. बी. रघुनाथ यांनी निजामी राजवटीखालील मराठवाडा प्रदेश कादंबऱ्यांतून जिवंत केला. 'आडगावचे चौधरी' या कादंबरीतून चौधरी घराण्याच्या आठ-नऊ पिढ्यांचा पट ते उभा करतात. द्वितीय युद्धाच्या पार्श्वभूमीवर असलेली 'म्हणे लढाई संपली' या कादंबरीतून तत्कालीन मराठवाड्यातील वातावरण ते जिवंत करतात. 'हिरवे गुलाब' ही कादंबरी मराठवाड्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली उत्कृष्ट 'प्रादेशिक कादंबरी' असून ती हिंदू-मुस्लिम संबंधांवर बेतलेली आहे. वा. ब. कर्णिक यांची या कालखंडातील 'वाडगीण' ही कादंबरी वारली जमातीचे जीवन व्यक्त करते. विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' कादंबरीतून मांग-गारूडी जमातीचे जीवनचित्रण येते.

स्वातंत्र्योत्तर कालखंड (१९५० ते १९६०) :

सन १९५० ते १९६० हा कालखंड प्रादेशिक कादंबऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालखंड ठरतो. प्रादेशिक कादंबरीचा प्रवाह या कालखंडात मराठी समीक्षाक्षेत्रात बहुचर्चित होता. सन १९५० नंतरच्या दशकात प्रादेशिक कादंबरीचे वेगवेगळे आविष्कार प्रकट झाले. या दशकातील श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर हे लेखक प्रादेशिक कादंबरी लोकप्रिय करीत होते. श्री. ना. पेंडसे यांच्या 'एल्गार', 'हद्दपार', 'गारंबीचा बापू', 'हत्या', 'कलंदर', 'रथचक्र' या कादंबऱ्यांतून पेंडसे यांनी साखर-पेंडी, दापोली, मुरुड, हर्णे, आंजर्ले परिसरातील कोकणचा निसर्ग, समृद्ध प्रदेश तेथील मानवी जीवनासह चित्रित केल्यामुळे त्यांची प्रादेशिक कादंबरीकार म्हणून प्रतिमा निर्माण झाली. गो. नी. दांडेकरांच्या 'शितू', 'पडघवली', 'पूर्णामायची लेकरं' या कादंबऱ्यांत अनुक्रमे कोकण आणि वऱ्हाडी लोकजीवनाचे चित्रण आले आहे. 'माचीवरचा बुधा', 'पवनाकाठचा धोंडी' या कादंबऱ्यांतून पश्चिम महाराष्ट्रातील मावळ

प्रदेश दृग्गोचर होतो. 'जैत रे जैत'मधून दांडेकरांनी ठाकर या आदिम जमातीचे चित्रण केले आहे. गो. नी. दांडेकरांनी कुठल्याही एका प्रदेशाशी स्वत:ला बांधून न घेता महाराष्ट्रातील सर्व भागांचे चित्रण आपल्या कादंबऱ्यांतून केले आहे. दांडेकरांच्या कादंबऱ्यांतून गतकाळावरील आणि उदात्त मूल्यांवरील त्यांचे प्रेम, संस्कृतीबद्दल अभिमान आणि आदर, निसर्गावरील, निसर्गातील पशू-पक्षी यांवरील प्रेम व्यक्त होते. इतर कोकणी-प्रादेशिक लेखकांमध्ये जाणवणारा लैंगिकतेबद्दलचा चमत्कारिक गंड गोनीदांच्या कादंबऱ्यांत दिसत नाही.

व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी'त माणदेशातील उजाड आणि अभावग्रस्त खेड्याचे जीवन बोलीसह येते. 'वावटळ' या कादंबरीतदेखील माणदेशाचे प्रदेशविशिष्ट चित्रण, ग्रामव्यवस्था आणि गांधीहत्येनंतरची ब्राह्मणांची अगतिकता आविष्कृत झाली आहे. या कालखंडात दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तीरावर' ही कादंबरी मध्यप्रदेश-छत्तीसगढमधील आदिवासी तरुणीची कथा सांगते. ह. श्री. शेणोलीकरांनी 'मायणीची मंजुळा'मध्ये माणदेशात घडणारी अलौकिक प्रेमकथा चित्रित केली आहे. १९५० ची बोरकरांची 'भाविण' कादंबरी गोमांतक प्रदेश दृग्गोचर करते. सन १९५० नंतरच्या दशकात प्रादेशिकता ही महत्त्वाची गोष्ट सापडल्याची जाणीव साहित्यक्षेत्रात होती. या कालखंडात या संज्ञेचा वरचष्मा होता. साधारणत: सन १९५० च्या आसपास 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' कादंबरीचे चित्र परस्परविरोधी होते.'' असे नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात.[१७]

साठोत्तरी कालखंड (१९६० ते १९७५) :

या कालखंडातील 'फकिरा' (अण्णा भाऊ साठे), 'धग' (उद्धव शेळके), 'माझा गाव' (रणजित देसाई), 'इंधन' (हमीद दलवाई), 'टारफुला' (शंकर पाटील) या महत्त्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या मानता येतील. चिं. त्र्यं. खानोलकर आणि सुभाष भेंडे हे या कालखंडात अधिक उत्कटपणे प्रादेशिक भान व्यक्त करणारे कादंबरीकार आहेत. अण्णा भाऊ साठे 'फकिरा', 'वारणेचा वाघ' इ. कादंबऱ्यांतून वारणा खोऱ्याचा, सांगली-वाटेगावचा प्रदेश चित्रित करतात. साठे आपल्या कादंबऱ्यांतून स्वप्नरंजनात्मक वास्तव व्यक्त करतात. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त या जगाचे सत्यदर्शन त्यांच्या कादंबरीतून घडते.

लोककथा, लोकजीवन, गावगाडा, गावकामगारांचे संबंध यांचे समर्थ चित्रण 'फकिरा'तून घडते.

'रणजित देसाई' यांच्या 'बारी', 'माझा गाव', 'समिधा' या कादंबऱ्यांतून कोल्हापूरचा प्रदेश दृकप्रत्ययाला येतो. 'बारी' या कादंबरीत कोल्हापूर प्रदेशातील बेरड जमातीचे चित्रण येते, तर 'समिधा'तून दलित-सवर्ण यांच्यातील ताणतणावाचे दर्शन घडते. चिं. त्र्यं खानोलकर सन १९६० नंतरचे महत्त्वाचे प्रादेशिक कादंबरीकार मानले जातात. खानोलकरांच्या कादंबऱ्यातील निसर्ग गूढ, धुसर, संमोहित करणारा आहे. म्हणूनच मानवाच्या सर्व कृतींवर निसर्गाचे विलक्षण नियंत्रण आहे, असे खानोलकरांच्या कादंबरीतून जाणवते. खानोलकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा लैंगिक कामगंडाने आत्यंतिक ग्रस्त वाटतात. कामतृप्त किंवा काम अतृप्त झालेल्या स्त्रीव्यक्तिरेखा हेच खानोलकरांच्या प्रादेशिक कादंबरीचे वैशिष्ट्य होय. खानोलकरांनी 'रात्र काळी घागर काळी' (१९६२), 'कोंडुरा' (१९६६), 'चानी' (१९७०), इ. कादंबऱ्यांतून कोकणचे प्रादेशिक चित्रण केले आहे.

'सुभाष भेंडे' यांच्या 'आमचो गोंय आमका जाय' (१९६०), 'अदेशी', 'जोगीन' (१९७४) या कादंबऱ्यांतून गोमंतक दृग्गोचर होतो. 'आमचो गोंय आमका जाय'मधून गोवामुक्ती चळवळीच्या पार्श्वभूमीवर हिंदू-ख्रिश्चन समाजातील वास्तव, तर 'जोगीन'मधून ख्रिश्चन स्त्रीचा परंपरेविरुद्धचा आवाज व्यक्त केलेला दिसतो. याखेरीज डॉ. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीतून नारबाचे (सालगडी) एकाकी आयुष्य, त्याच्या आयुष्यातील पशूंचे स्थान आणि यंत्रयुगाने उद्‌धवस्त होणारे नारबाचे भावविश्व यांचे चित्रण कोल्हापूर-कागलच्या पार्श्वभूमीवर बोलीभाषेत आविष्कृत होते. उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०) ही कादंबरी वैदर्भीय प्रादेशिक जीवन कौतिक या व्यक्तिरेखेद्वारे जिवंत करते. 'धग'मध्ये वऱ्हाडी बोलीचे उपयोजन संवादात अकृत्रिमपणे येते. रा. रं. बाराडे यांच्या 'पाचोळा'त 'धग'प्रमाणेच शिंपी व्यवसाय करणाऱ्या गंगाराम आणि पारबती यांच्या कुटुंबाचे शोकात्म जीवन मराठवाडा प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर जिवंत होते.

ग्रामीण चळवळीचा कालखंड (१९७५ ते १९८०) :

या कालखंडातील ग्रामीण साहित्य प्रवाहात यादव, बोराडे या लेखकांबरोबर इतर लेखकही दिसतात. पुरुषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया' (१९८७) ही अस्सल प्रादेशिक कादंबरी पंजाबराव गरसोळीकर या पदवीधराचे भावचित्रण करताना पारंपरिक जीवनशैली आणि ग्रामीण संस्कृतीचा ऱ्हास यावर मार्मीक भान व्यक्त केले आहे. विदर्भातील अकोला जिल्ह्यातील भूली नदीच्या काठावरील गवराई गाव, तेथील पीकपाणी, पुर्णा नदी, गजाननमहाराजांचे शेगाव, सातपुड्यांच्या निळ्या रांगा, अंजनगाव सुर्जी आणि विविध सांस्कृतिक क्षेत्रांचे उल्लेख यात असून त्याद्वारे कादंबरीत सारा प्रदेश प्रत्ययक्षम होतो. मधुकर वाकोडे यांच्या 'झेलझपाट' (१९८८) या कादंबरीतून एकझिरा ते सलोन्याला जाणाऱ्या रस्त्यावरील कोरकू ठाण्याची पार्श्वभूमी साकार झाली आहे. अमरावती, परतवाडा, मेळघाट परिसरातील कोरकू आदिम जमातीशी निगडित प्रदेशविशिष्ट अशी ही कादंबरी आहे. बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुदू दे' (१९८५) ही ग्यानबा या असामान्य माणसाच्या संसाराची शोकांतिका विदर्भातील वाशिम अकोला परिसरातील पार्श्वभूमीवर साकार करते.

मराठवाडा परिसराच्या पार्श्वभूमीवर 'गांधारी' (ना. धों. महानोर), 'गणगोत' (गणेश आवटे), 'विषवृक्षाच्या मुळ्या' (वासुदेव मुलाटे) ह्या या कालखंडातील उत्कृष्ट प्रदेश विशिष्ट चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. पश्चिम महाराष्ट्राचे प्रदेशविशिष्ट चित्रण या कालखंडातील उत्तम बंडू तुपे यांच्या 'इंजाळ' (१९८४), बा. ग. केसकर यांच्या 'कुणाच्या खांद्यावर' (१८८४), राजन गवस यांच्या 'चौंडकं' (१९८५), 'भंडारभोग' (१८८८), आनंद पाटील यांच्या 'कागुद आणि सावली' (१९८६) आणि रामचंद्र पठारे यांच्या 'पाचर' (१९८९) या कादंबऱ्यांतून साकार होते. यांपैकी 'कुणाच्या खांद्यावर', 'पाचर' या कादंबऱ्यांतून अहमदनगर जिल्ह्यातील लोकजीवनाचे चित्रण येते. 'चौंडकं', 'भंडारभोग'मधून कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमाप्रदेशातील जोगत्या-जोगतीणींचे जीवनदर्शन घडते.'कागुद आणि सावली'मधून कोल्हापूर, मलकापूरजवळील निमकोकणातील शित्तुरगाव आणि परिसर साकार होतो.

कोकणच्या पार्श्वभूमीवर लेखन करणारे या कालखंडातील महत्त्वाचे लेखक म्हणजे मधू मंगेश कर्णिक. त्यांनी 'देवकी'मधून सावंतवाडी-गोवा परिसरातील

भाविणींचे जीवन रेखाटले आहे. 'भाकरी आणि फूल'मधून सिंधुदुर्ग-मालवण परिसरातील दलित जीवन त्यांनी रेखाटले आहे. जयवंत दळवी यांनी या कालखंडात 'महानंदा', 'सारे प्रवासी घडीचे' या कादंबरीतून आपू या मुख्य व्यक्तिरेखेच्या भावजीवनाच्या चित्रणातून बदलत्या कोकणाचे चित्र विनोदी शैलीत रेखाटले. सन १९८०-१९९० या कालखंडात व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव यांनी नवी क्षितिजे जवळ केली. या कालखंडात श्री. ना. पेंडसे ('तुंबाडचे खोत'), गो. नी. दांडेकर ('स्मरणगाथा', 'कुण्या एकाची भ्रमणगाथाब), मधु मंगेश कर्णिक ('देवकी', 'भाकरी आणि फूल'), जयवंत दळवी ('महानंदा', 'सारे प्रवासी घडीचे') प्रादेशिकतेच्या वेगळ्या वाटा आणि आविष्कार घडविताना दिसतात. त्याचबरोबर महादेव मोरे, रंगनाथ पठारे, उत्तम बंडू तुपे, आनंद पाटील, राजन गवस, वासुदेव मुलाटे यांनी नव्या आशा निर्माण केल्या आहेत. परंतु ग्रामीणतेची व्याप्ती आणि खोली रंगनाथ पठारे वगळता कोणालाही सापडलेली नाही.

निष्कर्ष :

दुष्काळकेंद्री आशय असलेल्या ग्रामीण-प्रादेशिक कादंबरीतील प्रादेशिकता तपासल्यानंतर आणि प्रारंभ ते सन १९९० पर्यंतच्या ग्रामीण-प्रादेशिक कादंबऱ्यांतील प्रादेशिकतेचा संक्षिप्त मागोवा घेतल्यानंतर काही निष्कर्ष हाती लागतात. ते खालीलप्रमाणे :

१. प्रारंभीच्या ग्रामीण कादंबरीच्या पायाभरणी कालखंडातील (सन १८८८ ते १९२५ पर्यंतच्या कालखंडातील) 'बळीबा पाटील' आणि 'पिराजी पाटील' या कादंबऱ्यांतील आशयचित्रणात प्रादेशिकता साकार होत नाही. मुळातच प्रादेशिकता ही प्रवृत्ती असते आणि ग्रामीण आशयाला प्रादेशिकतेमुळे वास्तवाभिमुखता येते, याची जाणीव या कादंबरीलेखकांना दिसत नाही.

(२) १९२५ नंतर ना. वि. कुलकर्णी यांनी आपल्या कादंबऱ्यांत 'प्रादेशिकता' ही संज्ञा रूढ होण्यापूर्वीच 'प्रदेशविशिष्ट चित्रणाला' वस्तुनिष्ठ स्वरूपात साकार केले आहे.

(३) १९३९ नंतर दिघ्यांनी आपल्या कादंबरी लेखनाद्वारे प्रादेशिक जीवनचित्रणाला प्रारंभ करून मराठी कादंबरीला आशयदृष्ट्या समृद्ध केले.

मात्र या कालखंडातील लेखकावर फडकेप्रणित 'तंत्रवादा'चा जबरदस्त पगडा असल्यामुळे वास्तवाभिमुखतेपेक्षा रंजकता, स्वप्नरंजनात्मक, कल्पनाचमत्कृतीपूर्ण कथानकाचा आविष्कार झालेला दिसतो. तरी प्रादेशिक पार्श्वभूमी, व्यक्तिरेखाटने मात्र अस्सल आहेत, असे दिसते.

(४) सन १९५०-१९६० या कालखंडात 'प्रादेशिक' संज्ञेचा वरचष्मा असलेला दिसून येतो. प्रादेशिक कादंबऱ्यांचा हा प्रवाह श्री. ना. पेंडसे आणि गो. नी. दांडेकरांनी लोकप्रिय केला. सन १९५० नंतरच्या दशकात 'प्रादेशिक' कादंबऱ्यांचे वेगवेगळे आविष्कार झाले. माडगुळकरांच्या 'बनगरवाडी'मुळे प्रादेशिक जीवनाच्या वैशिष्ट्यांनी नटलेली वैशिष्ट्यपूर्ण टप्प्यावरची कादंबरी निर्माण झाली.

(५) प्रादेशिक कादंबऱ्यांचा सशक्त प्रवाह सन १९५० ते १९८० पर्यंत म्हणजेच श्री. ना. पेंडसेंपासून सुभाष भेंडे यांच्यापर्यंत अधिकाधिक वृद्धींगत झाला. नंतरच्या कालखंडात मात्र ह्या प्रवाहाला सशक्त प्रादेशिक चित्रण करणाऱ्या लेखकांच्या अभावी गतानुगतिकता आलेली दिसते.

(६) १९८० नंतर मधू मंगेश कर्णिक, जयवंत दळवी, पुरुषोत्तम बोरकर, मधुकर वाकोडे, रंगनाथ पठारे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून प्रादेशिक चित्रणाला नवनवीन आयाम दिले.

(७) कोकणी प्रादेशिक कादंबरींचे लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये लैंगिक गंड दिसून येतो. उदा. खानोलकरांच्या प्रादेशिक कादंबरीतील निसर्गचित्रण गूढतेकडे आणि व्यक्तिरेखा कामासक्तीकडे किंवा विरक्तीकडे जाताना दिसतात. स्त्रियांचा चोळामोळा करून टाकणारे पुरुष आणि सौंदर्यवान असूनही अभागी राहण्याचे भागधेय वाट्याला येणाऱ्या स्त्रीव्यक्तिरेखा हे खानोलकरांच्या कादंबऱ्यांचे विशेष सांगता येते.

(८) १९९० नंतर कादंबऱ्यांतून ग्रामीण-प्रादेशिक वास्तव अधिक प्रखरतेने मांडण्यास सदानंद देशमुख, विश्वास पाटील, रवींद्र शोभणे इत्यादींनी सुरुवात केली.

(९) ग्रामीण कादंबरीचा प्रारंभ कालखंड सन १८८८ पासून २००० पर्यंतच्या निवडक दुष्काळकेंद्री आशयावर बेतलेल्या कादंबऱ्यांतील 'प्रादेशिकते'चा अभ्यास केल्यास असे दिसते की, प्रारंभीच्या 'बळीबा पाटील' आणि 'पिराजी

पाटील'मध्ये 'प्रादेशिकता' दृग्गोचर होत नाही. 'ग्रामीणता' ही प्रवृत्तीदेखील या कादंबऱ्यांत परिपूर्ण साकार होत नाही. ना. वि. कुलकर्णी यांची 'कसे दिवस जातील' (१९२५) ही कादंबरी कराड-साताऱ्याकडील प्रदेशाचे वस्तुनिष्ठ चित्रण करते. परंतु दुष्काळाची भीषणता दृकप्रत्ययाला आणण्यापेक्षा सुशिक्षित तरुणाची शेतकऱ्याप्रती असलेली कणव, कर्तव्यबुद्धी आणि शेतकऱ्याचे द्रारिद्र्य या आशयाला येथे महत्त्व दिलेले दिसते. 'गांधीवादा'चा या कादंबरीवर विलक्षणरित्या प्रभाव जाणवतो.

(१०) 'पाणकळा'मधून दुष्काळाची पार्श्वभूमी येते, मात्र ती संदर्भ लावल्याप्रमाणे येते. परंतु 'पाणकळा'तून 'प्रादेशिक कादंबरी'ची निश्चित चाहूल लागते. 'पाणकळा'तील कथानक स्वप्नरंजनात्मक असले, तरी व्यक्तिरेखा, प्रादेशिक जीवनचित्रण मात्र अस्सल आहे. 'पाणकळा'तून दख्खनच्या पूर्व भागातील पर्जन्यछायेच्या प्रदेशातील नगर जिल्ह्याचे 'प्रदेश विशिष्ट' चित्रण दृकप्रत्ययक्षम होते. व्यंकटेश माडगुळकरांची 'बनगरवाडी' माणदेशाला प्रत्यक्षपणे इंद्रियसंवेद्य करते. 'बनगरवाडी'तील दुष्काळाची भीषणता 'प्रादेशिकते'च्या घटकातून गोचर होते.

(११) 'शापित' (१९८०) या कादंबरीतून दुष्काळाची भीषणता, अस्मानी-सुलतानी संकटाने हतबल झालेल्या ग्रामीण जीवनाची शोकांतिका मराठवाड्यातील बीड जिल्हा, नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, जामखेड परिसर या प्रदेशविशिष्ट पार्श्वभूमीवर आविष्कृत होते. रा. रं. बोराडे यांच्या 'चारापाणी'त मराठवाडी बोलीशिवाय 'प्रादेशिकते'चे घटक परिपूर्णरित्या आविष्कृत होत नाहीत. दुष्काळाची भीषणतादेखील वृत्तांतकथनासारखी चारापाणी प्रश्नाभोवती फिरते.

(१२) 'तहान' या कादंबरीतून सदानंद देशमुख दुष्काळाची भीषणता, पाणीटंचाईचा प्रश्न मांडतात. बोलीभाषेचा संवादातील वापर, ग्रामीण वातावरणाचा प्रत्यय यातून ग्रामीणता दृग्गोचर होते. 'तहान'मधून बुलढाणा-चिखली परिसरातील सारंगपूर गाव आविष्कृत होते. मात्र 'प्रादेशिकता' परिपूर्णरित्या प्रकट होत नाही.

(१३) दुष्काळकेंद्री आशयावर बेतलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा एकत्रित विचार केला असता असे दिसते की, सन १८८८ ते सन १९२५ या

कालखंडात ग्रामीण आशयावरील कादंबऱ्यात 'प्रादेशिकता' दिसत नाही. सन १९२५ नंतर 'प्रादेशिकते'चा विकास हळूहळू होताना दिसतो. मात्र 'प्रादेशिक वास्तव' स्वप्नरंजनात्मक पातळीवर राहते. सन १९५० नंतर प्रादेशिकता परिणामकारकरित्या आविष्कृत होताना दिसते. दुष्काळाचे वास्तव 'प्रदेशविशिष्ट' घटकांच्या माध्यमातून प्रत्ययाला येते. सन १९८० पर्यंत 'प्रादेशिकता' प्रवृत्ती ग्रामीण–प्रादेशिक कादंबऱ्यांत ठळकपणे जाणवते. सन १८८० नंतर मात्र कादंबरीतील 'प्रादेशिकता' प्रवृत्ती गतानुगतिक झाल्यासारखी वाटते. १९८० नंतरच्या कादंबऱ्यात 'प्रादेशिकता' परिपूर्णरित्या साकार होत नाही.

(१४) 'प्रादेशिकता' आणि 'ग्रामीणता' ह्या दोन्ही संज्ञांत काही फरक असला, तरी त्या 'समानार्थी' वाटतात.

(१५) सन १९६० पर्यंत ग्रामीण आशयावरील कादंबरीला 'प्रादेशिक' ही संज्ञा रूढ होती. परंतु सन १९६० नंतर मात्र 'ग्रामीण' संज्ञेचा वरचष्मा राहिल्याचे दिसते.

समारोप :

सन १९५० ते सन १९८० पर्यंत मराठी कादंबऱ्यांत प्रादेशिकतेचा विकास झाला. सन १९८० नंतर मात्र प्रादेशिकता ही प्रवृत्ती साचल्यासारखी, गतानुगतिक झाल्यासारखी वाटते. सन १९९० नंतर वैदर्भीय जीवनावर कादंबरीलेखन करणारे रवींद्र शोभणे हे नाव प्रादेशिकतेच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रणामुळे या प्रवाहात आश्वासक वाटते. त्यांच्या 'प्रवाह', 'रक्तध्रूव', 'कोंडी' या कादंबऱ्या प्रादेशिक जीवन आशयाच्या चित्रणात प्रभावी वाटतात. 'पांढर' (२००९) ही कादंबरी प्रादेशिकतेच्या सर्व कसोट्यांवर उतरणारी आणि प्रादेशिकतेच्या प्रवाहातील, पूर्वसुरींच्या प्रभावातून आविष्कृत झालेली सकस निर्मिती आहे. पुढे 'पांढर' कादंबरीचे आकलन आणि मूल्यमापन चिकित्सक दृष्टीने करण्यात येणार आहे.

संदर्भ आणि टिपा :

१. पाहा, प्रेमचंद : 'कुछ विचार', सरस्वती प्रेस, बनारस, प्र. आ., १९४९, पृ. ३८
२. कुलकर्णी श्री मा., 'कादंबरीची रचना', उन्मेष प्रकाशन, नागपूर, प्र. आ. : १९५६, पृ. १५
३. बापट-गोखले, 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हिनस प्रकाशन, पुणे, तृ. आ. : १९७३, पृ. ७३
४. बेडेकर दि. के., 'साहित्य विचार', लोकवाङ्मय गृह, मुंबई, दु. आ. : २००७, पृ. २६६
५. जोग. ल. ग., 'मराठी साहित्याचे अंत:प्रवाह : कादंबरी', चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पृ. ९४
६. यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वि. आ. : १९८४, पृ. ७६
७. कुलकर्णी अनंत (संपा.), 'मराठी कादंबरीची वाटचाल' (रौप्य महोत्सवी स्मरणिका), 'कुलकर्णी ग्रंथकार', पृ. १३२
८. यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. : १९८१, पृ. ७६
९. कुलकर्णी मदन, 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ. : १९८४, पृ. २४
१०. यादव आनंद, उ. नि., पृ. ७६
११. पाहा, कुलकर्णी मधू, 'ग्रामीण साहित्य व साहित्य प्रकार', म.सा.प.पत्रिका, जुलै-डिसेंबर १९८०, पृ. ४५
१२. पाहा, मंचरकर रत्नाकर, 'ग्रामीण कादंबरी : १९६० ते १९८० आणि नंतर' लेखातून उद्धृत, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' (सं. चंद्रकुमार नलगे), सुरेश एजन्सीज्, पुणे १९९६, पृ. ७२
१३. शेळके भास्कर, 'मराठी कादंबरीतील प्रादेशिकता', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे प्र. आ. : १९९७, पृ. १२
१४. आत्रे त्रिं. ना. 'गावगाडा', वरदा प्रकाशन, पुणे, १६, पृ. १,२
१५. कोतापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', ('ग्रामीण

आणि प्रादेशिक : स्वरूप विचार' या लेखातून उदधृत), मेहता पब्लिकेशन, सन १९८५, पृ. १६.

१६. तत्रैव, पृ. १६

१७. तत्रैव, पृ. १६.

***

रवींद्र शोभणे यांचा परिचय

'पांढर' (२००९) या कादंबरीचे लेखक डॉ. रवींद्र केशवराव शोभणे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील खरसोली या गावात १५ मे १९५९ रोजी झाला. खरसोलीच्या आदर्श विद्यालयातून त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण नरखेड येथे, तर पदव्युत्तर शिक्षण नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून झाले. नागपूर विद्यापीठ, नागपूर येथून त्यांनी 'कादंबरीकार श्री. ना. पेंडसे' या विषयावर प्रबंध सादर करून १९८९ साली पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्राप्त केली.

प्रा. डॉ. रवींद्र शोभणे हे सध्या नागपूर येथील 'धनवटे नॅशनल कॉलेज' येथे मराठी विषयाचे विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. कथा, कादंबरी, नाटक, कविता, समीक्षा, ललित अशा विविध साहित्यप्रकारांत लेखन करणाऱ्या डॉ. रवींद्र शोभणे यांची २०व्या वर्षी पहिली कविता, पहिला समीक्षात्मक लेख आणि पहिली कथा प्रकाशित झाली. सुरुवातीपासूनच वाचनाची प्रचंड आवड असलेले हे व्यक्तिमत्त्व सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय सांस्कृतिक, प्रांतीय स्थित्यंतराचा अभ्यास करीत, परिस्थितीचे डोळसपणे अवलोकन करीत लेखक म्हणून घडत गेले. इ. स. १९८३ मध्ये वयाच्या ३४व्या वर्षी त्यांची 'प्रवाह' ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली. 'सव्वीस दिवस' यासारखी स्वानुभाव कथनात्मक लघू कादंबरी लिहिणाऱ्या रवींद्र शोभणेंच्या लेखणीतून 'उत्तरायण' ही महाभारतावर आधारित बृहद कादंबरी आकारास आली आहे. १९९२ सालामध्ये प्रकाशित झालेल्या 'कोंडी' या कादंबरीने त्यांना खऱ्या अर्थाने कादंबरीकार म्हणून लौकिक मिळवून दिला. वैदर्भीय प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये, वैदर्भीय बोलीभाषा, तेथील व्यक्तिमत्त्वे, त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, त्यांचा सांस्कृतिक वारसा, त्यांचे राजकीय डावपेच या सर्वांचे वास्तव चित्रण करीत विलक्षण ताकदीने शोभणे यांनी 'कोंडी'चे कथानक उभे केलेले आहे.

मानवी वास्तवाचा नवस्पर्श लाभलेल्या महाभारतावरील 'उत्तरायण' या बृहद कादंबरीला मराठी पौराणिक कादंबरीविश्वात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

१९७५ ते १९८४ या कालखंडातील महाराष्ट्रीय, तसेच भारतीय समाजजीवनातील ऱ्हासपर्वाचे, विविध राजकीय पक्ष, संघटनाचे, आणीबाणीनंतरच्या राजकीय जीवनाचे असे बहुकेंद्री पडसाद 'पडघम' या महाकादंबरीमध्ये उमटलेले आहेत. त्यांची 'रक्तध्रुव' ही आगळ्या आशयाची आणि विचारप्रवृत्त करणारी कादंबरीदेखील उल्लेखनीय अशीच आहे.

कथालेखक म्हणूनही डॉ. रवींद्र शोभणे परिचित आहेत. १९९१ सालामध्ये यांचा 'वर्तमान' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर १९९४ ते २००८ या काळात त्यांचे 'दाहीदिशा', 'शहामृग', 'तद्भव', 'अदृष्टाच्या वाटा' असे पाच कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

'कांदबरीकार श्री ना. पेडंसे' (१९९६), 'सत्त्वशोधनाच्या दिशा', 'संदर्भासह' अशी त्यांची समीक्षात्मक पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत. 'कथांजली' आणि 'मराठी कविता : परंपरा अणि दर्शन' इ. पुस्तकांचे संपादन डॉ. शोभणे यांनी केलेले आहे. 'ऐशा चौफेर टापूत', 'महाभारताचा मूल्यवेध' हे ललित लेखसंग्रह अनुक्रमे २००७ आणि २०१० सालामध्ये प्रकाशित झाले आहेत.

वास्तवाचे भान ठेवत सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्वच स्थित्यंतरांची वैशिष्ट्ये डॉ. रवींद्र शोभणे यांनी आपल्या साहित्यप्रकारातून जपली आहेत. सामाजिक परिवर्तनाचे ग्रामीण व नागरी समाजजीवनावर होणारे अनुकूल अणि प्रतिकूल परिणाम टिपत कथा, कादंबरी, समीक्षा, ललित अशा साहित्यप्रकारांत आकारात आलेल्या त्यांच्या साहित्याने आपले वेगळेपण जपले आहे. बोलीभाषेचा गोडवा, संवादशैली, कथा-कादंबरीच्या आशयाशी एकरूप होत जाणारी संवादाची लयबद्धता, अस्सल वऱ्हाडी भाषेची जाणीवपूर्वक केलेली योजना त्यांच्या कथा-कादंबऱ्यांना जिवंतपणा आणि कलात्मक रूप देताना दिसतात.

***

रवींद्र शोभणेकृत ‘पांढर’ कादंबरी : अभिव्यक्ती

प्रास्ताविक :

कादंबरी किंवा कोणत्याही कथात्म साहित्यात आशय महत्त्वाचा असतो. कादंबरीतील आशयातून लेखक मानवी जीवनदर्शन, जीवनशोध मांडत असतो. कादंबरीतील आशयाला आकृतिबंध प्राप्त होण्यासाठी किंवा मूर्तरूप प्राप्त होण्यासाठी कादंबरीकार विविध अभिव्यक्तिरूपांचा सूत्रबद्ध पद्धतीने वापर करून कादंबरीला मूर्त रूप देत असतो. कादंबरीरचनाबंधाच्या घटकांचा समावेश अभिव्यक्ती घटकात होतो. वाङ्मयीन परिशीलनात घटनाप्रसंग, व्यक्तिरेखाटन, निवेदन शैली, भाषा शैली इत्यादी घटकांना अभिव्यक्तीतंत्राचे घटक मानता येईल. कादंबरीच्या अभ्यासात कादंबरीच्या अभिव्यक्तीरूपांचा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरतो. अभिव्यक्तीतंत्राचे घटक अभ्यासताना कादंबरीनिर्मितीचे एकेक धागे आपण उलगडू शकतो आणि साहित्यनिर्मितीप्रक्रियेचा बोध घेऊ शकतो.

‘पांढर’ कादंबरीतील घटनाप्रसंग :

कथात्म साहित्यात घटनाप्रसंगाचे निवदेन केले जाते. घटना हा कादंबरीतील लघुतम घटक असून हा कादंबरी ह्या वाङ्मय प्रकाराचा आत्मा मानला जातो. कादंबरीकार घटनाप्रसंगातून कथानक मांडत असतो. कादंबरीची संरचना घटनाप्रसंगाच्या माध्यमातून गोचर होत असते. कथानक आणि घटनाप्रसंग यांचा सबंध परस्परपूरक असतो. कथानक आणि घटनाप्रसंग यांना एकमेकांपासून अलग करता येत नाही.

‘पांढर’ ही कादंबरी घटनामालिकेची विस्तृत गुंफण असलेली घटनाप्रधान कादंबरी आहे. यातून घटनामालिकेच्या प्रत्ययकारी गुंफणीतून आशयघन कथाबीज मूर्त रूपात साकार होते. दुष्काळकेंद्री आशयावर बेतलेली ही कादंबरी दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीच्या भीषणतेतून शेतकरी आत्महत्येसारख्या, पाणीप्रश्नासारख्या ज्वलंत समस्येवर भाष्य करते. एखाद्या गंभीर विषयावरील

डॉक्युमेंट्रीप्रमाणे लेखकाचा दृशक (कॅमरा) गावात वेगाने फिरतो आणि घटनाप्रसंगाचे चित्रण करताना दिसतो. कादंबरीत कोणीही एक व्यक्ती केंद्रवर्ती नायक नसून संपूर्ण खरसोली गावच नायकाच्या रूपात घटनाप्रसंगातून साकार होते. दीड-दोन पानी प्रसंगात लेखक आलटून-पालटून अनेक व्यक्तिरेखांच्या जगण्यातील प्रसंग चित्रित करतो. हे प्रसंग म्हणजे प्रत्येक व्यक्तिरेखेवर एकामागोमाग एक कोसळलेली संकटमालिकाच आहे. दुष्काळामुळे गाव पांढरीची झालेली दुर्दशा घटनाप्रसंगाच्या माध्यमाद्वारे चित्रमय शैलीत दृश्यात्मक बनते. बळीराजाच्या वेदनेचे दर्शन घटनामालिकेतून घडते. एका अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाचे (दुष्काळ, शेतकरी आत्महत्या इ.) बखरीकरणसदृश्य स्वरूप म्हणूनदेखील 'पांढर'मधील घटनाप्रसंगाकडे पाहता येईल.

'पांढर' ही कादंबरी पाच भागांत विभागलेली असून त्यांमध्ये घटनामालिकेचे व्यापक आणि शृंखलाबद्ध चित्रण करण्यात आले आहे.

भाग : एक :

'पांढर' कादंबरीचा प्रारंभ नैसर्गिक वातावरणाच्या चित्रमय वर्णनातून होतो. पाऊस पडण्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागोराव कडूच्या मनातील आशाळभूत विचार व्यक्त होताना दिसतात. नागोरावच्या मनोगतातून एकाच वेळी दुष्काळाची भीषणता, दाहकता आणि मानवी दुर्दम्य आशावाद प्रकट होतो. तीन एकर शेतीचा मालक असलेला अल्पभूधारक नागोराव कडू दुग्ध व्यवसायातून आपला उदरनिर्वाह भागवताना दिसतो. त्याच्या संज्ञाप्रवाही मनोगतातून खरसोली गावाला दुष्काळामुळे आलेली अवकळा दृग्गोचर होताना दिसते. 'पांढर' कादंबरीच्या प्रस्तुत भागात खरसोली पंचक्रोशीतील अवर्षणामुळे आलेली नापिकी, उदरनिर्वाहाचे प्रश्न, पाणीटंचाई यांवर घटनाप्रसंगातून कलात्मक भाष्य होताना दिसते. सलग दोन वर्षांच्या दुष्काळानंतरही पावसाचा मागमूस दिसत नाही. लेखकाने दुष्काळामुळे त्रासलेल्या शेतकरी कास्तकारांचे मनोगत प्रातिनिधिकपणे नागोरावच्या मनोगतातून मांडले आहे.

तीव्र पाणीटंचाईमुळे खरसोली ग्रामस्थांचे पाण्याचे हाल, पाणी टँकरचा नरखेडहून होणारा अनियमित पुरवठा, पाणीवाटपावरून होणारी भांडणे, शहरी टँकरचालकाची अमानवी, संवेदनहीन वागणूक, तसेच यांमुळे गांवकरी आणि

टँकरचालकाबरोबर होणारी खडाजंगी चित्रित केली आहे. याप्रसंगी तरुण पिढीची अवाजवी दखल परिस्थिती जास्तच चिघळण्यास कारणीभूत ठरताना दिसते. पांढरी गावात होणाऱ्या ह्या कलहनाट्यामुळे दलित वस्तीत पाणी मिळू शकत नाही. हैराण झालेले महार, मांग, गोंड हे समाजघटक सरपंच गौतम मडावीच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढतात. सदर बाब माजी सरपंच साहेबराव पाटील सामोपचाराने मिटवताना दिसतात. टँकर प्रकरणात वादंग माजवल्याबद्दल प्रकाश इंगोले, मुकुंदा इरपाते, वामन कुकडे या तरुणांना अटक होते.

अवर्षण स्थितीपासून सुटका व्हावी म्हणून समस्त गावकरी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्याचे ठरवतात. ''कास्तकारांच्या हातापायातं गोळे आले इची भेन! ह्या परिस्थितीनं पाऊसपानी असा रूसून बसला...''[१] यासारख्या नागोराव कडू आणि वासुदेव काळेच्या संवादातून प्रातिनिधिक स्वरूपात दुष्काळाच्या संकटामुळे निर्माण झालेली कास्तकारांची विमनस्कता प्रकट होताना दिसते.

सरपंच मडावीची पत्नी कांता ग्रामपंचायतीच्या विहिरीवर पाणी भरण्यास गेली असता दिसणारे पाण्याचे दुर्भिक्ष, साहेबराव पाटलांनी नदीपात्रात खणूनदेखील पाणी न लागणे इ. प्रसंगांतून पाण्यासारख्या मूलभूत गरजेचा तुटवडा आणि गावपांढरीतील प्राथमिक पातळीवर जगणारी माणसे उभी राहतात. टँकरद्वारे केला जाणारा पाणीपुरवठा आणि अगोदर पाणी कुणाला द्यायचे, यावरून दलित, सवर्ण समाजात कलह निर्माण होताना दिसतो. पाणीवाटपाचा मुद्दा सरपंच मडावीद्वारे सामोपचाराने मिटवला जातो.

वासुदेव काळे, त्याची पत्नी शकुंतला आणि त्यांच्यासमोर नापिकीबरोबर आपल्या मुलींच्या शिक्षणाची आणि लग्नाची काळजी यांसारखे प्रश्न उभे राहिलेले दिसतात. साहेबराव पाटील यांनी कामठाच्या संत्राबागेत ट्युबवेल खणूनदेखील पाणी लागत नाही. खोदण्याच्या भानगडीत प्रचंड खर्च आणि कर्ज मात्र होताना दिसते. सदर प्रसंगातून मोठ्या बागायती शेतकऱ्यांची दुष्काळाने केलेली फरफट प्रत्ययाला येते.

गावातील दुसरे सधन शेतकरी माणिकराव देशपांडे आपली जमीन छोट्या कास्तकारांना ठेक्याने, बटाईने देतात. साहेबराव पाटील यांच्यानंतर त्यांची शेती करणारा आणि राजकीय वारसा सांभाळणारा कोणीच नाही. कारण

त्यांचा मुलगा अनंतराव ह्याने नागपूरला स्थलांतर करून वकिली व्यवसाय पत्करला आहे. दुष्काळी वादळाने उडालेला धुरळा अनेकांना आजारी बनवतो. वादळामुळे जंगलू मांग याचा पत्रा घुसून मृत्यू होतो. त्याच्या बायकोला सांत्वना द्यायला आलेला खरसोलीचा गावकरी टँकर येताच तिकडे धाव घेताना दिसतो. या प्रसंगातून पाणीप्रश्नापुढे मानवी मुत्यूसारख्या महत्त्वाच्या घटनेला आलेली शूद्रता दिसून येते.

साहेबराव पाटील ट्युबवेल खणण्यासाठी कामठ्याची वाडी गहाण ठेवतो. दुष्काळापासून मुक्ती मिळावी म्हणून अखंड हरिनाम सप्ताह, मांग समाज धोंडीसारखे कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. दुष्काळामुळे निर्माण झालेली उदरनिर्वाहाची समस्या, सरपणचोरी यांसारख्या प्रकारात वाढ होताना दिसते. धुळीच्या वावटळीने सखु तेलीनीच्या दम्यात वाढ होते. पोटाची भूक भागवण्यासाठी खरसोलीतील गावकरी सरपण इंधन म्हणून नरखडेला विकण्याचा व्यवसाय करतात. मांगपुऱ्यातील पुरुष-स्त्रिया फडे विकण्याचा पारंपरिक धंदा करतात. साहेबराव पाटलांच्या बागेत शंभर फूट ट्युबवेल खोदूनदेखील पाणी लागत नाही. कर्ज काढून ट्युबवेल खणण्याचा प्रयत्न फोल ठरल्याने साहेबराव विमनस्क होतात.

दुष्काळग्रस्त खरसोलीचा वृत्तांत वर्तमानपत्रातदेखील व्यापक प्रमाणात येतो. अखंड हरिनाम सप्ताहानंतर कोसळणारा पाऊस बळीराजाला सुखावून जातो. त्यामुळे खरसोलीतील कास्तकार पेरण्या करतात. पेरणी करण्यासाठी लागणारे बी-बियाणे, शेतीमालखरेदी यासाठी खाजगी सावकाराकडून कर्ज काढताना दिसतात. साहेबराव पाटील यांच्या शेतीवर काम करणारे मातंग समाजातील मजुरी वाढविण्याचा आग्रह धरतात. परंतु कर्जाने नागावलेले साहेबराव सदर मागणी मान्य करतात. गावकऱ्यांच्या मनात आशा-निराशेचे खेळ निर्माण करणारा पाऊस खरसोली गावला चकवा देताना दिसतो. दुष्काळामुळे अगतिक झालेली माणसे दारुसारख्या व्यसनांच्या आहारी जाताना दिसतात.

वासुदेव काळेची मुलगी दीपाली हिला तालुका पातळीवर वक्तृत्व स्पर्धेत मिळालेले पहिले बक्षीस हीच एकमेव सुखदायक घटना कादंबरीत आली आहे. सावकाराचे देने भागवण्यासाठी, अब्रू-इभ्रत राखण्यासाठी, वाडी वाचवण्यासाठी साहेबराव हे आई सिंधू आणि पत्नी मंगला हिचे दागिने विकतात. व्यसनाने

बेहोश झालेले वामन कुकडे, प्रकाश इंगोले, मुकुंदा इरपाते, जंगल्या मांगाच्या विधवा बायकोचा (अनुसयाचा) विनयभंग करण्याचा प्रयत्न करतात. विनोद नारनवरे हा सुशिक्षित तरुण त्यांना तंबी देतो.

साहेबराव पाटील यांचा नागपूरहून आलेला मुलगा अनंता आपल्या गावात झालेले बदल, शेतीतील अनिश्चितता, शहरी वातावरण, अवर्षणामुळे गावाला आलेली अवकळा, पाणीटंचाई इ.चा विचार करताना दिसतो. अनंताला दुचाकीतून फेरफटका मारताना खरसोली गाव उदास, ओसाड, भकास आणि चैतन्य हरवल्यासारखे वाटते.

दुष्काळी वातावरणामुळे गावातील लोकांनी सुरू केलेले स्थलांतर, वर्गातील घटणारी विद्यार्थी पटसंख्या यांमुळे मुख्याध्यापकांसमोर रोजीरोटीचा प्रश्न उभा टाकलेला आहे. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आदिवासी सरपंच गौतम मडावीच्या हातून होणाऱ्या ध्वजारोहणाला उपसरपंच नत्थू इरपाते विरोध करतो. परंतु साहेबराव पाटील यांच्या मध्यस्थीनंतर सामंजस्याने तोडगा काढला जाऊन सरपंच मडावीच ध्वजारोहण करतो. नागोराव कडूची म्हैस सर्पदंशाने मृत होते. जित्राबाच्या निर्जीव कलेवराला पाहून नागोरावचा दाटून येणारा हुंदका आणि उरलेल्या दोन म्हशीचे आणि लहान हाल्याचे भेसूर रडणे वातावरणातील भीषणता वाढवताना दिसते. मृत म्हशीची विल्हेवाट लावण्याचे आणि मूठमाती देण्याचे काम सख्या चाभांर नाकारतो. रघू मांगदेखील या कामाची नागोरावकडून अधिक रक्कम घेतो. परंतु काम चोखपणे करत नाही. रघूने कुचराई केल्याने मृत म्हशीची कुत्र्या-गिधाडांकडून विटंबना होते. त्यामुळे संताप अनावर होऊन नागोराव स्वत:च मृत जित्राबाला मूठमाती देतो.

भाग : दोन :

कांदबरीच्या या टप्प्यात प्रारंभी कृषिवलांच्या जीवनातील महत्त्वाचा भाग असलेल्या बैलपोळ्याचा उल्लेख येतो. दुष्काळामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बळीराजा बैलाच्या अंगाला पाणी लावण्यापेक्षा पिण्यास वापरणे जास्त श्रेयस्कर मानताना दिसतो. बैलपोळा हा कृषीसंस्कृतीतील सण, सुगीच्या हंगामात येतो. त्यावेळी शेती, जमीन हिरवळीने नटलेली असते. माळरानावर रानफुले डुलत असतात. परंतु सलग दोन वर्षांच्या अवर्षणामुळे

खरसोलीतील जमिनी वाळून, भेगाळून जाते. ट्युबवेल प्रकरणी विफल होऊन अंतर्मुख झालेले साहेबराव घरातील स्त्रीधन वाडीसाठी गेल्याने वाडीचा विषय टाळतात. साहेबराव वैफल्यग्रस्त होऊन त्यांना निद्रानाशाचा विकार जडतो. प्रचंड नैराश्याची छाया त्यांच्यावर पडल्याची जाणीव प्रत्येकाला होत असते. अनंतरावाची शेतीबद्दलची रोखठोक व्यवहारिक भूमिका आणि स्वत:चे शेतीशी असलेले रक्ताचे-जीवाभावाचे नाते या द्वंद्वात साहेबराव अडकलेले दिसतात.

धनराज पुजारीला तीन मुली असूनदेखील त्याने मुलाच्या हट्टामुळे पत्नी प्रमिलावर लादलेले चौथे गरोदरपण प्रमिलाच्या बहिणीला (कावेरीला) पसंत नाही. कावेरी प्रमिलाला कुटुंबनियोजनाचे मार्ग, छोट्या कुटुंबाचे फायदे परोपरीने समजावून सांगते. कावेरीची छेड काढण्यापर्यंत गावातील प्रकाश इंगोले, मुकुंदा इरपाते या तरुणांची मजल जाते. या प्रसंगी ''चाल रे पक्या, पाव्हणी पाह्यली नं तुनं? मग चल, आता!''[२] या मुकुंदाच्या संवादातून तरुणांचे नैतिक अध:पतन दृष्टिक्षेपात येते.

वासुदेव काळेच्या मोठ्या मुलीच्या (सुरेखा) वरसंशोधनाचा प्रसंग लेखक रेखाटताना दिसतो. या प्रसंगात भारतीय विवाहसंस्थेतील हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथेचे दर्शन घडते. वराच्या हुंड्याच्या मागणीमुळे अगतिक होणारा वासुदेव या प्रसंगात उभा राहतो. दुष्काळामुळे आलेली नापिकीमुळे हुंड्याचे पैसे उभे करू न शकणारा बाप सदर प्रसंगात उभा राहतो. दीपालीला वडिलांच्या या अगतिकतेची जाणीव असल्याने तिच्या मनातील विवाहसंस्थेबद्दलचा तिटकारा, परात्मभाव ''मी लग्नच करणार नाही...''[३] या उद्गारातून व्यक्त होतो.

मागील वर्षी गणपतीउत्सवाची क्षणचित्रे पुढील प्रसंगात येतात. पाण्याअभावी कोरड्या विहिरीत केलेले मूर्तीचे विसर्जन यांसारख्या प्रसंगातून दुष्काळाची वास्तवता, पाण्याचे दुर्भिक्ष प्रकट होते. गणपतीउत्सवाकरिता नागपूरहून येणारा साहेबराव पाटील यांचा मुलगा अनंता यावर्षी गावाला येण्याचे टाळतो. भाद्रपद संपून अश्विन सुरू झाला, तरी न कोसळणारा पाऊस, त्यामुळे उडालेली खरसोली पंचक्रोशीची दैना निसर्गवर्णनातून प्रकटताना दिसते. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न या एका मागोमाग आलेल्या संकटांनी दुष्काळाची दाहकता गोचर होते. पिण्याच्या पाण्याला पैसे मोजावे लागतात, ही भीषण वास्तविकता प्रसंगातून दृग्गोचर झाली आहे.

एकीकडे पाण्यावाचून गावाची चाललेली दैना, या संकटाकडे स्थानिक आमदाराचा कानाडोळा आणि या मुद्याचे विरोधी पक्षातील शालिक बनसोडेकडून केले जाणारे राजकारण या पेचाने खरसोलीतील गावकरी पिचलेला आहे. शालिक बनसोडेकडून आयोजित केलेल्या सभेत दुष्काळाच्या परिस्थितीने उडवलेल्या दैन्यावस्थेचा पाढा वाचला जातो. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गावकरी रत्यावर उतरण्याचे ठरवतात. या प्रसंगाची दैनिकांनी, प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल आणि त्यामुळे शासनव्यवस्थेची उडालेली भंबेरी यामुळे शासकीय अधिकारी, आमदार शंतनुराव मोहिते, जिल्हा पालक मंत्री गावाला भेट देताना दिसतात. अधिकाऱ्यांच्या, नेत्यांच्या आश्वासनांनी गावकऱ्यांच्या मनात आशा पल्लवित होतात.

नागोराव कडूची दुभती म्हैस सर्पदंशाने गेल्याने त्याच्यासमोर उभा राहिलेला उदरनिर्वाहाचा प्रश्न, मुलगी शारदा हिच्या लग्नाचा निर्माण झालेला प्रश्न यांचेही चित्रण कादंबरीत येते. बेरोजगारीमुळे गावात वाढलेल्या भुरट्या चोऱ्या, इंधन म्हणून विकण्यासाठी चोरली जाणारी झाडे इ. अनेक घटनांमध्ये वाढ झालेली आहे. वासुदेव काळेच्या मुलीचे मुलताईच्या पोस्टातील कारकुनासोबत लग्न ठरते. परंतु दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नापिकीने, कर्जाने दबलेला वासुदेव हुंड्याची रक्कम संपूर्णपणे देऊ शकत नाही. विवाहसारख्या आनंददायी घटनेचे असे अनेक मन हेलावून टाकणारे पदर या प्रसंगात साकार होतात.

सरकारी अनुदानाने गावातील तहान भागवण्यासाठी साहेबराव पाटलांच्या कामठाच्या विहिरीची खोदाई करून तहान भागवण्यापुरते पाणी उपलब्ध होते. गोड पाणी पिण्याची सवय असलेल्या ग्रामस्थांना नाईलाजास्तव विहिरीचे खारट पाणी पिणे भाग पडते. एवढे सगळे होऊनही अवर्षणाने निर्माण झालेले प्रश्न मात्र कायम आहेत. पोट भरण्याकरिता खरसोलीतून जंगलू मांगाची पत्नी अनुसया नागपूरला जाण्याचा निश्चय करते.

माणिक देशपांडेच्या सिनेमा कंपनीत काम करणारा मुलगा श्रीकांत दुष्काळावर लघुचित्रपट काढण्यासाठी खरसोलीत दाखल होतो. याप्रसंगी चित्रपट करणाऱ्या टिममधील अभिनेत्याचे बेगडी संवाद, वर्तन पाहून चिडणारा विनोद नारनवरे आपल्या बोलण्यातून मनातील पीळ व्यक्त करतो. ''आमच्या जगण्यातलं दु:ख खूप वेगळं आहे. तुम्ही या फदांत पडू नका...''[४] या उद्गारातून

विनोदची तडफदार वृत्ती प्रकटते. अवर्षणाने दिवाळी सणही गावात साजरा होऊ शकत नाही. तुळशी विवाहानंतर सुरेखाचे लग्न असल्यामुळे वासुदेव काळेला मिळालेले समाधान क्षणभंगूर ठरते. कारण इतर दोन मुलींच्या भवितव्याची काळजी, नापिकी, खरीप पिकासाठी काढलेल्या कर्जाने आलेली सावकाराची जमिनीवरील टाच इ. अनेक प्रश्न वासुदेवसमोर उभे राहतात.

दुष्काळी परिस्थिती राज्य सरकारापुढे मांडण्याकरिता खरसोली भागातील विरोधी नेता शालिक बनसोडे नागपूर अधिवेशनावर मोर्चा काढण्याचे ठरवतो. सरपंच मडावी हा सत्तारूढ पक्षाचा कार्यकर्ता असूनही या मोर्चात सामील होतो. नरखेडहून नागपूरला जाताना रेल्वेगाडीत गावकऱ्यांना आलेले अनुभव, दुष्काळी भागातील कास्तकारांविषयी शहरवासियांची असलेली दूषित दृष्टी दृग्गोचर करताना दिसतात. या प्रसंगात गावात असलेली पाण्याची टंचाई आणि शहरात चाललेली पाण्याची उधळपट्टी अशी दोन विरोधाभासी चित्रे दृकप्रत्ययी होतात. या मोर्च्यानंतरही खरसोली भागातील दुष्काळ परिस्थितीवर विशेष लक्ष दिले जात नाही. वासुदेव काळेची लग्न झालेली मुलगी सुरेखा हुंड्याची राहिलेली रक्कम देऊ न शकल्याने परत माहेरी येते. पाण्याचे दुर्भिक्ष माणसाबरोबर पशूंनाही अगतिक करताना दिसते. पंढरी आगेची गाय तहानेने व्याकुळ होऊन विहिरीत पडते आणि मरते.

खरसोली दुष्काळाने त्रस्त असताना शासन पाणी वापर आणि संचयन या जागृतीसाठी गावात घोषवाक्ये रंगवून गावकऱ्यांची क्रूर थट्टा करताना दिसते. 'पाणी वाचवा'सारख्या भिंतीवर लिहिलेल्या घोषणा म्हणजे उपाशी माणसाला सुग्रास अन्नाच्या चवीबद्दल सांगून हिणवण्यासारखे आहे, असे विनोद नारनवरे आणि सरपंच मडावीला वाटते. आमदारांकडून पाण्याच्या शोधाकरिता ट्यूबवेल खोदण्याचा प्रसंग आणि या पार्श्वभूमीवर साहेबराव पाटलाच्या निधनाचा प्रसंग रेखाटलेला आहे.

भाग तीन :

कादंबरीच्या या भागाची सुरुवात ट्युबवेल दीडशे फूट खोदूनही पाणी न लागल्याने हताश झालेल्या गावकऱ्यांच्या व कास्तकारांच्या चित्रणातून होते. या पार्श्वभूमीवर साहेबराव पाटलांच्या अंत्ययात्रेचा करुण प्रसंग चित्रित केला

आहे. वासुदेव काळेच्या जमिनीवर सावकार देविदास सातपुते जमीनजप्तीची नोटीस पाठवतो. अगोदरच मुलीच्या काळजीने अगतिक झालेला वासुदेव या घटनेने आणखी अगतिक होतो. साहेबराव पाटील यांचा मुलगा अनंता पटत नसतानादेखील आई आणि आजीने आग्रह केल्यामुळे तेरवी विधीला गावजेवण घालतो. या प्रसंगात तेरवीसारख्या कंबरडे मोडून काढणाऱ्या रूढी समाजमनात किती खोलवर रुजल्या आहेत, याचे प्रतिबिंब उमटते.

वासुदेव काळे जमिनीवर सावकाराची टाच येणार, या विचाराने चिंताक्रांत होताना दिसतो. अंनतराव तेरवीचा विधी आटोपल्यानंतर बायको-मुलासह नागपूरला जाण्याचे ठरवतो आणि आई मंगला आणि आजी सिंधूला सोबत येण्याचा आग्रह करतो. परंतु सिंधू आणि मंगला पाटील मात्र गाव न सोडण्याचा निर्णय घेतात. पुढील प्रसंगात गायी-गुरांचा चाराप्रश्न मांडलेला आहे. वासुदेव काळेसमोर आपले पोट भरायचे की, जित्राबांना जगवायचे, हा प्रश्न उभा राहिला आहे. दुष्काळामुळे निर्माण झालेली चारासमस्या, चाऱ्याची अनुपलब्धता, कडबा-कुटाराची वाढती किंमत यांसारखे प्रश्न वासुदेवसमोर उभे राहतात. नागपूरला मोर्च्यात सहभागी झाल्यानंतर मुकुंदा इरपाते यांनी आपल्या मित्रांबरोबर केलेले वेश्यागमन, याची परिणिती त्याला होणाऱ्या एच.आय.व्ही संसर्गात होते. याप्रसंगी मुकुंदाचे वडील नथ्यू इरपाते याची अगतिकता प्रकट होताना दिसते. पुढील प्रसंगाची सुरुवात मृत जंगलू मांगची पत्नी अनुसया गावात परत येते, या वर्णनातून होते. गावातील पाणीप्रश्न न सुटल्याने अनुसया नाईलाजास्तव घर विकून कायमस्वरूपी स्थलांतर करण्याचे ठरवते. दुष्काळामुळे आलेली नापिकी, त्यामुळे गावकऱ्यांजवळ पैसा नसल्यामुळे कोणीही तिचे घर विकत घेऊ शकत नव्हते. अनुसया पुन्हा एक वेळ घराला कुलूप ठोकून नागपूरला जाण्याचे ठरवते. या प्रसंगी पैकू मांगच्या 'जाय बाई सुखानं जिथी पोट भरनं, थोचं गाव भला...'[५] या उद्गारातून वैफल्यग्रस्त गावकऱ्यांचे प्रातिनिधिक वैषम्य प्रकट होताना दिसते. दुष्काळ, नापिकी, हुंडा न देऊ शकल्याने मुलीचा उधळलेला संसार, इतर दोन मुलींची चिंता, सावकाराने गिळंकृत केलेली जमीन, यांमुळे अगतिक झालेला वासुदेव व्यसनाधिन होतो. अनंताने कामठीतील मळा नरखेडच्या कन्हैय्यालाल शेठला विकल्याने मळ्यातील विहिरीवर पाणी भरण्यास त्याचे गडी विरोध करतात. अखेरीस गावकरी सरपंच मडावीच्या

नेतृत्वाखाली कामठीच्या विहिरीवर हल्लाबोल करून विहीर खुली करतात. मुंकुदा इरपाते एड्‌सने मरण पावतो. परंतु गावात पाणीटंचाई असल्याने आणि मुकुंदाला एड्‌स झाला असल्याने त्याच्या शेवटच्या अंघोळीवर फुली मारण्यात येते.

लेखक पुढील प्रसंगात पानझडीच्या मौसमानंतर नवी पालवी फुटण्याच्या कालावधीचे वर्णन करतो. परंतु भूजलपातळी घसरल्याने गावातील झाडांना पालवी न येता ती अधिकच ओकीबोकी दिसू लागतात. गावातील पूर्वीचे हिरवेपण या दुष्काळाने कुठेतरी हरवले आहे, असेच भाव प्रत्येक खरसोलीतील गावकऱ्याच्या मनात येताना दिसतात. सुरेखाचा विस्कटलेला संसार आणि इतर दोन मुलींच्या भवितव्याची काळजी यात चिंतामग्न झालेले वासुदेव काळे आणि शकुंतला हे पती-पत्नी पुढील प्रसंगात दिसतात. दहावीतील दीपाली कुटुंबावर कोसळलेल्या संकटामुळे नैराश्यग्रस्त होताना दिसते. दुष्काळामुळे गावाची उडालेली दैना, गावचे ओसाडपण, पाणीटंचाई यांना कंटाळून साहेबरावांची पत्नी मंगला आणि आई सिंधू ह्या गाव सोडण्याचे ठरवतात. वाडा, गायी-गुरे यांची देखरेख सदाशिवकडे सोपवून अनंताबरोबर नागपूरला स्थलांतर करतात. वासुदेव काळेची संवेदनशील मुलगी दीपाली भावनिक होऊन आत्महत्या करते. तिच्या आत्महत्येला अंतिमत: दुष्काळच कारणीभूत ठरताना दिसतो.

भाग चार :

'पांढर' कादंबरीच्या या भागाची सुरुवात खरसोलीतील गावपुजारी धनराज, त्याची पत्नी प्रमिला आणि मेहुणी कावेरी त्यांच्या दुष्काळामुळे व पाणीप्रश्नामुळे होणाऱ्या स्थलांतराच्या प्रसंगाने होते. अनंताने वाडा आणि गुरे सांभाळण्यासाठी ठेवलेल्या सदाशिवसमोर दहा जनावरांना चारा कोठून मिळवायचा, हा प्रश्न उभा ठाकला आहे. सदाशिवसमोरच्या या चाराप्रश्नाद्वारे गावातील दुष्काळी परिस्थितीमुळे जाणवणाऱ्या चाराप्रश्नाची प्रातिनिधिक मांडणी केली आहे. नागोराव कडूसमोर गायी-गुरांना सांभाळण्याचा प्रश्न, उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिलेला आहे. दीपालीच्या अकाली जाण्याने वासुदेव काळे आणि कुटुंबियांची झालेली विमनस्कता पुढील प्रसंगातून प्रकटताना दिसते. दीपालीच्या आत्महत्येनंतर गावातील राजकारणी मंडळी

वासुदेवला सांत्वना देताना दिसतात. गावातील पाणीप्रश्न, उदरनिर्वाहाचा प्रश्न यांमुळे संपूर्ण मांतगपुरा स्थलांतर करण्याचा निर्णय घेतो. कर्जबाजारी झाल्याने पंढरी आगे आत्महत्या करतो. याप्रसंगी त्याच्या मृतदेहाची राजकारणी आणि अधिकाऱ्यांकडून घोर अवहेलना होताना दिसते. विरोधी नेते त्याच्या मृतदेहाचा वापर राजकारणासाठी करतात. शेतकरी आत्महत्येपेक्षा आत्महत्येनंतर मिळणाऱ्या अर्थसाहाय्यावरील लोकांचा झोत माणसातल्या मानुषहीनतेकडे लक्ष वेधतो. या प्रसंगातून लेखक विदर्भातील शेतकरी आत्महत्या हा प्रश्न तटस्थपणे मांडताना दिसतो.

शेतकऱ्याजवळ चारा नसल्याने त्यांनी मोकाट सोडलेल्या जनावरांचे चित्रण पुढील प्रसंगात येते. सरपंच मडावीला गावाकडे येताना दिसलेले मृत गायीचे कलेवर आणि त्याप्रसंगी त्यांच्या मनात आलेले विचार अंतर्मुख करतात. या प्रसंगातून कृषीजीवनातील वास्तवाचे भडक चित्र दृक्प्रत्ययी होते. मांगपुऱ्यातील मातंग समाज पोट भरण्यासाठी गावाबाहेर पडतो. परंतु त्याच्याबरोबर ईश्वरा कांबळेचा बाप उकिंड्या कांबळेसारखी वृद्ध मंडळी वयोमानामुळे जाऊ शकत नाहीत. मातंग समाज गाव सोडतानाचा प्रसंग लेखक विस्ताराने चित्रित करतो. या प्रसंगी मातंग समाजाचे दु:ख प्रकट होताना दिसते. मांग लोकांना एस. टी. वाहकाकडून मिळणारी वागणूक यातून ग्रामीण लोकांच्या समस्यांबाबत समाजात असलेली अनास्था, बेफिकिरी दृग्गोचर होते.

भाग पाच :

या भागाची सुरुवात दुष्काळी पार्श्वभूमीवरील निसर्गचित्रणाने होते. पाठोपाठ दोन वर्षे सलग दुष्काळ पडल्यानंतर तिसऱ्या वर्षीदेखील पाऊस पडण्याचे चिन्ह दिसत नाही. दुष्काळामुळे गावगाड्यातील घटक गावापासून, गावगाड्यापासून तुटताना दिसतो. गावातील प्रतिष्ठित माणिकराव आणि राधाबाई देशपांडे मुलगा श्रीकांतबरोबर खरसोली सोडण्याचा निर्णय घेतात. सदर प्रसंगात श्रीकांतच्या मनात येणाऱ्या विचारातून नवीन पिढीचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, विदर्भातील कास्तकारांची दु:स्थिती, विदर्भातील सिंचनसाधनांची कमतरता, कास्तकारांचे शेतीबद्दलचे प्रतिगामी धोरण इ. विषयांवरील चिंतन प्रकट होते. श्रीकांत गावातील वाडा आणि शेतजमिनी विकण्याचा निर्णय घेतो. येरल्यातील

गजानन पिकलेच्या आत्महत्येच्या घटनेतून दुष्काळाची सार्वत्रिकता, खाजगी सावकाराची लोभी वृत्ती आणि त्यातून होणारे शेतकरी आत्महत्यांचे दुष्ट चक्र यांवरील चिंतन निवेदनातून प्रकटते. शेतकरी संघटनेच्या कार्याचा उल्लेख गोविंदराव फाळके आणि धनंजय साने या व्यक्तिरेखांच्या प्रातिनिधिक उदाहरणावरून पुढील प्रसंगात येतो. दुष्काळामुळे मोठ्या प्रमाणावर चाललेले स्थलांतर, त्यामुळे वर्गातील मुलांची घटती पटसंस्था, यातून शिक्षकासमोर उभा राहिलेला रोजगाराचा प्रश्न चित्रित होताना दिसतो.

मोटरपंप बंद असूनही काशिनाथ इंगोलेला येणारे सत्तावीस हजारांचे वीजदेयक आणि विद्युत मंडळातील अधिकाऱ्यांची अरेरावीची उत्तरे पुढील प्रसंगातून उपहासात्मक पद्धतीने येतात. दुष्काळी पार्श्वभूमीवर विधानसभेत चालणारे कामकाज, त्याप्रसंगी विरोधी पक्षाकडून उठविले जाणारे शेतकरी आत्महत्येवरील प्रश्न आणि शेतकरी आत्महत्येवर शासनाकडून नेमली जाणारी सत्यशोधन समिती असे महाराष्ट्रातील राजकीय वास्तवाचे चित्रण पुढील प्रसंगातून येते. वर्तमानपत्रासारख्या प्रसारमाध्यमातून विधिमंडळातील कामकाजाची माहिती खरसोलीपर्यंत पोहोचते. या प्रसंगी राजाराम कनाते, विनोदी नारनवरे इत्यादींच्या संवादातून गावकऱ्यांच्या विनोदी स्वभावाचे, उपहासाचे दर्शन होते.

पाणी, चारा यांच्या अभावामुळे कृश झालेला साहेबराव पाटील यांचा बैल मरण पावतो. या प्रसंगी निवेदनातून प्राणीविश्वातील भावविश्वाचे चित्र उभे राहते. खरसोली गावात आलेले सत्यशोधन समितीचे सदस्य आत्महत्याग्रस्त कास्तकारांची चौकशी करतात. पंढरी आगेच्या पत्नीला (अलका) मदत मिळते. परंतु शासकीय निकषात न बसल्यामुळे वासुदेव काळेची मदत नाकारली जाते. ''म्हंजे सायेब माह्या पोरीऐवजी मी मेलो असतो तं सरकारानं माह्या कुटुंबाचा मोठ्या मनानं इचार केला असता, असंच म्हणाचं हाये तुमाले!''[६] या वासुदेव काळेच्या उद्गारात उद्विग्नता दिसते.

मांगपुरा स्थलांतरीत झाल्याने मागे राहिलेला वृद्ध उकिंड्या कांबळे उपासमारीने मरतो. त्याकडे कुणीही लक्ष देणारे नसल्याने त्याच्या मृतदेहाची कुत्र्यांकडून विटंबना होते. मांगपुऱ्याच्या पाठोपाठ गावातील महारपुऱ्यातील (बौद्धवस्तीतील) माणसे पाणी, उदरनिर्वाहासाठी गावातून स्थलांतरीत होतात.

अलका आगेला अर्थसाहाय्य मिळताच पंढरी आगेची बहीण त्या रकमेवर हक्क सांगू लागते. नात्यापेक्षा मिळणाऱ्या पैशाला आलेले महत्त्व, समाजातील भावनाशून्यतेकडे निर्देश करताना दिसते. दुष्काळमुळे त्रस्त होऊन स्थलांतरित होणाऱ्यांमध्ये दलितांप्रमाणे बहुजन समाजदेखील वाढत्या प्रमाणात दिसतो. खरसोलीतील लोकांना जगण्यासाठी स्थलांतर करत राहावे लागते. मुलीच्या अकाली जाण्याने विरक्त झालेला वासुदेव अचानक एक दिवस परागंदा होतो. सखू तेलीन ही दम्याने त्रस्त असलेली म्हातारी अचानक मरते. सखूची मुले प्रमोद, शरद आत्महत्याग्रस्त कास्तकारांना शासकीय अर्थसाहाय्य मिळेल, या आशेने स्वत:च्या आईचे मृत कलेवर लटकवतात आणि पोलिसांकडून पकडले जातात. अलका आगेस सरकारी मदतीत नणंद पैसा मागू लागल्याने खरसोली गाव सोडते. अशाप्रकारे एकेक घटक गावापासून तुटताना दिसतात. दुष्काळाने त्रस्त अस्मानी-सुलतानी संकटाला वैतागलेले खरसोली ग्रामस्थ सरकारी अनास्थेमुळे 'गाव विकणे आहे', अशी जाहीरातच रंगवतात. त्यातून भारतीय कृषीजीवनातील भीषण वास्तव प्रकट होते. किसन मांगाची गरोदर पत्नी माया मृत होते आणि तो गाव सोडण्याचा निर्णय घेतो. परंतु दूध न मिळाल्याने त्याचे नवजात मूल वाटेतच मरते. किसन मृत मुलगा तिथेच ठेऊन दोन मुलींसह वेगाने मार्गस्थ होतो. अशी दुष्काळाने निर्माण केलेली अनेक रूपे कादंबरीच्या शेवटी भीषण प्रसंगातून गोचर होतात. सलग दोन वर्षे न पडणारा पाऊस, त्यामुळे खरसोलीला आलेली अवकळा आणि सलग तिसऱ्या वर्षीही हुलकावणी देणारा पाऊस या परिस्थितींच्या पार्श्वभूमीवर पावसाचे थेंब खरसोलीत उरलेल्या माणसांच्या मनात खोटी आशा निर्माण करतात. ''यील आता तरी पाऊस?''[७] या प्रश्नार्थदर्शक वाक्याने कादंबरीचा शेवट होतो.

लेखक 'पांढर'मधील घटनाप्रसंगातून दुष्काळकेंद्री आशयावर घटना गुंफण करून कास्तकारांच्या जीवनातील जीवघेणे वास्तव कलात्मक पद्धतीने मांडताना दिसतो. कृषीवलांची अस्मानी संकटाने ओढवलेली अगतिकता हेलावून टाकणारी आहे. 'पांढर'मधील घटनाप्रसंगात गावखेडे, गावागाड्यातील अमानुषता यांचे दर्शन घडते. लेखकाकडून झालेली 'पांढर'ची वास्तववादी निमिर्ती, ही त्याच्या मनात असलेल्या गावखेड्यातील विषयाच्या आत्मियतेचे लक्षण मानावे लागेल.

'पांढर' कादंबरीतील व्यक्तिरेखा :

'पांढर'मधील व्यक्तिरेखा ह्या प्रातिनिधिक असून संपूर्ण खरसोली गाव कादंबरीत व्यक्ती म्हणून वावरताना दिसते. दुष्काळकेंद्री गावावर कोसळलेली अस्मानी-सुलतानी संकटे हे आशयकेंद्र असलेल्या प्रस्तुत कादंबरीत साहेबराव पाटील, वासुदेव काळे, नागोराव कडू, सरपंच गौतम मडावी, विनोद नारनवरे, सिंधू तेलीण, अनुसया मांग इ. व्यक्तिरेखांवर कोसळणारी विविध अस्मानी संकटे याभोवती कथानक फिरताना दिसते. लेखकाने 'पांढर'मध्ये केलेले व्यक्तिचित्रण भरीव, विकसनशील असे आहे. लेखक पात्रचित्रणात मनोविश्लेषणालादेखील प्राधान्य देताना दिसतो.

'पांढर'मधील प्रमुख पुरुष-व्यक्तिरेखा :

साहेबराव पाटील :

अनेक वर्षे खरसोलीगावचे सरपंचपद भूषविणारा, अनेक एकर जमीन असणारा, बागायतदार शेतकरी साहेबराव पाटील. त्यांना गावची विशेष काळजी आहे. गावातील समस्या निवारणासाठी ते झटतात. लोकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून संत्री बागेला पाणी न देता ते कामठीतील विहीर खरसोली गावासाठी खुली करतात. राजकीय वारसा लाभलेल्या कुटुंबातील प्रमुख सदस्य असलेले साहेबराव हे संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून साकार होते. मुलगा अनंत नागपूरमध्ये वकिली व्यवसाय करतो, तर आई सिंधू आणि पत्नी मंगला यांच्याबरोबर ते गावात शेतीवाडी सांभाळतात. त्यांची शेतीवर (काळ्या आईवर), खरसोली गावावर, पाळीव प्राण्यांवर प्रचंड ममता दिसून येते. दुष्काळमुळे अगतिक झालेला हा सधन शेतकरी अगतिकतेने झुरतझुरत मरण पावतो.

गौतम मडावी :

आरक्षणामुळे सरपंचपद मिळालेले, प्रागतिक विचारांचे, विवकेवादी, शिक्षकीपेशा स्वीकारलेले, गोंड आदिवासी समाजातील हे पात्र आहे.

लोकांच्या दुष्काळी समस्यांसाठी, पिण्याच्या पाण्यासाठी अविरत झगडणारे हे पात्र विचारप्रवृत्त करते.

नागोराव कडू :

नागोराव कडू ही व्यक्तिरेखा म्हणजे खरसोलीतील दुग्ध व्यवसायासारखे शेतीपूरक व्यवसाय करून अर्थार्जन करणारा कास्तकार. पत्नी मनकर्णिका आणि आपल्या मुलांना चांगल्या पद्धतीने संभाळणारा नागोराव दुष्काळी परिस्थितीमुळे, नापिक, पाणीप्रश्न, तसेच उदरनिर्वाहाच्या प्रश्नामुळे वैफल्यग्रस्त होतो. नागोराव आपल्याकडील म्हशीच्या मृत्यूने आणि शारदा ह्या मुलीच्या प्रकाश इंगोलेबरोबर पळून जाण्याने विमनस्क होतो. या व्यक्तिरेखेचे रेखाटलेले भावविश्व आणि अस्मानी- सुलतानी संकटाने जनावरांच्या मृत्यूने त्याची होणारी विमनस्कता हे चित्रण आपल्याला आनंद यादव यांच्या 'गोतवाळ्या'तील नारबाची आठवण करून देते.

वासुदेव काळे :

खरसोलीतील हा अल्पभूधारक कास्तकार. दुष्काळी परिस्थितीने निर्माण झालेली नापिकी, मुलींचे लग्न, कर्ज थकल्याने सावकार-पटवारी यांच्याकडून गिळंकृत केलेली शेतजमीन इ. अनेक संकटाने उद्‌ध्वस्त होऊन वासुदेव परागंदा होतो. 'पांढर'मध्ये इतर कोणत्याही व्यक्तिरेखेपेक्षा या पात्रावरील दुष्काळाची भीषणता अधिक जाणवते. वासुदेव काळेला मुलीचा (सुरेखाचा) मोडलेला संसार, शालेय मुलगी दीपालीची आत्महत्या इ. प्रसंग उद्‌ध्वस्त करताना दिसतात. वासुदेव काळे ही व्यक्तिरेखा खूपच संवदेनशील आणि हळवी आहे.

विनोद नारनवरे :

कांदबरीत वर्णन केलेली ही तरुण व्यक्तिरेखा असून ती एम. ए. करीत असलेली प्रागतिक विचारांची, बंडखोर वृत्ती असलेली आहे. गावाबद्दल, गावच्या समस्यांबद्दल त्याला असणारी आस्था अनेक प्रश्न आणि कौतुक हे भाव एकाच वेळी उभे करते. मराठी साहित्याचा हा पदवीधर कृतीतून, विचार, चिंतनातून आजच्या तरुण पिढीचे एक स्पष्ट चित्र उभे करतो.

'पांढर'मध्ये याशिवाय प्रकाश इंगोले, वामन कुकडे, मुकंदा इरपाते अशाही अनेक व्यक्तिरेखा आहेत. या व्यक्तिरेखा विचारहीन, वाईट संगतीला लागलेल्या तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करतात. याशिवाय धनराज पुजारी, अनंतराव पाटील, हॉटेलवाला रघुनाथ धुर्वे, नत्थु इरपोते, माणिकराव देशपांडे, काकडेसर, सावकार देविदास सातपुते इ. व्यक्तिरेखा आणि त्यांच्या जीवनात घडणाऱ्या घटना यांच्यातून 'पांढर'चा आशय अभिव्यक्त होतो.

'पांढर' कादंबरीतील प्रमुख स्त्रीव्यक्तिरेखा :

'पांढर'मधील स्त्रीपात्रांचे भावचित्रण लेखकाने अतिशय मार्मिकतेने केल्याचे दिसते. या व्यक्तिरेखा अत्यंत वास्तवदर्शी वाटतात.

दीपाली :

दीपाली ही शालेय विद्यार्थी असलेली मुलगी 'पांढर'मधील अत्यंत कलात्मकपणे रेखाटलेली स्त्री-व्यक्तिरेखा आहे. अत्यंत संवदनेशील, हळव्या मनाची, अभ्यास आणि इतर कलांमध्ये चाणाक्ष आणि हुशार असलेली दीपाली आपल्या बाबाच्या अगतिकतेमुळे त्याच्यावर ओझे बनून राहू नये, म्हणून आत्महत्येसारखा मार्ग निवडते. तिच्या वयातील मुलींपेक्षा तिच्यात असलेली वास्तवाबद्दलची अधिक समज, तिचा समजुतदारपणा, विचारी वृत्ती, चिंतनशीलता अनेक प्रश्नांची वलये निर्माण करते. थोरल्या बहिणीच्या लग्नात हुंडा देऊ न शकल्याने, तिच्या मोडलेल्या संसाराने अगतिक झालेल्या बापाचे दुःख ती सहन करू न शकल्याने आत्महत्या करते. या व्यक्तिरेखेचा कादंबरीत होणारा विकास, मनोविश्लेषण खूप प्रभावी वाटते.

अनुसया मांग :

'पांढर' कादंबरीत रेखाटलेली ही व्यक्तिरेखा सत्यार्थाने विद्रोही दलित स्त्रीचे प्रातिनिधिक रूप वाटते. आपला पती (जंगलू मांग) याच्या अपघाती मृत्यूनंतर आपल्या मुलाबाळांना सांभाळताना अनुसया अस्मानी-सुलतानी संकटांसमोर निर्भय होऊन उभी राहते. उदरनिर्वाहाकरिता ती गावातून स्थलांतर करते, शहरात

झोपडपट्टीत राहून आपल्या मुलांना जगवते. आपल्याला आणि मुलांना गावात उज्ज्वल भविष्य नाही, हे लक्षात येताच ती गावातील घर विकण्याचा निर्णय घेते. परंतु दुष्काळ, नापिकी यांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ झालेले गावातील गावकरी तिचे घर घेऊ शकत नाहीत. त्यामुळे गावातील समस्यांना, उजाड अवस्थेला दोष लावत अनुसया गावातून स्थलांतर करते.

सखू तेलीण :

ही गावातील बहूजन समाजातील सोशिक, समंजस वृत्तीची स्त्रीव्यक्तिरेखा होय. दम्याने त्रस्त असलेली सखू दोन तरुण मुलांबरोबर संसारगाडा हाकताना दिसते. दम्याच्या तीवृतेने तिचा होणारा मृत्यू आणि सरकारी मदतीच्या अपेक्षेने मुलांकडून हा नैसगिक मृत्यू, आत्महत्या दर्शविताना तिच्या मृत कलेवराची होणारी विटंबना वाचकमनाला हेलावून टाकते.

सिंधू पाटलीण :

साहेबराव पाटील यांची वृद्ध आई म्हणजे सिंधू पाटलीन. देव-देवस्की, परंपराप्रियता, जुन्या विचारांची, सनातनी वृत्तीची ही व्यक्तिरेखा आहे. गावगाड्याबद्दल आस्था असणाऱ्या सिंधू पाटलीणीच्या संवादातून तिचे जातीयतेबद्दलचे सनातनी विचार, जुन्या परंपरांचा आदर, परंपरावादी दृष्टिकोन, रूढीप्रधान विचार प्रकट होताना दिसतात.

राधाबाई देशपांडे :

'पांढर' कादंबरीतील ब्राह्मण समाजातील प्रातिनिधिक व्यक्तिरेखा म्हणजे माणिकराव देशपांडे आणि त्यांची पत्नी राधाबाई देशपांडे होत. वृद्ध राधाबाई ही व्यक्तिरेखा 'पांढर'मधील गौण व्यक्तिरेखा आहे. परंतु ह्या व्यक्तिरेखेचे चित्रण मात्र भरीव पद्धतीने केले गेले आहे. ही व्यक्तिरेखा ईश्वराधना करणारी, आजारी पतीला सांभाळणारी, काही प्रमाणात प्रागतिक विचार असणारी, प्रमाण मराठी भाषेत संवाद साधणारी आहे. याशिवाय वासुदेव काळेची पत्नी शकुंतला, मनोकी, गौतम मडावीची पत्नी कांता, धनराज पुजाऱ्याची पत्नी प्रमिला, दीपालीच्या बहिणी, सुरेखा, मनकर्णिका, मंगला पाटलीण, शारदा इ.

स्त्रीव्यक्तिरेखांचे चित्रण 'पांढर'मध्ये आलेले आहे.

'पांढर' कादंबरीतील निवेदनाची भाषा :

'पांढर' या कादंबरीच्या निवेदनाची भाषा प्रमाण मराठी असून संवाद मात्र खास नागपूर जिल्ह्यातील नरखेड-खरसोली भागातील वऱ्हाडी बोलीतून प्रकट होतात. लेखकाने सदर कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदनपद्धती उपयोगात आणली आहे. परंतु बोलीभाषेतील शब्दांचा वापर केल्याने निवेदनाची भाषा जिवंत, दृकप्रत्ययक्षम आणि चित्रवती झाली आहे. निवेदनात प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचाही काही ठिकाणी वापर केला आहे. उदा. कादंबरीच्या प्रारंभीच नागोराव कडूच्या मनातील विचार संज्ञाप्रवाही पद्धतीने दुष्काळाची भीषणता, गावाच्या बकाल स्थितीवर प्रकाश टाकतो. 'पांढर' ही ग्रामीण कादंबरी असल्याने कृषीकेंद्री पार्श्वभूमीवर शेतीक्षेत्रात वापरले जाणारे अनेक व्यवसायनिष्ठ शब्द निवेदनाच्या ओघात येतात. उदा. शिरवा, वावर इ.

निवेदनात लेखकाने वऱ्हाडी बोलीतील शब्दांचा वापर केल्याने कादंबरीचा आशय निवेदनातून प्रत्ययकरी पद्धतीने जिंवत होतो. उदा. 'धुऱ्यावर सळसळ जाणवली', 'पोळा आन् पाणी झाला भोळा', 'ओल्या कपड्या निशीच', 'पक्की गाठ जुवाच्या दोरीला बांधली' इ. लेखकाने निवेदनात जिंवतपणा आणलेला आहे. घटनाप्रसंग, निसर्गवर्णन यातून चित्रण प्रत्यक्षात गोचर होताना दिसते. 'पांढर'च्या निवेदनाला एक भाषिक प्रवाहीपण लाभलेले आहे. निवेदनाद्वारे एका प्रसंगावर्णनातून दुसऱ्या प्रसंगावर्णनात जाताना कुठेही निवेदनावरील पकड ढिली होताना दिसत नाही. एका घटनेतून दुसऱ्या घटना वर्णनात जाताना निवेदन भाषेची एक अखंड शृंखला निर्माण झाल्यासारखी जाणवते. निवेदनाच्या चित्रमयी वर्णनातून प्रत्यक्ष चित्र डोळ्यांसमोर उभे राहते.

'पांढर' कादंबरीतील संवादशैली :

'पांढर' कादंबरीची निवेदन भाषा प्रमाण भाषा असली, तरी संवाद मात्र अस्सल वऱ्हाडी बोलीतून प्रकट झाले आहेत. व्यक्तिरेखा एकमेकांशी संवाद साधताना वैदर्भी बोली वापरताना दिसतात. त्यामुळे 'पांढर' कादंबरीतील आशयाला कलात्मक मूल्यगर्भता लाभलेली दिसते. वैदर्भी बोलीचा वापर संवादात केल्याने

आशय जिंवत आणि वास्तवदर्शी झाला आहे. संवादशैलीअंतर्गत वेगवेगळ्या समाजाच्या व्यक्तिरेखांकडून वापरल्या जाणाऱ्या वैदर्भी बोलीत फरक दिसतो. उदा. कुणबी, गोंड–आदिवासी, महार–मांग समाज इ. ब्राह्मण व्यक्तिरेखा मात्र प्रमाण भाषा वापरताना दिसतात.

स्त्रीव्यक्तिरेखांकडून बोलले जाणारे संवाद अधिक दृकप्रत्ययी वाटतात. स्त्रीसंवादातून होणारे स्त्रीसुलभ भावनाचे आविष्करण वऱ्हाडी शब्दांतून अधिक मनोवेधक वाटते. उदा. जंगलू मांगची विधवा अनुसया आणि इतर मातंग स्त्रिया यांच्यातील थट्टा–मस्करीचा संवाद ''मले वाटलं नवा घरठावच केला का काय?''[८] ''आता का नवा घरठाव कराचं वयं राह्यलं का वो?....''[९] इ. दोन वेगवेगळ्या समाजातील स्त्रीव्यक्तिरेखांच्या संवादातून त्यांच्यातील सांस्कृतिक भिन्नतेचा, एखाद्या विषयाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणातील तफावतीचा प्रत्यय येतो. उदा. एका प्रसंगात दलित स्त्रिया लैंगिकतेबद्दल अधिक मोकळेपणाने बोलताना दिसतात, तर कुणबी ब्राह्मण स्त्रियांच्या संवादात एका प्रसंगी जातीय राजकारणाचा उल्लेख येताना दिसतो. उदा. राधाबाई दशपांडे आणि सिंधू पाटलीण यांच्यातील संवादातून येणारे दुष्काळाचे चित्र वैदर्भी बोलीच्या आशयगर्भ उपयोजनाने अधिक प्रत्ययी आणि वास्तवपूर्ण वाटते. कास्तकारांच्या संवादात 'बैलबंडी', 'कुटार', 'ठेका–बटाई', 'तिफण', 'वखर', 'गाटोडी', 'निंदण' इ. कृषी व्यवसायनिष्ठ शब्द येताना दिसतात. 'इच्चकवाना', 'इचीभने', 'इचीमायमैन', 'बोहरावान्या' इ. वऱ्हाडी शब्ददेखील संवादातून प्रकट होताना दिसतात. 'पांढर'मध्ये संवादशैलीत वापरल्या गेलेल्या वैदर्भी बोलीने आशयाला आशयगर्भ सौंदर्य आलेले आहे.

संदर्भ आणि टिपा :

१. शोभणे रवींद्र, 'पांढर', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र. आ. नोव्हें. २००९, पृ. १७

२. तत्रैव, पृ. १०३

३. तत्रैव, पृ. १०७

४. तत्रैव, पृ. १२८

५. तत्रैव, पृ. १९९
६. तत्रैव, पृ. २९९
७. तत्रैव, पृ. ३४०
८. तत्रैव, पृ. १९३
९. तत्रैव, पृ. १९३

***

‘पांढर’ कादंबरीतील प्रादेशिकता : एक आकलन

प्रास्ताविक :

‘पांढर’ ही कादंबरी ग्रामीण स्वरूपाची असली, तरी तिचा कल प्रदेशविशिष्ट ग्रामीणतेकडे दिसतो. ग्रामीणता आणि प्रादेशिकता या वाङ्मयप्रवृत्तींमध्ये बव्हंशाने साम्य आहे. ‘पांढर’ कादंबरीतीतल प्रादेशिकतेचा मागोवा घेताना अ) भू-वैशिष्ट्ये, ब) निसर्ग आणि क) समाजजीवन यांचा विचार करावा लागाते. ‘पांढर’ कादंबरीतील समाजजीवन हा घटक १) राजकीय जीवन, २) कुटुंब जीवन, ३) सांस्कृतिक जीवन, ४) आर्थिक जीवन, ५) शैक्षणिक जीवन आणि ६) भाषाविशेष या उपघटकांच्या माध्यमातून अभ्यासण्यात येईल.

‘पांढर’ कादंबरीतील भूवैशिष्ट्ये :

प्रस्तुत कादंबरीतील घटनाप्रसंग, जीवननाट्य विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील खरसोली आणि आसपासच्या खेड्यातील आहे. प्रस्तुत कादंबरीत प्रादेशिक भू-वैशिष्ट्यांची अत्यंत त्रोटक वर्णने आली आहेत. दुष्काळकेंद्री आशयावर बेतलेले कथानक असल्याने कादंबरीत ठिकठिकाणी दुष्काळामुळे झालेली भकास-वैराण अवस्था चित्रित केली आहे. भेगाळलेली जमीन, टणक मातीची ढेकळे, पाणी न मिळाल्याने किंवा भूजल पातळी घटल्याने सकस-काळीशार जमीन भूसभूशीत, कोरडी होणे, जमिनीची पाण्याअभावी होणारी धूप आणि उडणारा धुराळा असे उल्लेख कादंबरीत निवेदनात आणि व्यक्तिरेखांच्या मनोगतात प्रकट होताना दिसतात. आटलेल्या विहिरी, कोरडी नदी पात्रे यांची वर्णने दुष्काळाची भीषणता व्यक्त करतात. काळीशार जमीन, उन्हाच्या झळांनी ठिसूळ झालेली शेतजमीन इत्यादी वर्णने विदर्भातील भू-वैशिष्ट्यांकडे निर्देश करतात. नागझिरा टेकडीवरील हिरवी नवराई यांसारखे उल्लेख प्रदेशविशिष्ट आहेत.

‘पांढर’ कादंबरीतील निसर्गवर्णन :

प्रस्तुत कादंबरीत निसर्गवर्णने वैपुल्याने येतात. या निसर्गवर्णनातून विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील नरखेड–खरसोली प्रदेश दृग्गोचर होतो. पाण्याअभावी कोरडी भूसभूसीत झालेली जमीन, कापूस, भूईमुग, ज्वारी, मुग ही खरीप पिके, गहू, हरभरा ही रब्बी हंगामातील पिके यांचे वर्णन प्रदेशविशिष्ट ग्रामीणतेकडे निर्देश करते. विहिरीचे, नदीचे आटलेले पाणी, कोरड्या विहिरी आणि नदीपात्रे अशी वर्णने दुष्काळाची भीषणता व्यक्त करताना दिसतात. संत्र्यांचे बगीचे, सोयाबीनसारखी पिके प्रदेशविशिष्टतेकडे निर्देश करतात. दुष्काळामुळे वाळलेली संत्र्यांची झाडे, पर्जन्याअभावी निर्माण होणारी धूळ, वावटळ, चक्रीवादळ अशी वर्णने प्रदेशविशिष्ट दुष्काळाची चिन्हे गोचर करतात. पाण्याअभावी ओकेबोके पडलेले शिवार, भेगाळलेली जमीन, खराट्यासारखी वाळलेली झुडपे, हाडाच्या सांगाड्याप्रमाणे दिसणारी संत्र्यांची बाग या निसर्गवर्णनावरून प्रदेशातील पाण्याची दुर्भिक्षता व्यक्त हाते. विहीरखोदाई केली, तरी पाणी न लागणे यांसारख्या वर्णनातून घटलेल्या भूजलपातळीचे लेखक वर्णन करतो. पिवळ्या फुलांच्या बाभळी, कडुलिंब, अजानवृक्ष, सिंदी, आंबा, बेशरम झुडूप इ. अनेक झाडाझुडपांची वर्णने निवेदनातून प्रकट होतात. पर्जन्याअभावी ओकीबोकी दिसणारी झाडे, कोमेजलेली झुडपे, बाभळीची झडलेली पालवी, आम्रवृक्षावरील गळून पडलेला मोहोर, कडुलिंबाच्या झाडावरील गळून पडलेल्या निंबोळ्या इ. वर्णनातून दुष्काळाच्या पार्श्वभूमीवरील निसर्ग आशयातून साकार होतो. आग ओकणारा सूर्य, उन्हाची रणरण, उन्हामुळे होणारी अंगाची लाही इ. वर्णनातून वातावरणातील रूक्षता प्रकट होताना दिसते.

‘पांढर’ कादंबरीतील समाजजीवन :

प्रस्तुत कादंबरीत पार्श्वभूमीवर आलेले समाजजीवन हे विदर्भातील एका खरसोलीनामक खेड्यात, तेथील गावगाड्यात घडते. समाजजीवन हा घटक राजकीय जीवन, कौटुंबिक जीवन, सांस्कृतिक जीवन, आर्थिक जीवन, शैक्षणिक जीवन, भाषाविशेष इ. उपघटकांच्या आधारे अभ्यासता येईल.

'पांढर' कादंबरीतील राजकीय जीवन :

प्रस्तुत कादंबरी दुष्काळकेंद्री आशयावर बेतलेली, शेतकरी आत्महत्येसारख्या ज्वलंत प्रश्नावर तटस्थपणे भाष्य करणारी कादंबरी असल्याने या कादंबरीतील निवेदनात व्यापक पातळीवर गावातील, तालुक्यातील, जिल्हा पातळीवरील आणि राज्य पातळीवरील राजकारणाचे चित्रण येते. साहेबराव पाटील यांचे सरपंचपद आरक्षणामुळे अनुसूचित जमातीतील गोंड आदिवासीतील गौतम मडावी याला मिळते, असा उल्लेख राजकीय तपशील पुरवतो. सरपंचपद गौतम मडावीकडे असले, तरी साहेबरावांना मिळणारे महत्त्व, ध्वजारोहन समारंभाच्या वेळी सरपंच गौतम मडावीकडून ध्वजारोहनाला विरोध करणारा नथ्थु इरपाते यांचे उल्लेख गावपातळीवर चालणारे जातीय राजकारणाचे दर्शन घडवतात. आपल्या समाजातील गौतम सरपंच झाल्याने गोंड समाजाला वाटणारे अप्रुप आणि अभिमान राजकीय पार्श्वभूमीदाखल प्रकट होताना दिसतो. दुष्काळनिवारणाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आयोजित केली जाणारी ग्रामसभा आणि त्या प्रसंगी केली जाणारी भाषणे यांच्या वर्णनातून प्रदेशविशिष्ट राजकीय जीवन प्रकट होते. विरोधी पक्षनेता शालिक बनसोडे आणि आमदार शंतनुराव मोहिते यांच्याकडून आयोजित होणाऱ्या सभा तालुका पातळीवरील राजकारणाचा तपशील पुरवितात, तर शेतकरी आत्महत्या, दुष्काळनिवारण याकडे लक्ष वेधण्यासाठी नागपूर अधिवेशनावरील कास्तकारांच्या मोर्च्याची वर्णने राजकीय संदर्भाने प्रदेशविशिष्ट वाटतात. दुष्काळी परिस्थितीवर गावातील पारावर चालणाऱ्या गप्पा, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न निवारण्यासाठी सरपंच मडावीकडून चाललेली धडपड यातून स्थानिक पातळीवरचे राजकारण प्रकट होते. पाण्याचे दुर्भिक्ष असूनही शासनाकडून पाणीबचतीचे संदेश गावात लिहिले जातात. ह्या वर्णनातून राजकारणावर उपहासात्मक टीका केलेली दिसते.

पंढरी आगे ह्या शेतकऱ्याची आत्महत्या आणि त्या प्रसंगाचे राजकारण करणारे पक्ष यातून राजकीय पातळीवरील संवेदनहीनता दिसते. दुष्काळनिवारण, शेतकरी आत्महत्या इ. प्रश्नांवर राज्यशासनाकडून गावाला भेट देणारी सत्यशोधन समिती, समितीसमोरील गावकऱ्यांचे जबाब प्रदेशविशिष्ट राजकीय जाणिवा गोचर करतात.

‘पांढर’ कादंबरीतील कुटुंबजीवन :

‘पांढर’ कादंबरीत शोभणे समूहलक्ष्यी पातळीवर दुष्काळ, शेतकरी आत्महत्या इ. प्रश्न आशयबद्ध करतात. प्रस्तुत कादंबरीतून समूहलक्ष्यी पातळीवरून प्रातिनिधिक पद्धतीने खरसोलीतील कुटुंबजीवन आणि दुष्काळामुळे कुटुंबावरील होणारे दुष्परिणाम व्यक्त केले आहेत. प्रातिनिधिक स्वरूपात साहेबराव पाटील, नागोराव कडू, वासुदेव काळे, गौतम मडावी, नथ्थु इरपाते, अनुसया मांग, सखू तेलीण इत्यादींचे कुटुंबजीवन यात आशयबद्ध केले आहे.

साहेबराव पाटील यांच्या कुटुंबातील त्यांची आई सिंधू पाटील, पत्नी मंगला पाटील आणि नागपूरला राहणारा त्यांचा मुलगा अनंता, असे चौकोनी कुटुंबांचे जीवन आणि त्यावरील दुष्काळाचा परिणाम कादंबरीत लेखनबद्ध केला आहे. याप्रमाणे नागोराव कडू, वासुदेव काळे, गौतम मडावी, नथ्थु इरपाते, अनुसया मांग, सखू तेलीण यांचे प्रदेशविशिष्ट जीवनचित्रण केले आहे. कुटुंबावरील दुष्काळाचा होणारा परिणाम यांचे डाक्युमेंटरीप्रमाणे (लघुचित्रपट) चित्रण प्रस्तुत कादंबरीत केले आहे. प्रस्तुत व्यक्तिरेखांच्या कुटुंबचित्रणावर प्रदेशविशिष्ट ग्रामीणतेचा प्रभाव दिसतो. उदा. कुटुंबातील संवादासाठी वापरली जाणारी बोली, लग्नपद्धती, अंत्यसंस्कार पद्धती, रीतीरिवाज इ. दुष्काळाला तोंड देताना कुटुंबाची उडणारी दैना, त्यांची दैववादी भूमिका, विचार करण्याचा प्रदेशविशिष्ट दृष्टिकोण इ. मधून प्रदेशविशिष्ट ग्रामीण कुटुंबजीवन दृग्गोचर होते.

‘पांढर’ कादंबरीतील सांस्कृतिक जीवन :

प्रस्तुत कादंबरी दुष्काळाचा कास्तकारांवर, गावगाड्यावर झालेला परिणाम वाचकांसमोर उलगडते, शेतकरी आत्महत्येसारखा प्रश्न तटस्थपणे मांडताना दिसते. गावगाड्यातील मुख्य घटक असलेला पाटील या घटकापासून ते मातंग समाजासारख्या दलित घटकांपर्यंत आणि गोंड आदिवासी जमातीचेदेखील सांस्कृतिक जीवनचित्रण सदर कादंबरीत घडते. दुष्काळ निवारणासाठी गावकऱ्यांकडून आयोजित केला जाणारा अखंड हरिनाम सप्ताह, मांग समाजाकडून पाळल्या जाणाऱ्या धोंडीसारख्या पारंपरिक प्रथा असे उल्लेख कादंबरीत येतात. या धार्मिक तपशील वर्णनातून कास्तकारांची, गावकऱ्यांची

दैववादी भूमिका प्रकट होताना दिसते. धोंडी काढताना मातंग समाजाकडून म्हटली जाणारी 'धोंडी धोंडी पानी दे, पानी दे' इ. लोकगीते किंवा विठ्ठलाच्या मंदिरात हरिनाम सप्ताह प्रसंगी म्हटली जाणारी

'रुक्मिणी विचारति देवा जनीचं काय नातं...'[२]

यांसारखी लोकगीतात्मक गौळण लेखक संपूर्णपणे कादंबरीत देताना दिसतो. यामुळे कादंबरीचा आशय अधिक परिणामकारकरित्या प्रकट होताना दिसतो. अखंड हरिनाम सप्ताहप्रसंगी आयोजित केले जाणारे कीर्तन, भजन, प्रवचन असे उल्लेख ग्रामीणतेकडे अंगुलीनिर्देश करतात. गोंडा गुवाऱ्याकडे नेतेपद गेल्याने दुष्काळरूपी देवाचा झालेला कोप यासारखी सिंधू पाटलीनीच्या मनातील अंधश्रद्धा गावगाड्यातील सांस्कृतिकतेतील जातीयता प्रत्ययाला आणते. कादंबरीत आलेले गणपती-महालक्ष्मी उत्सवाचे चित्रण, बैलपोळ्याचे चित्रण सांस्कृतिक जीवनाचे रूप प्रकट करतात. साहेबराव पाटील यांच्या अंत्ययात्रेचे चित्रण प्रदेशविशिष्ट सांस्कृतिक जीवनाचे चित्रण घडवते. उदा. अंत्ययात्रेप्रसंगी वाजवली जाणारी वाद्ये आणि फटाके इ. दिवाळी सणाप्रसंगी होणारे जावई जेवण, लग्नातील हुंडापद्धती, कास्तकारांची जमिनीला काळी आई मानण्याची श्रद्धा यातून गावपातळीवरील सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. साहेबराव पाटील यांचा तेरावा विधी या पार्श्वभूमीवर होणारे गावजेवण या वर्णनातून सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. दुष्काळी-अस्मानी संकटामुळे झालेली गतानुगतिक मानसिकता, कादंबरीत ग्रामीण माणसांच्या दैववादी दृष्टिकोणाचे, पारलौकिक अंधश्रद्ध सांस्कृतिकतेचे दर्शन या कादंबरीत घडते.

'पांढर' कादंबरीतील आर्थिक जीवन :

गावगाड्यातील संरचनेप्रमाणे साठ एकरापर्यंत शेतजमीन असणाऱ्या साहेबराव पाटलांपासून ते अल्पभूधारक कास्तकारापर्यंत आणि मांग-बौद्ध इ. दलित समाजापासून ते गोंड आदिवासी जमातीपर्यंतचे जीवनचित्रण 'पांढर' या कादंबरीतून घडते. तद्नुषंगाने विस्तृत प्रमाणावर आर्थिक जीवनाचे चित्रण दृग्गोचर होताना दिसते. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नापिकी, बेराजगारी यांचे चित्रण लेखक करतो. नापिकीमुळे दलित शेतमजुरांवरील उपासमार, स्थलांतर इ. बाबींचे चित्रण कादंबरीत आले आहे. शेतीशिवाय दुग्धपालनासाठी म्हशी

पाळणारा नागोराव कडू, शेतीत कपाशी, सोयाबीन, गहू, तूर इ. पिके घेणारा वासुदेव काळेसारखा कास्तकार आणि संत्र्यांची बाग फुलवणारा साहेबराव पाटीलसारखा सधन शेतकरी असे कुणबी आर्थिक जीवन कादंबरीत आले आहे. कास्तकारांकडे शेतमजुरी करणारे मांग, बौद्ध तसेच गोंड लोक, शिवारातील झाडे तोडून इंधनासाठी विकणारे आदिवासी लोक, तसेच फडे विकण्याचा पारंपरिक व्यवसाय करणारे मांग लोक असे प्रदेशविशिष्ट ग्रामीण आर्थिक जीवन कादंबरीत आले आहे. माणिकराव देशपांडेसारखी ब्राह्मण मंडळी आपले शेत ठेक्याबटाईने कास्तकारांना पिकवायला देतात. अशाप्रकारचे ग्रामीण-प्रादेशिक अर्थव्यवस्थेचे चक्र कादंबरीतून प्रकट होताना दिसते. दुष्काळामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई, नापिकी, बेरोजगारी यांसारखी समस्या लेखक कलात्मक पद्धतीने 'पांढर'मधून मांडताना दिसतो. एकूणच अवर्षणामुळे उद्ध्वस्त ग्रामीण अर्थव्यवस्था कादंबरीतून प्रकट होताना दिसते.

'पांढर' कादंबरीतील शैक्षणिक जीवन :

प्रस्तुत कादंबरीत गावगाड्यातील शैक्षणिक जीवनाचा त्रोटक तपशील मिळतो. खरसोली पंचक्रोशीतील शैक्षणिक जीवनाचे अपूर्ण चित्र कादंबरीतील आशयातून प्रकट होताना दिसते. साहेबराव पाटील यांचा मुलगा अनंतराव नागपूरला वकिली करतो. कादंबरीत चित्रित केलेल्या नागोराव कडू, वासुदेव काळे इ. व्यक्ती निरक्षर आहेत. आरक्षणाचा फायदा मिळाल्यामुळे शिक्षणाची कवाडे दलित-आदिवासींसाठी खुली झाल्याचे दृश्यमान चित्र कादंबरीत येते. उदा. शिक्षक असलेला सरपंच गौतम मडावी, एम. ए. करत असलेला दलित समाजातील विनोद नारनवरे इ. शाळेत जाणारी हुशार असलेली संवेदनशील दीपाली काळे या व्यक्तिरेखेभोवती घडणाऱ्या घटनांतून शैक्षणिक जीवन प्रत्ययाला येताना दिसते. परंतु एकूणच खेड्यातील शिक्षणाबद्दल अनास्था, उदरनिर्वाहाकरता बालमजुरी करणारी अनुसयाची मुले असे चित्रण कादंबरीत येते. शैक्षणिक क्षमतेमुळे आपल्या आदिवासी असण्याचा साधक-बाधक विचार गौतम मडावी करतो. शिक्षणामुळेच विनोद नारनवरेसारखा तरुण शासकीय अधिकाऱ्यांना जाब विचारतो. खेड्यातील शिक्षणाबद्दलची अनास्था, उदासिनता यांचे 'पांढर'मधील चित्रण एकूणच

प्रदेशविशिष्ट शैक्षणिक जीवनाचे दृश्य उभे करते.

'पांढर' कादंबरीतील भाषाविशेष :

प्रादेशिकता या प्रवृत्तीचा भाषा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. 'पांढर' ह्या कादंबरीत आशय जिवंत करण्यासाठी संवादशैली वऱ्हाडी बोलीत आली आहे. कादंबरीतील व्यक्तिरेखा कुटुंबात, सार्वजनिक ठिकाणी, अनौपचारिक प्रसंगी वैदर्भी लोकबोलीचा वापर करताना दिसतात. कादंबरीतील संवाद नागपूर जिल्ह्यातील नरखेड-खरसोली भागातील वऱ्हाडी बोलीत आले आहेत. कास्तकार दैनंदिन संवादात वऱ्हाडी शब्द, वाक्प्रचार, म्हणी वापरताना दिसतात. उदा. 'बैलबंडी', 'कुटार', 'बटाई', 'तिफण', 'वखर', 'शिरवा', 'कास्तकार', 'गोटाडी', 'निंदण', 'सालदार', 'धुरा' इ. कृषिनिष्ठ वैदर्भिय शब्द व्यक्तिरेखांच्या संवादात येतात. 'वाहाडून', 'त्याही', 'सरका', 'इषी', 'बह्याड', 'गड्डा', 'खन्नत', 'वाट्टे', 'तव्हा' इ. अपभ्रंश वऱ्हाडी शब्दरूपे, तसेच 'काहाल्लवानी', 'बह्यताड', 'आवभऱ्या', 'कोन्टा' इ. विशेषणे संवादात येतात. 'इच्चकवाना', 'इचीमैन', 'बोहारावान्या' इ. खास वऱ्हाडी शिव्या संवादात येतात. संवादशैलीत 'ईले', 'ल्ले', 'ते', 'ईचे', 'ईचं', 'आले' इ. वऱ्हाडी बोलीतील विभक्ती प्रत्यय येतात. 'मान्साईचे सारीसटाप घेणे', 'पोट जाळाची मारामार', 'पाप वागावणं', 'पोळा अन् पानी झाला भोळा' इ. वऱ्हाडी म्हणी आणि वाक्प्रचार गावकऱ्यांच्या संवादात येतात. लग्नविधीतील 'शालमुंदी'सारखी प्रदेशविशिष्ट प्रथा विदर्भप्रदेशाकडे अंगुलीनिर्देश करणारी आहे. 'पांढर' या कादंबरीचे भाषाविशेष प्रादेशिकतेचा घटक 'प्रादेशिकत्व' गोचर करणारा आहे. कुणबी वऱ्हाडी, ब्राह्मणी भाषा, गोंडी वऱ्हाडी बोली तसेच महार-मांगाकडून बोलली जाणारी वऱ्हाडी इ. मध्ये विविधता, भाषावैचित्र्य आणि शब्दवैचित्र्य दिसते.

समारोप :

प्रादेशिकता किंवा प्रदेशविशिष्ट ग्रामीणता या वाङ्मयीन प्रवृत्तीच्या अनुषंगाने 'पांढर' कादंबरीचा विचार केला असता प्रस्तुत कादंबरी ही संपूर्णतः प्रादेशिक कादंबरी नसली, तरी प्रदेशविशिष्ट चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी आहे, असे

म्हणता येते. ‘पांढर’ या कादंबरीत वऱ्हाडी बोलीभाषा संवादात वापरल्याने तिच्या आशयसौंदर्यात जिवंतपणा आणि दृकप्रत्ययता आली आहे.

संदर्भ आणि टिपा :

१. शोभणे रवींद्र, ‘पांढर’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र. आ. नोव्हें. २००९, पृ. ३९.
२. तत्रैव, पृ. ४७

***

‘पांढर’ कादंबरीचे समीक्षात्मक मूल्यमापन

प्रास्ताविक :

‘पांढर’ कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन समाजशास्त्रीय अंगाने करताना वाङ्मयीन परिशीलनात समीक्षेतील इतर अंगांचे उपायोजन मूल्यमापन कसोटी अंतर्गत कमी–अधिक प्रमाणात करणे आवश्यक असते. ‘पांढर’ ही कादंबरी वास्तवदर्शी ग्रामीण कादंबरी असल्याने या कादंबरीच्या मूल्यमापनासाठी मुख्यत्वे समाजशास्त्रीय समीक्षाअंगाचे उपयोजन योग्य ठरते. हिपोलित तेन ज्याप्रमाणे ‘वंश, काळ व परिस्थितीचे अपत्य म्हणजे साहित्य असे तत्त्व मानतो’, त्याचप्रमाणे समाजशास्त्रीय तत्त्वाच्या अनुषंगाने ‘पांढर’चे वाङ्मयीन रसग्रहण उचित ठरेल.

‘पांढर’चे वाङ्मयीन मूल्यमापन :

‘पांढर’चे गुणविशेष :

‘पांढर’ ही कादंबरी विदर्भ प्रदेशातील पार्श्वभूमीवर आधारित असून दुष्काळ, शेतकरी आत्महत्या इ. वास्तव प्रश्न यामध्ये मांडण्यात आलेले आहेत. दुष्काळामुळे कास्तकारांची झालेली गतानुगतिकता, वैफल्यग्रस्त मानसिकता आणि त्यातून उद्‌भवणारी परिस्थिती, कर्जबाजारीपणा, आत्महत्या यांसारख्या विविध समस्या अत्यंत प्रखरपणे आणि तटस्थपणे कलात्मक पद्धतीने ही कादंबरी उभ्या करते. दुष्काळकेंद्री आशयावर बेतलेली वास्तवपूर्ण कादंबरी असा ‘पांढर’ या कादंबरीचा उल्लेख करता येईल. ‘पांढर’ या वास्तवदर्शी कादंबरीतून आशयबद्ध घटनामालिकेतील घटनाप्रसंग हे दुष्काळ या अस्मानी संकटाभोवती निर्माण होताना दिसतात. ‘पांढर’मधील घटना, व्यक्तिरेखा यांचे विकसन आणि उद्‌ध्वस्तपण दुष्काळ या केंद्रामुळे निर्माण झालेले दिसते. दुष्काळकेंद्री आशयाकडे झुकणारा आशय असे ‘पांढर’ कादंबरीतील आशयाचे

वर्णन करता येईल. रवींद्र शोभणे यांनी 'पांढर'चा आशय मांडण्यासाठी निवडलेला कादंबरीचा आकृतिबंध आणि कुणा एका व्यक्तीऐवजी दुष्काळग्रस्त गावालाच केंद्रस्थानी ठेवण्याची योजना यशस्वी झाली आहे, हे 'पांढर' या कादंबरीचे बलस्थान मानता येईल. कादंबरीतील नागोराव कडू, साहेबराव पाटील, सरपंच गौतम मडावी, वासुदेव काळे अशा कुणा एका व्यक्तीभोवती कथानक न फिरता सर्व व्यक्तिरेखा निमित्तमात्र आणि प्रातिनिधिक होत जातात. एखाद्या गंभीरपणे बनवलेल्या डॉक्युमेंटरीप्रमाणे लेखकाचा दृशक (कॅमेरा) खरसोली गावात वेगाने फिरत राहतो. अशा पद्धतीने दीड-दोन पानी प्रसंगात निरनिराळे प्रसंग रेखांकित होताना दिसतात. व्यक्तिरेखांच्या जगण्यातील हे प्रसंग म्हणजे प्रत्येक व्यक्तिरेखेवर एकामागोमाग कोसळलेली संकटे आहेत. घरातील गाय किंवा बैल मरणे इथपासून मुलाला जन्म देताना आई मरणे आणि नंतर काही दिवसात नवजात तान्हे मूलदेखील मरणे, तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या, ते शेतकंऱ्याच्या घरातील दहावीच्या मुलीने (दीपाली) बापाच्या दुर्दैवाची कणव येऊन केलेली आत्महत्या अशा असंख्य प्रकारची संकटांची वर्णने 'पांढर'मध्ये आहेत. बळीराजाच्या वेदनेचे नेमके दर्शन 'पांढर'मधून घडते. एका अतिशय महत्त्वाचा प्रश्नाचे दर्शन म्हणूनही या कादंबरीचे मोल आहे.

खरसोली पंचक्रोशीवर कोसळलेल्या सर्व संकटांच्या मागे एकच महत्त्वाचे कारण आहे, ते म्हणजे लागोपाठ दोन वर्षे पावसाने दिलेली हूल. दोन्ही वर्षे दुबार पेरण्या वाया जातात आणि सारेच गावकरी हावालदिल होतात. हळूहळू शेतीबरोबर पिण्याचे पाणी मिळणेही दुरापस्त होत जाते आणि माणसे जगायला बाहेर पडतात. गावात शेती नाही, शेतमजुरी नाही, पिण्यास पाणी नाही, अशा अवस्थेत जगणेच अशक्य होते आणि सुरुवातीला मांगवस्ती, मग महारवस्ती आणि हळूहळू सगळेच घरदार सोडून स्थलांतर करताना दिसतात. बघताबघता सबंध गाव उजाड होत जातो. 'पांढर' कादंबरीतील लेखनामागील लेखक शोभणे यांचा दुष्काळ या समस्येबाबतचा खोलवरचा अभ्यास आणि चिंतन विशेषत्वाने जाणवते. समस्येचा सामग्र्याने वेध घेण्याची लेखकाची पद्धत कादंबरीत दृकप्रत्ययाला येते. 'पांढर'मध्ये कास्तकारांच्या आत्महत्या इ. प्रश्न प्रखरतेने आले आहेत. तरीदेखील या कादंबरीचा केंद्रबिंदू दुष्काळ हाच आहे. पाणी ह्याच केंद्राभोवती फिरणारे कथानक असा 'पांढर'चा उल्लेख करता

येईल. दम्याच्या विकाराने आई मरताच तिची मुले आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना सरकारी मदत मिळते, या आशेने आपल्या आईचा मृत्यू आत्महत्याच आहे, असे दाखवण्यासाठी आईच्या मृतदेहाला फास लावून आत्महत्या केली असे वाटावे, असे लटकवतात. यासारखे प्रसंग अंगावर काटा आणणारे आहेत. हे दाहक वास्तव मांडताना लेखक आवश्यक ती तटस्थता बाळगताना दिसतो. प्रसंगचित्रणात निर्णायक भाष्य करण्याच्या भानगडीत लेखक शोभणे पडत नाहीत, तर असे प्रसंगच स्वत: ज्वलंत दाहक भाष्य म्हणून उभे राहते. कादंबरी संपते, तेव्हा मन विषण्णतेने भरून येते. कारण तिसऱ्या वर्षीदेखील पाऊस नुसतेच तोंड दाखवत असतो आणि गेल्या दोन वर्षांच्या अनुभवाने त्यावर विश्वास ठेवायला गावकरी तयार नसतो.

पाणी नाही म्हणून शेती नाही, शेतीतील उत्पन्न नाही, पैसा नाही, माणसे आणि जनावरे यांना अन्न-पाणी नाही, सगळी भीषणता आणि भयावहता दिवसेंदिवस वाढत जाते. कुठे काही बरे दिसेल, डोळे सुखावतील एवढे पाणी दिसेल, अशा आशाच मावळल्या आहेत. त्याचे सशक्त आणि सजीव चित्रण 'पांढर'मधून आलेले आहे. दुष्काळामुळे, कास्तकारांच्या होत असलेल्या अवहेलनामुळे, स्थानिक राजकारणामुळे आणि संवेदनाहीन शासकीय नोकरांमुळे गाव गुदमरतो आहे, असेच चित्र 'पांढर'मध्ये उभे केले आहे. 'खरसोली'सारख्या आडगावातील नागोराव कडू, वासुदेव काळे, साहेबराव पाटील ही सर्व माणसे असली, तरी त्यांचे दु:ख जे आहे, तेच आदिवासी सरपंच मडावीचेदेखील आहे. राधाबाई देशपांडे यांना सत्तरीत जे भोगावे लागते, तेच सिंधू आणि मंगला पाटलीनीच्या वाट्याला येताना दिसते. गावात फक्त व्यक्तिरेखेची जात बदलते. परंतु दु:ख-दैन्य तेच राहते. भोगणारी माणसे तीच असतात. वाया जाणारा तरुणवर्ग आणि शहरात स्थलांतरीत होणारा तरुणवर्ग तोच असतो. त्यांची दु:खे, आकांक्षा बदलत नाहीत.

सलग दोन-तीन वर्षे पाणीच दिसू नये, झाडांचे कोळसे व्हावेत, जनावरे तडफडून मरावीत अशा वेळी फक्त पाणी दिसावे म्हणून गाव सोडून जाण्याची परिस्थिती खरसोलीवासियांवर येते. लेखक हा आधी माणूस असतो. लेखक शोभणेची सवेंदनशीलता, हळवेपणा 'पांढर'मधून दिसतो. खरसोलीत लेखकाने अठरा-वीस वर्षे अनुभली, ती माणसे, तो परिसर, त्यांचे परस्पर हेवेदावे,

स्वार्थ-व्यवहार, संबंध, कलागती यांचे कलात्मक चित्रण चित्रमयी शैलीत लेखक 'पांढर'मधून करताना दिसतो. 'पांढर'चे एकूण कथानक दीर्घ असून व्यक्तिरेखांची संख्याही जास्त आहे. तरीसुद्धा 'पांढर'च्या संपूर्ण कथानकामध्ये एक विलक्षण गतिमानता दिसते. साक्षात एखादे चित्र दृकप्रत्ययक्षम व्हावे, अशी लेखकाची निरीक्षणशक्ती आणि लेखनशैली जाणवते. ग्रामीण पार्श्वभूमीसाठी किंवा वातावरणनिर्मितीसाठी लेखक 'पांढर'मध्ये कीर्तन, अभंग, गौळण, लोकगीत, चेष्टामस्करी इ. आवश्यक घटकांचे उपयोजन करतो. 'पांढर' या कादंबरीत लेखनगर्भनिष्ठा आणि मनस्वीपण जाणवत राहते.

'पांढर' कादंबरीच्या मर्यादा :

'पांढर' ही कादंबरी वास्तवदर्शी कादंबरी असली, तरी श्रेष्ठ कादंबरीचा मानक लेखकाकडून निसटून गेल्यासारखा वाटतो. 'पांढर' ही परिणामकारक यशस्वी कादंबरी असे म्हणतानाच काहीतरी निसटून गेल्यासारखे वाटत राहाते. मुळात या कादंबरीत शोकात्मिकेचा एकच एक रंग वापरल्यामुळे लेखक किंवा निवेदक नकळतपणे अभिनिवेषात हे सगळे सांगतोय, असे वाटत राहते. निवेदनात अनेक ठिकाणी पाल्हाळिकता आलेली दिसते. कादंबरीतील कथानकामध्ये दोन-अडीच वर्षांत एका खरसोली गावाच्या तपशीलवार चित्रणात संकटांच्या मालिकांपुढे दुसरे काही घडताना दिसत नाही. (अपवाद दीपाली काळेला मिळालेले वक्तृत्व स्पर्धेतील पारितोषिक) कादंबरीसारख्या व्यापक अवकाशाच्या साहित्यप्रकारात वास्तवाचे याहून अधिक सहिष्णू चित्रण असायला हवे.

लेखकाने भाषिक भान सगळीकडे लक्षपूर्वक सांभाळलेले दिसत नाही. एकच परिसर किंवा घरातील व्यक्ती साधारणपणे एकाच प्रकारची बोली बोलतात. 'पांढर'मध्ये शोभणे यांनी संवादात ग्रामीण वैदर्भी बोली वापरलेली आहे आणि निवेदनात मात्र प्रमाण भाषेचा वापर केला आहे. परंतु एका व्यक्तिरेखेच्या मनातील संज्ञाप्रवाही विचार शहरी प्रमाण भाषेत आणि यानंतर त्या व्यक्तिरेखेचे दुसऱ्या व्यक्तिरेखेशी बोलणे मात्र पूर्णपणे ग्रामीण वैदर्भी बोलीत आहे, हे खटकते. कारण कायम ग्रामीण बोलीत बोलणारा माणूस विचार मात्र उच्चशिक्षित शहरीवासियांसारखा करणार नाही. उदा. सरपंच गौतम

मडावी हा गोंड आदिवासी एकदा असे म्हणतो, ''तुम्हाला कोण ओळखत नाही? शेतकरी संघटनेचे खंदे कार्यकर्ते म्हणून तुमचा सर्वत्र परिचय आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या वेळी आपण केलेले भाषण अजूनही माझ्या ध्यानात आहे.''[१] तोच आदिवासी सरपंच गौतम मडावी पुढील पानावर बोलतो, ''प्याचं पानी आमाले अर्धा-अर्धा कोसावरनं आना लागते. चार-चार रोज अंगाले पानी लागतं न्हाई.''[२] म्हणजेच 'खंदे कार्यकर्ते म्हणून तुमचा सर्वत्र परिचय आहे.' हे शब्द आणि 'अंगाले पाणी लागत न्हाई' हे शब्द एका व्यक्तिरेखेचे वाटत नाहीत. हा आदिवासी खरे तर 'तुमाले सम्दे ओळखतात' असे म्हणेल. असा भाषिक गोंधळ प्रस्तुत कादंबरीत काही ठिकाणी दिसतो.

असे काही भाषिक आणि दोष वगळले, तर शोभणे यांची प्रस्तुत कादंबरी दुष्काळग्रस्त गावाच्या समस्येला सर्वार्थाने भिडते. हे खरेच आहे. अस्मानी-सुलतानी संकटाचे वास्तवदर्शी यथार्थ चित्रण करते. 'पांढर' ही आत्महत्याग्रस्त कास्तकारांच्या दुर्दैवी वास्तवाची कहाणी आत्मीयतेने सांगणारी कादंबरी आहे. दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्या अशा महत्त्वाच्या प्रश्नांचा समग्र, तटस्थ आणि संयत आशय 'पांढर'मधून व्यक्त झाला आहे.

साहित्यसमीक्षकांचे 'पांढर'बद्दलचे मत :

'पांढर' कादंबरीच्या मूल्यमापनासंदर्भात अनेक ग्रामीण साहित्यसमीक्षकांनी आपली अनुकूल, प्रतिकूल मते मांडली आहेत. प्रसिद्ध मराठी साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी ''मराठीमध्ये 'पांढर'च्या निमित्ताने एक उत्कृष्ट कादंबरी सादर झाली आहे. खरोखरच मन सुन्न करणारा जीवनानुभव प्रत्ययकारीपणे या कादंबरीतून आला आहे'', असे मत नोंदविले आहे.[३] ग्रामीण साहित्यिक आणि समीक्षक रा. रं. बोराडे यांनी भीषण दुष्काळामध्ये एखाद्या गावाची किती आणि कशी वाताहत होते, याचे 'पांढर' या कादंबरीतील चित्रण मन विषण्ण करणारे आहे. असे चित्रण मराठी कादंबरीत यापूर्वी क्वचितच झाले असेल'', असा अभिप्राय नोंदवला आहे.[४]

'ललित'च्या अंकातील 'मानाचे पान' या लेखात 'पांढर' कादंबरीचे समग्र रसग्रहण करताना दीपक घारे यांनी ''रवींद्र शोभणे यांनी या कादंबरीचा पट कौशल्याने विणला आहे. 'पांढर' जितकी खरसोली गावाची आहे, तितकीच

ती एकविसाव्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्था, प्रशासन आणि राजकीय इच्छाशक्तीतील अंतर्विरोध, त्यामुळे निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीचीदेखील आहे. ललित लेखकाला भोवतालच्या सामाजिक आर्थिक प्रश्नाचे भान असेल, तर त्यामागे दडलेल्या मानवी प्रवृत्तीचा तो वेध घेऊ शकतो आणि एक जिवंत अनुभव कलाकृतीच्या रूपाने मांडतो. 'पांढर' ही अशी कलाकृती आहे'', असा अनुकूल अभिप्राय दिलेला आहे.[५] संजय भास्कर जोशी 'ललित'च्या अंकातील लेखात ''शोभणे यांची पांढर ही कादंबरी दुष्काळग्रस्त गावाच्या समस्येला सर्वार्थाने भिडते'', असा अभिप्राय देतानाच 'श्रेष्ठ साहित्यकृतीचा पारा 'पांढर'मधून शोभणे यांच्या बोटातून कुठे तरी निसटून गेलाय', असे निर्भेळ मत व्यक्त केले आहे.[६]

इतर ग्रामीण साहित्य आणि 'पांढर' :

'शेतकऱ्यांच्या जगण्याला लागलेली अस्मानी-सुलतानी संकटे' हा विषय मराठी साहित्यात अनेकांनी विविध प्रकारे हाताळलेला आहे. १८९८ च्या ह. ना. आपटे 'काळ तर मोठा कठीण आला' या 'स्फुट गोष्टी'पासून रा. रं. बोराडे यांच्या 'चारापाणी'पर्यंत हा विषय मराठी साहित्यात दृग्गोचर झालेला दिसून येतो. अलीकडेच सदानंद देशमुख यांच्या 'तहान', 'बारोमास' या कादंबऱ्यांत किंवा 'खुंदळघास' या कथासंग्रहातील कथांमध्ये सदर विषयाला समर्थपणे अभिव्यक्तीरूप दिलेले दिसते. शेतकऱ्यांचे दैन्य आणि दुरवस्था यांचे भयावह आणि तितकेच कारुण्यपूर्ण चित्रण यात केलेले दिसते. तसेच भास्कर चंदनशिव यांनीदेखील आपल्या कथांतून दुष्काळामुळे होणारी शेतकरी आत्महत्येसारखी समस्या मांडली आहे. हे आजच्या भारतातील मोठे महत्त्वाचे गंभीर आणि गहनीय प्रश्न आहेत. सदर प्रश्नांना, समस्यांना राजकीय, सामाजिक, मानसशास्त्रीय आणि आर्थिक अशी अनेक परिमाणे आहेत. 'पांढर' या कादंबरीच्या निमित्ताने शोभणे यांनी याच परिणामांचा वेध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

जागतिकीकरण आणि 'पांढर' कादंबरी :

'पांढर' कादंबरीतून दुष्काळकेंद्री आशयाच्या माध्यमातून एकविसाव्या

शतकातील पहिल्या दशकातील जीवघेणे वास्तव जोरकसपणे व्यक्त झाले आहे. लेखकाने प्रस्तुत कादंबरीत जागतिकीकरणानंतर कृषिकेंद्री व्यवस्थेला उद्ध्वस्त करणाऱ्या विविध समस्या, प्रश्न यांचा, तसेच त्यामागील राजकीय, सामाजिक आणि विशेषत: आर्थिक परिमाणांचा वेध घेतलेला दिसतो. उदा. बेसुमार वापरामुळे घटती भूजलपातळी, यांत्रिकीकरणामुळे उद्ध्वस्त ग्रामीण व्यवस्था, भोगवाद, स्वार्थी-क्रोधी मनोवृती, नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश, वाढती संवेदनहीनता, आरोग्याच्या समस्या इत्यादी.

''१९ व्या शतकाच्या प्रारंभी जागतिकीकरणाच्या प्रगतीचा मुखवटा बेसूर असल्याची जाणीव सर्वप्रथम कृषिव्यवस्थेत झाली. पर्यायाने जागतिकीकरणाने गावगाड्याच्या नैसर्गिक जीवनाचा विनाश करून कृषिव्यवस्थेच्या आर्थिक नाड्यांमधले रक्तच शोषून घेतले. त्यामुळे कृषीवलांचं जीवन उजाड झालं असं नाही, तर भुईचंही सृजनशीलत्व नष्ट होऊ लागलं... १९ व्या शतकाच्या पहिल्या दशकातले पांढरीचे-भूमीचे हे असे जीवघेणे वास्तव 'पांढर'च्या निमित्ताने पहिल्यांदाच मराठी कादंबरीत जोरकसपणे व्यक्त झाले आहे'', हा किशोर सानप यांचा अभिप्राय जागतिकीकरण आणि 'पांढर' कादंबरी यातील अनुबंध दाखवण्यासाठी विशेष बोलका वाटतो.[७]

गावगाडा आणि 'पांढर' :

'पांढर' ही कादंबरी ग्रामीण कादंबरी आहे. ग्रामीण समाजव्यवस्था म्हणजेच गावगाडा यांचे दृक्प्रत्ययी चित्र 'पांढर'मधून साकार होते. 'पांढर'मधून आशयबद्ध होणारे खरसोली खेडे यांची संरचना कादंबरीतून दृग्गोचर होते. खरसोलीत साहेबराव पाटलांसारखे सधन मराठा शेतकरी, माणिकराव देशपांडेसारखे ब्राह्मण इ. सवर्ण समाज, नागोराव वासुदेवसारखा अल्पभूधारक, कास्तकार वर्ग, सखू तेलीण, गंगू सोनारीण इ. बहूजन वर्गातील व्यक्तिरेखा, तर जंगलू मांग, अनुसया मांग, पैकू वानखेडे, ईश्वरा कांबळे, उकिंड्या कांबळे यांसारख्या मांग-दलित समाजातील व्यक्तिरेखा घटनाप्रसंगातून उभ्या रा-हतात. सरपंच मडावी, भाऊराव इनवाने, जानू मेश्राम इ. गोंड आदिवासी व्यक्तिरेखा त्यांच्या जगण्यासह साकार होतात. म्हणजेच लेखकाने 'पांढर'मध्ये संपूर्ण गावगाडा कलात्मकपणे आशयबद्ध केला आहे. गावगाड्यातील

परंपरागत मानसिकता ‘पांढर’मध्ये सिंधू पाटलीन, भाऊराव इनवाने इत्यादींच्या विचारातून, संवादातून प्रकट होते. त्याचवेळी सरपंच मडावी, विनोद नारनवरे इ.च्या संवादातून शिक्षणामुळे ग्रामीण मानसिकतेतील झालेले आमूलाग्र परिवर्तन दृष्टीगोचर होते. ‘पांढर’मधून प्रकाश इंगोले, वामन कुकडे आणि मुकुंदा इरपाते इत्यादींच्या चित्रणातून काही प्रमाणात वाईट मार्गाला लागलेली किंकर्तव्यमूढ तरुण पिढी दृष्टीगोचर होते. गावाला सर्वस्व मानणारे साहेबराव, तर ग्रामीण जगण्यात राम नाही, असे म्हणणारे अनंतराव श्रीकांतसारखे शहरवासी तरुण यांच्यातील मूल्यसंघर्षातून गावगाड्यातील विरोधाभासी द्वंद्वांचे दर्शन घडते. सिंधू पाटलिणीची परंपरागत जातीबद्दलचा दृष्टिकोन, तर राधाबाई देशपांडेंची मागासलेल्या जातीचा कैवार घेण्याची भूमिका संवादातून प्रकट होते. भाऊराव इनवाने या व्यक्तिरेखेची स्वत:च्या जातीबद्दलची हीनत्वाची भावना आणि याउलट सरपंच मडावीची विचारशील सामंजस्याची भूमिका, अशा अनेक उदाहरणांतून ग्रामीण समाजव्यवस्थेतील आंतरद्वंद्वे साकार होतात. थोडक्यात, ‘पांढर’मधून ग्रामीण समाजव्यवस्थेचे सूक्ष्मपातळीवरून दर्शन घडते. गावगाड्यातील जातीवास्तव, जाती-जातीअंतर्गत असलेले आंतरसंबंध ‘पांढर’मधून साकार होताना दिसतात.

‘पांढर’मधील चित्रणशैली :

इंग्रजी किंवा युरोपियन साहित्यकार एखादी ग्रामीण प्रादेशिक कादंबरीचे लेखन करण्यापूर्वी प्रादेशिक पार्श्वभूमीचा, तेथील भूरूपांचा, हवामानाचा सूक्ष्म अभ्यास करतात. ‘पांढर’मधील दुष्काळी खरसोली गाव, तेथील निसर्ग यांचे मार्मिक चित्रण ‘पांढर’मध्ये येते. दुष्काळी पार्श्वभूमीवर भूमीला पडणाऱ्या भेगा, भूजलपातळी घटल्याने वाढलेली धूळ, वृक्षांचे ओकेबोकेपण, तसेच अवर्षण यांच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणारी धुळीची वादळे इ. निसर्गचित्रणातून ‘पांढर’ची वातावरणनिर्मिती घडते. ‘पांढर’च्या निसर्ग चित्रणातून लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती दृष्टिक्षेपात येते.

‘पांढर’मध्ये केलेले व्यक्तिरेखांचे चित्रणदेखील मनोविश्लेषणातून अधिक दृकप्रत्ययी, जिवंत होते. नापिकीमुळे कास्तकारांची विमनस्कता कास्तकारांच्या व्यक्तिरेखांतून प्रकट होते. दीपालीसारखी संवेदनशील

मुलगी, तिचे पौगंडावस्थेतील अधिकच हळवे झालेले मन, तिला स्त्रीत्वाची होणारी समज इ.मधून 'पांढर'चे मानसशास्त्रीय अंग किंवा बैठक प्रकट होते. 'पांढर'मधील गावगाड्याच्या चित्रणातून समाजशास्त्रीय अंगाची ओळख कलात्मकरित्या होते. 'पांढर'मधील अवर्षणसमस्येवर, शेतकरी आत्महत्येवर चालणारे स्थानिक, तसेच राज्यपातळीवरील राजकारण मूल्यनिर्णयन म्हणून प्रकट होताना दिसते. 'पांढर'मधील राजकारण ठिगळे लावल्यासारखे न येता आशयाच्या विकसनासाठी आल्यासारखे सखोल वाटते. 'पांढर'मधील राजकीय पार्श्वभूमीमुळे आशयातील कथाबीजाला ज्वलंत टोकदारपणा, तसेच मार्मिकत्व लाभते. एकूणच 'पांढर'मधील चित्रणशैलीतून दुष्काळ, शेतकरी-आत्महत्या यांसारख्या प्रश्नांमागील सामाजिक, आर्थिक, मानसिक, राजकीय परिमाणे प्रत्ययकारकरित्या जिवंत होतात.

संदर्भ आणि टिपा :

१. शोभणे रवींद्र, 'पांढर', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र. आ. नोव्हें. २००९, पृ. १७.
२. तत्रैव, पृ.
३. ललित, ऑक्टो. २०१०, पृ. १०९.
४. तत्रैव, पृ. १०९.
५. तत्रैव, पृ. १०९.
६. तत्रैव, पृ. १०९.
७. उनि., 'पांढर', मलपृष्ठ.

***

रवींद्र शोभणे यांची मुलाखत

(लेखक दि. २२/९/२०११ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेत 'पांढर'चे लेखक डॉ. रवींद्र शोभणे यांची मुलाखत घेतली.)

प्रश्न :

डॉ. नागनाथ कोत्तापल्लेंसारखे ग्रामीण साहित्यसमीक्षक १९८० सालानंतर मराठीतील प्रादेशिक कादंबरी संपली, असे म्हणतात. याबाबत आपले काय मत आहे?

डॉ. शोभणे : ग्रामीण साहित्यप्रवाहात प्रादेशिक आणि ग्रामीण असा भाग निर्माण झाला आहे. 'पांढर' ही कादंबरी तशी ग्रामीणच आहे. ज्या कादंबरीतील कथानक त्या एका प्रदेशात घडू शकते, त्यापलीकडे घडू शकत नाही. ती कादंबरी 'प्रादेशिक कादंबरी' होय. 'प्रादेशिकता' या विषयावर मी माझी मते विस्तारपूर्वक जानेवारी २०१० मध्ये अंबाजोगाईच्या 'समरसता साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदावरून मांडली आहेत. त्या साहित्य संमेलनाचा हेतू प्रादेशिकता हा होता.

प्रश्न :

डॉ. मदन कुलकर्णी यांसारखे समीक्षक प्रादेशिकतेला ग्रामीणतेपेक्षा व्यापक मानतात, याबद्दल आपले मत काय?

डॉ शोभणे : डॉ. मदन कुलकर्णींचा प्रादेशिकतेचा विचार फारच चुकीचा आहे. प्रादेशिकता व्यापक नाही. प्रादेशिकता सीमित असून, ग्रामीणता व्यापक आहे. प्रादेशिक म्हणू शकतो, अशा कादंबऱ्या मराठीत मोजक्याच आ-

हेत. मराठीत ग्रामीण कादंबऱ्या भरपूर आहेत. ज्या कादंबऱ्यांतील पात्रांवर, व्यक्तिरेखांवर तेथील प्रदेशाचा, निसर्गाचा दूरगामी, खोलवर परिणाम पडलेला दाखवलेला असतो, त्या प्रादेशिक कादंबऱ्या होत. भारतीय समाज अधिक तर ग्रामीण समाज आहे. ज्या कादंबरीतील कथानक कुठेही, कोणत्याही गावात घडू शकते, ती कादंबरी ग्रामीण होय.

प्रश्न : र. बा. मंचरकरांसारखे समीक्षक 'प्रादेशिकता' हे मोठे वर्तुळ, तर 'ग्रामीणता' हे प्रादेशिकतेतील अंतर्वर्तुळ मानतात, याबाबत आपला विचार काय आहे?

डॉ. शोभणे : ग्रामीणता ह्या मोठ्या वर्तुळातच प्रादेशिकतेचे लहान अंतर्वर्तुळ सामावलेले आहे. मराठीतील प्रभाकर पेंढारकरांची 'रारंगढांग'सारखी कादंबरी खऱ्या अर्थाने प्रादेशिक म्हणता येईल. कन्नडमधील शिवराम कारंथ यांची 'चेंडील' ही उत्कृष्ट प्रादेशिक कादंबरी मानता येईल. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांचा विचार केल्यास 'गारंबीचा बापू'त कोकण अधिक प्रभावीपणे दिसतो. 'रथचक्र' ही मर्यादित अर्थाने प्रादेशिक कादंबरी असे आपण म्हणू शकतो. गारंबीतील स्वप्नवत निसर्गसृष्टीच्या पार्श्वभूमीवरील बापूची प्रेमकथा कोकणातच घडू शकते. ही कथा इतरत्र प्रदेश पार्श्वभूमीवर उभी करतो म्हटल्यावर त्याचे स्वरूप बाडंगुळ स्वरूपाचे होऊ शकते. 'रथचक्र'चे कथानक इतर भागातदेखील घडू शकते. मराठवाडा, विदर्भ प्रदेश पार्श्वभूमीवरदेखील 'रथचक्र'चे कथानक उभे राहू शकते. 'तुंबाडचे खोत' ही कादंबरीदेखील प्रादेशिकतेच्या बाबतीत वरचढ आहे, तर 'यशोदा'त प्रादेशिकता दिसत नाही. मी तर म्हणतो, 'बनगरवाडी' ही प्रादेशिक कादंबरी नाही, तर ती ग्रामीण कादंबरी आहे. त्या कादंबरीतील कथानक इतरत्र कुठेही घडू शकते. 'रारंगढांग' ही प्रादेशिक कादंबरी असा प्रथम उल्लेख मीच केला आहे. कारण 'रारंगढांग'मधील कथानक तिबेटचा जो प्रदेश आहे, तिथेच घडू शकते. खानोलकरांची कादंबरी, त्यातील पात्रे, माणसे, प्रदेश तेथील निसर्गाशी घट्ट नाळेने बांधलेली दिसतो.

प्रश्न : तुमच्या 'पांढर'वर इतर पूर्वसुरींचा प्रभाव आहे का? असल्यास कोणाचा आहे?

डॉ. शोभणे : असं नाही म्हणता येणार! लेखकावर थोड्याबहूत प्रमाणावर पूर्वसुरींचा प्रभाव असतो. तो त्याच्या साहित्यातदेखील उमटतोच. परंतु 'पांढर'वर पूर्वसुरी लेखकांचा प्रभाव आहे, असे म्हणता येणार नाही.

प्रश्न : आपले वास्तविक आयुष्य आणि 'पांढर'चे कथानक यात संबंध कसा जोडता येईल?

डॉ. शोभणे : माझे गावच खरसोली आहे. 'पांढर'मधील मांडलेले 'खरस-ोली' गावचे वातावरण हे माझ्या पूर्वायुष्याशी संबधित आहे, ते फक्त संदर्भापुरते. 'पांढर'मध्ये जे घडते, ते माझ्या आयुष्यात घडले, असे नाही. 'पांढर'चे कथानक हे मी तेथे पाहिलेले, अनुभवलेले आहे. परंतु ते माझ्या आयुष्यात घडले, असे म्हणता येणार नाही. खरसोलीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळात माणसे कशी वागू शकतील, ते मी 'पांढर'मधून मांडले आहे.

प्रश्न : 'पांढर'मधील 'खरसोली' हे खेडे आणि आताचे 'खरसोली' यात फरक जाणवतो?

डॉ. शोभणे : ते खेडे, जे 'पांढर'मध्ये आले, ते तसेच आहे; पण 'पांढर'मधील दुष्काळ माझ्या मनातील आहे, काल्पनिक आहे. खरसोलीत एक वर्ष दुष्काळ पडलाय, नाही असे नाही. परंतु मी चित्रित केलेला दुष्काळ काल्पनिक आहे. दुष्काळामुळे हवालदिल झालेली माणसे मी मांडली आहेत.

प्रश्न : तुम्ही 'पांढर'मध्ये रेखाटलेल्या व्यक्तिरेखा तुमच्या वास्तविक जीवनावरून घेतल्या आहेत काय?

डॉ. शोभणे : साहित्यातील व्यक्तिरेखा वास्तविक आयुष्यात पाहिलेल्या

असतात. प्रत्यक्षात पाहिलेल्या असतात. परंतु त्या आहेत, तशा घेतल्या जात नाहीत. हव्या त्या व्यक्तिरेखा मुखवटा घालून साहित्यात रेखाटल्या जातात. आपल्या आवतीभोवतीची माणसे लेखक साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न करत असतो. तो आवतीभोवतीच्या माणसातून व्यक्तिरेखा निवडतो आणि आपल्या पद्धतीने साहित्यातून मांडतो. तो पाहिलेली माणसे साहित्यातून मांडत असतो.

प्रश्न : 'पांढर'कडे एक लेखक म्हणून पाहताना आणि एक व्यक्ती म्हणून पा–हताना आपल्याला काय फरक जाणवतो?

डॉ. शोभणे : माझी जेवढी ताकद आहे, तितके ओझे मी 'पांढर'मधून उचलले आहे. 'पांढर' ही निश्चित चांगली, मी आतून मांडलेली कादंबरी आहे. त्यात दोष असतील, नाही असे नाही. परंतु माणसाच्या जगण्यातील उद्ध्वस्तपणा, त्यातील गुंता संघर्षासह साकार होतो. ग्रामीण जीवनात काही जगण्यासारखे नाही, असे मानणारा अनंता आणि ग्रामीण नाळेशी असलेले अतूट नाते समजून ग्रामीण जगण्याशी आपले जगणे बांधून ठेवणारा त्याचा बाप साहेबराव असा मूल्यसंघर्ष 'पांढर'मध्ये आहे. ग्रामीण नैतिकतेचा प्रश्न चित्रपटातून ढोबळ पद्धतीने मांडणारे लोक त्यात मी चित्रित केले आहेत. अशा शहरी लोकांना विनोद नारनवरे ही व्यक्तिरेखा 'ग्रामीण जीवन असे नाही. ग्रामीणतेचा संबंध वासना, ग्रामीण स्त्रीचारित्र्याशी जोडणे चुकीचे असून ते तुमच्या शहरी मानसिकतेतून आले आहे', असे सडेतोड उत्तर देताना दिसते. ग्रामीण जीवनाचे सुख–दुःख, वासना यांचे चित्र चित्रपटातून येत असते. या उलट अनुसयासारखी ग्रामीण–दलित स्त्री हलाखीच्या परिस्थितीत आपले चारित्र्य जपताना दिसते. 'पांढर' ही एक चांगली कादंबरी आहे. आता तिचे स्वागत कसे होते, हे अलाहिदा!

प्रश्न : आपण 'पांढर'मधून विदर्भातील दुष्काळ, पाणीप्रश्न, शेतकरी आत्महत्येसारखे ज्वलंत प्रश्न तटस्थपणे मांडले आहेत. या प्रश्नाबाबत आपले मत काय आहे.?

डॉ. शोभणे : अवर्षण, शेतकरी आत्महत्या यांसारखे प्रश्न सनातन आहेत. या प्रश्नांची तात्कालिक उत्तरे राजकीय, सामाजिक उपायात शोधता येणार नाहीत. त्यांच्या मुळापर्यंत जावे लागेल. हे प्रश्न मानवी जीवनाला प्रभावित करतात, वेगळे रूप, आकार देतात.

***